# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०१/२००६

आज दि. २०/०१/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ११ दि. १०/०१/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २९) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३०) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३५) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४०) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४४) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४६) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४७) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४८) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५०) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५१) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५३) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५६) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५७) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५९) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६०) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६१) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६२) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६४) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६५) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६६) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६८) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६९) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७०) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७१) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७२) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७३) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| २) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| ३) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ४) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा.महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार २० जानेवारी, २००६ रोजीची मा. महासभा, महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित असलेल्या माजी महापौर मायराजी मेंडोन्सा साहेबा, तसेच उपस्थित असलेले महानगरपालिकेचे कमिशनर सुदामराव गायकवाड साहेब, उपायुक्त साहेब, स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब, सभागृहाचे उपस्थित असलेले विरोधी पक्षनेते परशुराम पाटीलजी, सर्व प्रभागाचे प्रभाग अध्यक्ष, महिला व बालकल्याण समितीचे सभापती सुरेखा गायकवाड, उपस्थित असलेले सर्व पक्षाचे गटनेते, सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, महापालिकेचे सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त, सर्व खात्याचे अधिकारी, वृत्तपत्राचे प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलेले सर्व प्रेक्षक बंधु आणि भगिनीनो, आजच्या महासभेच्या विषयपटलावरिल विषयांवरती चर्चा करुन निर्णय घेऊन सदरची मा. महासभा खेळीमेळीच्या वातावरणात आपण पार पाडण्यासाठी सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा, धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलु इच्छिते की, महाराष्ट्राचे कवी विं. दा. करंदीकर ह्यांना नुकताच ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे आणि त्याच्यासाठीच मा. महासभेमध्ये त्यांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे. महाराष्ट्राची ही भूषणावह बाब आहे आणि त्याचा आपण निश्चित विचार केला पाहिजे तसा मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ७७ :-**

महाराष्ट्राचे कवी श्री. विं. दा. करंदीकर ह्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील. अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

पहिला प्रश्न, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११.५० मिनिटे झालेली आहे. सन्मा. नगरसेवक मिलन वसंत म्हात्रे ह्या सदस्यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील महापालिका हद्दीतील शाळा, या इमारतीचे भाडे, उपसंचालक शिक्षण विभाग नाशिक ह्यांच्याकडून सन १९९३ पासुन वसुली करणे बाकी आहे. हा प्रश्न तत्कालिन नगरपरिषदेपासुन प्रलंबित आहे. याच्यामध्ये कुठलाही वाद नाही आणि सदरहू या प्रकरणात महानगरपालिकेचे माझ्या माहितीनुसार करोडो रुपयाचे शासनाचे येणे बाकी आहे. पत्रव्यवहार करुन जवळजवळ दोन वर्ष होत आली आहेत व हा प्रश्न आज या सभागृहापुढे आलेला आहे आणि यामध्ये आपल्या शिक्षण मंडळाकडुन म्हणजे कालच्या तारखेपर्यंत शिक्षण मंडळाकडून मला कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा उत्तर किंवा माहिती काहीही आलेली नाही. आपण कितपर्यंत आहोत शासनाने आपल्याला काय काय सहकार्य केले आहे, काय अश्यूरन्स दिले आहे का? किंवा सदर रक्कम ही कशाप्रकारे शासन आपल्याला देईल किंवा देणार आहे किंवा नाही कारण आपण वर्तमानपत्रात बातम्या वाचतोय सरकार हे कर्जबाजारी आहे. पण आपले येणेसुद्धा महत्वाचे आहे. या महत्वाच्या येण्यावरती आपल्याकडे तीन आयुक्त येऊन गेले. आपले आयुक्त येऊन गेले. प्रत्येक आयुक्तांना माझा प्रत्येक व्यवहार आहे. परंतू आयुक्तांच्या स्वाक्षरीचे पत्रसुद्धा माझ्याकडे आलेले नाही. म्हणजेच या महापालिकेने करोडो रुपयांचे येणे बाकी आहे. त्याबद्दल आपली नेमकी आजची भुमिका काय आहे आणि जी प्रश्नपत्रिका आहे त्यामध्ये हे जे संपुर्ण उत्तर आलेले आहे. ४ करोड ५७ लाख, १५ हजार, १७६ रुपये अपेक्षित आहे. ह्या चार करोड म्हणजे जवळ जवळ साडे चार, पावणे पाच करोडला आपल्या महापालिकेत काही किंमत नाही असे मला वाटते. त्यांनी पुढे असे आपल्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, १७/११/२००५ व 'ज' जावक क्र. २००५-०६, १९/०१/२००६ अन्वये मा. शिक्षण संचालक, पुणे, यांना उपरोक्त रक्कम मनपा तत्काळ मंजुरी करणेस विनंती केलेली आहे. तसेच, मा. महापौर महोदयांनी सुद्धा लेखी पत्र पाठवुन सदस्या प्रस्ताव तत्काळ मंजुर करणेस संबंधित विभागास विनंती केलेली आहे. तुर्त सदरचा

प्रस्ताव मा. संचालक शिक्षण, पुणे, ह्यांच्याकडे विचारधीन आहे. मा. महापौर मॅडम, तुमच्याकडे आम्ही अनेकवेळा सर्व नगरसेवक पत्रव्यवहार करतो. पण त्या पत्राचे पुढे काय झाले, तुम्ही कुठल्या डिपार्टमेंटला ते पत्र पाठवलेले आहे. काय कार्यवाही करण्याकरिता आदेश दिलेले आहेत, आमचे पत्र चुकीचे आहे किंवा त्यावर कुठली कार्यवाही करू नये किंवा करावी, तत्काळ करावी याबाबत या सदनामध्ये बसलेल्या माझ्या माहितीनुसार कुठल्याही सदस्यास आपल्या एक स्वाक्षरीचे उत्तर मिळालेले नाही. ही आमच्या दृष्टीकोनातुन फार वाईट गोष्ट आहे. आम्हाला अशी आशा आहे की, या शहराचे प्रथम नागरीक किंवा प्रथम पदसिद्ध आपण स्वतः एक व्यक्ती आहात. आम्हाला आपल्याबद्दल एक चांगला आदर आहे. पुर्वीच्या महापौरांबद्दलही आदर होता आणि आजही आहे आपल्याकडे आम्ही सदस्य या नात्याने, लोकांचे प्रतिनिधी या नात्याने पत्रव्यवहार करत असतो. परंतु, जिल्हाधिकारी मधुकरराव पाटील होते. त्यांच्याकडे कुठल्याही व्यक्तीचे पत्र गेले तर त्यांचे एक छोटेसे पत्र त्या व्यक्तीला लगेच मिळायचे. माझ्याकडे आहे ते मी संभाळून ठेवले आहे. विषय कुठलाही असो त्या मुख्याधिकाऱ्याकडे किंवा त्या तहसीलदाराकडे त्याने ते प्रकरण वर्ग केले तर तसे त्यांचे उत्तर यायचे. आपल्याकडचा प्रस्ताव १९/०१/२००६ रोजी आपण संचालकाकडे पत्र पाठवले आहे आणि १९/०१/२००६ च्या नंतर आज दि. २०/०१/२००६ ची सभा आहे. कालच आपण कार्यवाही केली आणि त्याच्या अगोदरचे पत्र १७/११/०५ म्हणजे जवळ जवळ ते आपण दोन अडीच महिने तरी या प्रकरणात कुठलाही पत्रव्यवहार नाही. जवळ जवळ पावणे पाच करोड रुपये इतक्या रक्कमेकरीता केलेला नाही. हे आपल्या उत्तरावरून सिद्ध होते. मला असे आपल्याला म्हणायचे आहे की, आपल्याकडे शिक्षणाच्या बाबतीत फार चांगली गोष्ट आहे अशातला भाग नाही कारण प्रत्येक शैक्षणिक वर्ष संपले, निकाल लागले की खाजगी शाळांना ज्यांना आपण अनुदान देणार आहोत. मंजुरी केलेली आहे अशा शाळांचे निकाल पेपरमध्ये आम्ही वाचतो. चांगल्या विद्यार्थ्यांचे आपण सत्कार करतो. परंतु, आपल्या ज्या शाळा आहेत, आपले जे शिक्षण मंडळ आहे. त्याच्यातला एखादा विद्यार्थी आठवी पास चांगल्या प्रकारे झाला. सर्व माध्यमांचे मी सांगतो कुठल्या एखाद्या माध्यमाचे मी बोलत नाही. तर ह्या करिता आपण त्या विद्यार्थ्यांचा महानगरपालिकेमधिल शाळांमधील शिक्षकांचा चांगले आदर्श शिक्षक, मागे जे सत्कार झाले त्याबद्दल मी बोलत नाही. थोडे वादादित होते. पण जो विद्यार्थी आहे त्याचा आपण चांगला सत्कार केला असे मला आठवत नाही. माझी अशी प्रामाणीक इच्छा आहे की, आपल्या शाळांमध्ये गोरगरिब, नाहीरे वर्गातील विद्यार्थी आहेत. त्याच्यामध्ये हमलापासुन ते अगदी क्लार्क पदापर्यंत काम करणारे. जिल्हा परिषदेमध्ये माझे स्वतःचे प्राथमिक शिक्षण चौथीपर्यंत झालेले आहे. त्याच्यानंतर माध्यमिक शिक्षण हे भाईंदर सेकंडरी मध्ये झाले. आपल्या शाळांचा जो स्तर आहे तो वाढवण्याकरीता हे जर पैसे आपल्याकडे वेळेवर आले तर आपल्या विभागातील ज्या शाळा आपल्याला कायम स्वरुपी पहिल्या माळ्याच्या, दुसऱ्या माळ्याच्या, तीन तीन, चार चार माळ्याच्या ज्या करावयाच्या आहेत. त्या शाळांच्या बांधकामाकरिता, इन्फ्रास्ट्रक्चरकरिता जर उद्या संगणकीकरण करायचे आहे. त्याच्याकरिता ही रक्कम गोरगरीब, तळागाळातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाकरिता आपल्याला ही रक्कम वापरता येईल आणि हा प्रश्न जवळ जवळ आणि मी प्रशासनाला, सचिवांना विनंती करेन की, सदर प्रश्न कुठल्या तारखेला सदस्यांनी मांडलेला आहे त्याची तारीख देण्याची मेहरबानी यापुढे करावी. कारण आपण ही फ्रेश कॉपी आता देत आहात. माझा प्रश्न हा किती वर्षापूर्वीचा होता? दिड वर्षापुर्वीचा, एक वर्षापुर्वीचा. त्याची तारिख द्या म्हणजे माझ्या प्रश्नाला तारिख आहे. सेम तसेच्या तसे देत जा. अशी माझी विनंती आहे. आपण हा प्रश्न येथे घेतला आहे. कुठलेही राजकारण नाही. आपण स्वतः शिक्षिका होत्या. या शहरामध्ये नगरसेवकांनी, सर्व पक्षांनी जर या विषयावर रक्कम मिळण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. सर्व नगरसेवकांच्या वॉर्ड मध्ये महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षणाकरिता जाणारे विद्यार्थी सगळ्या महापालिकेच्या नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये आहे. ह्याचे भान सगळ्यांनी ठेवले पाहिजे. ही रक्कम सर्व लोकांनी एकत्रीतरित्या येऊन वसुल कशी होईल आणि आपल्याला ती कशी वापरता येईल याचा सगळ्यात पहिला प्रशासनाने प्रयत्न करावा आणि त्याचबरोबर आम्ही लोकप्रतिनिधी आपल्या बरोबर आहोतच आणि मॅडम आपल्याला विनंती करतोय की, आपण प्रशासनाने गेल्या दिड महिन्यामध्ये म्हणजे हे पत्र कालच १९/०१/२००६ ला कसे काय गेले. शिक्षण विभागाचे कोण अधिकारी उपस्थित असतील तर त्यांनी स्पष्टीकरण द्यावे की, ह्याच्याबद्दल त्यांचे काय म्हणणे आहे? खुलासा त्या अधिकाऱ्यांनी करावा. कारण त्यांचा दरवेळेला एकच घोष असतो की, मी महापालिकेचा नोकर नाही. मी राज्यशासनाचा आहे. हे असे सरळस्पष्ट सांगुन टाकतात. मागे तर शिक्षण अधिकाऱ्यांनी सभागृहामध्ये वक्तव्य केले आहे. गोसावी म्हणून होते त्यांनी सभागृहात वक्तव्य केले होते. ते महापालिकेला गणती करत नाही का? असा माझा प्रश्न आहे. त्याकरिता त्यांच्याकडुन खुलासा येउ द्या की, शिक्षण विभागातर्फे ही रक्कम वसुल होण्याकरिता नेमका किती पत्रव्यवहार झाला आहे आणि एवढी दिरंगाई का? ह्या प्रश्नाचा खुलासा अगोदर शिक्षण अधिकाऱ्यांनी करावा आणि मग आयुक्त साहेबांनी त्याचे उत्तर द्यावे धन्यवाद.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, आपण या विषयावर गांभिर्याने विचार करावा लागेल. कारण शिक्षण अधिकारी हे स्थायी समितीच्या सभेलाही येत नाही. स्थायी समिती आणि मा. महासभेला ते मानतात की नाही? हा प्रश्न उपस्थित होतो. त्यांच्यावर आपण कार्यवाही करण्याचा बंदोबस्त करा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी आता जो प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी आपण शिक्षण अधिकाऱ्यांना पाचारण केले आहे. परंतु, शिक्षण अधिकाऱ्यांच्या मातोश्री परवाच वारली आहेत. त्याच्यामुळे ते कालपासुन रजेवर आहेत. ह्या संदर्भामध्ये बांधकाम विभागाकडुन आपण फाईल मुव्ह केलेली आहे आणि त्याचा पाठपुरावा हा आपण सतत करत असतो. त्या संदर्भामध्ये बांधकाम विभाग आपल्याला माहिती देतील.

**मिलन म्हात्रे :-**

ते जर नसतील तर त्यांच्या डिपार्टमेंटमधुन कोण क्लार्क असतील ना. उद्या शिक्षण अधिकारी सहा महिने रजेवर गेले. मातोश्री वारली, दुःखद घटना आहे. पण आज ते गैरहजर असल्याने एखादे काम थांबत तर नाही ना. ते डिपार्टमेंट काय करते. जर आयुक्त साहेब नाही, तर कोणीतरी डी.एम.सी. आहे ना, सभा चालवायला. हे असे प्रत्येक सभेमध्ये चालू आहे. मागच्या वेळी शिक्षण अधिकारी एवढे उर्मटपणे बोलत होते. आमच्यासारखे सत्ताधारी असते तर लगेच त्यांना घरी पाठवले असते. नगरपालिकेतुन निरस्त करुन टाकले असते. हिंम्मत होते कशी? त्यांनी सरळ सांगितले की, नगरपालिकेचा कर्मचारी नाही. सन्मा. सदस्य मिलन पाटील हे बोलले ते बरोबर आहे. ते एकाही सभेमध्ये हजर राहत नाही.

**लिओ कोलासो :-**

सत्ताधाऱ्यांबद्दल काय बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

संन्याशिव म्हणून अधिकारी आहेत त्यांनी ह्या सभेमध्ये डिक्टेशन दिले आहे.

**मिलन पाटील :-**

जर तुमचे राज्य असते तर एकपण कर्मचारी येथे राहीला नसता.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे सत्ताधारी या नात्याने जे आम्ही केले नाही. ते विरोधी पक्ष या नात्याने तुम्ही काय करत होता?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही करायचे ते करतो आणि मागणी ही आम्हीच केली. तुम्ही आता उठून बोलता. माझ्याकडे सगळा पत्रव्यवहार आहे. माझ्याकडे कागदपत्र ठेवतो आणि मी बोलतो आणि मला सत्ताधाऱ्यांची काही आवश्यकता नाही. ज्या दिवशी जनता सर्तक होईल तेव्हा आम्ही सत्तेत येउनही दाखवु आणि तुमच्यापेक्षा चांगले काम ही करुन दाखवू.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एका सदस्याने किती बोलायचे? त्या बोलण्याला आपण मर्यादा ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य माझा प्रश्न चालु आहे.

**मिलन पाटील :-**

एक तासाचा असेल तर तासभर बोलत रहायचे असे चालणार आहे का? नाहीतर, आम्हाला उठुन बोलायला.

**मिलन म्हात्रे :-**

माझा प्रश्न संपलेला नाही. माझा प्रश्न चालु आहे.

**मिलन पाटील :-**

एका नगरसेवकाला पाच मिनिटे, दहा मिनिटे बोलायला आपण संधी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे तसे प्रशासनाकडून येउ द्या.

**मिलन पाटील :-**

जर पाच मिनिटानंतरही बोलायला लागले तर आपण बेल वाजवा. नाहीतर, आम्हालासुद्धा बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य, आपला प्रश्न नाही आपण नंतर बोला. साहेब, याबाबत मला उत्तर येउ द्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय, प्रश्न हा मिलन म्हात्रे साहेबांचा आहे आणि दुसऱ्या माणसांनी त्याच्यामध्ये तोंड खुपसायचे फार कारण नाही. परंतु, साहेब या ठिकाणी जे शिक्षण अधिकाऱ्यांच्या संदर्भामध्ये एक व्यथा आहे. या महापालिकेची व्यथा आहे की, याठिकाणी आजपर्यंत आलेल्या सर्व शिक्षण अधिकाऱ्यांमध्ये कुठलाही अधिकारी सभागृहाला सामोरे जाण्यासाठी टरकत होता, भीत असतो ह्याचे कारण त्या अधिकाऱ्यांचे कुठेतरी वैगुण्य आहेत. ते आम्ही सभागृहापुढे बोलायला नको. परंतु साहेब मुद्दामुन सभागृहाच्या निदर्शनात आणून देतो की, एक शिक्षण अधिकारी असे आले की, त्यांच्याबद्दल सतत सतत तक्रारी यायला लागल्या, काय तक्रारी येणार की, रोज संध्याकाळी दिवस मावळल्यानंतर ऑफीसमध्ये दुसऱ्या

शिक्षकांना बोलावत आहे. एका दिवशी मी त्यांना सांगितले की, साहेब तुमच्याबद्दल तक्रारी आहेत. तेव्हा ते बोलले असु दे तक्रारी आणि सुदैव की दुर्दैव फक्त अर्ध्या तासाच्या आतमध्ये त्या शिक्षण अधिकाऱ्याला ॲन्टी करप्शन ब्युरोने पकडले. ही खरी शोकांतिका आहे. ही ह्या शहराची, सदनाची शोकांतिका आहे. आपण फक्त सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले......

**मिलन म्हात्रे :-**

आता विद्यमान तेच आहेत. हे आपले दुर्दैव आहे. त्यांनाच आपण आणले आहे. मानाने सन्मानाने तुमच्या महापालिकेने ठराव करुन पाठवला आहे.

**लिओ कोलासो :-**

असा कोणताही ठराव करुन महापालिकेने पाठवलेला नाही. शासनाकडून त्याची नियुक्ती झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शासन हे तुमचेच आहे.

**लिओ कोलासो :-**

साहेब, माझे म्हणणे असे आहे की, त्या ठिकाणी शिक्षण अधिकारी जरी नसले तरीपण आयुक्त साहेबांनी त्याच्यावर खुलासा करण्यापुर्वी, साहेब मी मुद्दामुन बोलतो जरी शिक्षण अधिकारी नसले बांधकाम खात्याचे अधिकारी ह्यांच्याशी संबंधित असेल. मी मुद्दामहुन उल्लेख करेन की श्री कुदरे नावाचे जे डेप्युटी किंवा सहाय्यक इंजिनिअर आहेत. या सदगृहस्थाने खरोखरच अत्यंत परिश्रम करुन आपल्या महापालिकेला साडे चार कोटी, चार कोटी छप्पन्न लक्ष रुपये एवढा निधी मिळवुन देण्यासाठी अहोरात्र आणि आटोकाट प्रयत्न केले. हे सर्व प्रकरण शिक्षण उपसंचालक, चर्नी रोड ह्यांच्याकडुन आदेश होऊन तत्वतः त्या निधीला मंजुरी मिळून हे प्रकरण पुन्हा येथे पाठवण्यात आलेले आहे आणि पुण्याहुन जसजसे शासनाकडुन निधी उपलब्ध होईल त्यापद्धतीने आपल्याला हा निधी मिळेल. अशी आमची माहिती आहे. मी मुद्दामुन जे अधिकारी ह्या प्रश्नामध्ये साडे चार कोटी या शहराच्या शिक्षण विभागासाठी मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करतात, अशा सर्व कर्मचारी वर्गाला मी धन्यवाद देतो.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, हाच प्रसंग ह्या सदगृहस्थाने म्हणजे जे श्री. कुदरे साहेब आहेत, ते एवढे चांगले काम करीत असताना प्रभाग समितीच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी त्यांना सांगितले की, तुमचे येथे काम नाही आणि तुम्ही येथुन चालते व्हा. अशी भाषा वापरली आणि एवढ्या चांगल्या अधिकाऱ्यांना जर घालवायला निघाले जर हे शासन काय चालवणार?

**मिलन म्हात्रे :-**

मी माझ्या मताशी ठाम आहे. आपण एक बाजु बघु नका.

**मिलन पाटील :-**

अशा अधिकाऱ्यांची ज्याची मागणी करतात आणि ते चांगले काम करतात.

**मिलन म्हात्रे :-**

विषय सोडून बोलू नका.

**मिलन पाटील :-**

चांगला अधिकारी, चांगले काम करतो तर त्यांची स्तुती केली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

विषय सोडून बोलू नका. त्यांचे जे काम आहे ते करतात. महानगरपालिका त्याच्यासाठीच त्यांना पगार देते. आपण विषय सोडून बोलू नका. साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे मला उत्तर पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

एखाद्या क्लेरीकल माणसाने, कर्मचाऱ्याने येऊन या ठिकाणी उत्तर देण्यापेक्षा आयुक्त साहेबांनीच उत्तर द्यायला पाहिजे.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब, या ठिकाणी उत्तर देण्यापूर्वी जे शिक्षण अधिकाऱ्यांबद्दल सभागृहाचे जे मत आहे आणि जेव्हापण शिक्षणाचा विषय आला, त्यावेळेला सभागृहाने नाराजी दाखवलेली आहे. परंतु, त्या शिक्षण अधिकाऱ्यांवरती कंट्रोल म्हणूण आपले तीन-तीन उपायुक्त बसलेले आहेत. त्याची कोणाला तरी जबाबदारी द्या ना. आज शिक्षण अधिकारी आले नाही म्हणूण आपण क्लार्कला पाचारण करतोय. प्रशासनाने कोणीतरी उपायुक्त नेमा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, ही सभागृहामध्ये उत्तर देण्याची पध्दत योग्य नाही. जर एखादा अधिकारी अनुपस्थित आहे तर त्याच्या सहकारी अधिकाऱ्याने यायला पाहिजे. सहकारी अधिकारी नाही तर क्लार्क उत्तर देऊ शकत नाही. उद्या जर क्लार्क नसेल तर शिपाई येऊन उत्तर द्या. हे काय सभागृह आहे. सभागृहामध्ये आयुक्त आणि त्याच्यावर तत्सम म्हणून उपायुक्तांनी उत्तर द्यायला पाहिजे. सन्मा. महापौरांच्या निर्देशानुसार

आपण क्लार्कला बोलावता उत्तर द्यायला आणि जर क्लार्क नसेल तर शिपाईला सांगणार का? उत्तर द्यायला. ही सभागृहात कामकाजाची पध्दत नाही. तर कृपया मा. महापौर साहेबा आपण तसे करु नका. आयुक्त साहेबांना उत्तर द्यायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शाळा-इमारतींच्या भाड्यांच्या बाबतीमध्ये सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे ह्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये प्रशासनाने उत्तर दिलेले आहे. त्याच्यामध्यें आणखी थोडीशी माहिती द्यायची म्हणजे शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी सुध्दा हा प्रस्ताव रेकमेन्ड करुन शिक्षण संचालक, पुणे ह्यांच्याकडे पाठवण्यात आलेला आहे आणि या संदर्भामध्ये कालच आम्ही त्यांना रिमायन्डरसुध्दा पाठवलेले आहे. प्रशासन या बाबतीमध्ये उदासीन नाही. हे मी आपल्याला निदर्शनास आणून देत आहे आणि शासनाकडून आपल्याला मिळणारी ४ कोटी ५७ लाख १५ हजार १७६ रुपयाची जी रक्कम आहे ती लवकरात लवकर महापालिकेला प्राप्त करुन घेण्यासाठी मी वैयक्तीक प्रयत्नशील राहीन.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ह्याच्यामध्ये जो दोन महिन्याचा कलावधी निघून गेला, त्याबद्दल आपण काय पत्रव्यवहार केला का? मी माझ्या प्रश्नात ते विचारले आहे की, दोन महिने आपण गप्प आहोत. कुठलीही कार्यवाही नाही. हा प्रश्न उद्या हेअरिंगला येणार १९ तारखेला आपण पत्र पाठवले. त्याच्यावर आपण नोंद केली. १९/०१/२००६ आणि २० तारखेला मा. महासभा आहे.

**मा आयुक्त :-**

त्यांना रिमायन्डर पाठवले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते १९ तारखेला पाठवले ना.

**मा आयु क्त :-**

होय.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा दोन महिन्यामध्ये आपण काय करत होतो? मी आपल्याला ते विचारले.

**मा आयु क्त :-**

हा प्रस्ताव जेव्हापासून पाठवलेला आहे. हा १९९३-९४ चा प्रस्ताव आहे. १९९३-९४ ते २००५ पर्यंतचा प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी नगरपरिषद बोललो. मी तत्कालीन नगरपरिषद बोललो आणि विद्यमान महानगरपालिका बोललो आणि दिड वर्षापासून माझा स्वतःचा पत्रव्यवहार आहे. माझ्याकडे फाईल आहे ती मी इथे आणली आहे. आता मला एक सांगा प्रशासनाच्या वतीने दोन महिन्यामध्ये ब्रेकअप का पडला? एकही पत्र नाही, रिमायन्डर नाही. पंधरा-पंधरा दिवसांनी रिमायन्डर गेले पाहिजे. आपली महापालिका पावणे दोनशे करोडमध्ये कर्जबाजारी आहे. १ करोड ८० लाखाच्यावरती आपली महानगरपालिका कर्जबाजारी आहे.

**मा आयुक्त :-**

ही भाड्याची जी रक्कम आहे ती तत्वतः मान्य केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मान्य आहे साहेब. ते काय तुम्हाला लगेच मिळणार नाही. आपले दर पंधरा दिवसांनी रिमायन्डर गेले पाहिजे.

**मा आयुक्त :-**

म्हणून तर आपण त्याचा सारखा पाठपुरवठा करीत आहोत ना. प्रत्येक वेळेला पत्रव्यवहार पाठवतो अशातला भाग नाही, फोनवरुनही त्यांच्याशी बोलणे होते.

**मिलन म्हात्रे :-**

मी १९/०१/२००६ या तारखेकडे आपले लक्ष वेधु इच्छितो की, हा प्रश्न उद्या येणार म्हणजे १९ तारखेला पाठवून द्या. दोन महिने आपण काहीच केले नाही हे आपण कशाला मान्य करत नाही.

**मा आयुक्त :-**

आपण सांगता त्याप्रमाणे उद्देश डोळ्यासमोर ठेवून आपण पत्र पाठवलेले नाही. खरोखरच ते पैसे महापालिकेला मिळावे या उद्देशाने पत्र पाठवले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तेच बोलतो ना. दोन महिन्यामध्ये आपला जो गॅप पडला त्याच्याबद्दलचे मी तुम्हाला विचारतोय. तुम्ही मे मान्य करा ना.

**मा आयुक्त :-**

दोन महिने गॅप पडला म्हणजे त्या दोन महिन्याच्या कलावधीमध्ये मी जवळजवळ दोन-चार वेळा त्यांच्याशी बोललो सुध्दा दुरध्वनीवरुन बोललो ना.

**मिलन म्हात्रे :-**

पण ह्याच्यात असे कुठे दिलेले आहे. मा. आयुक्तांनी चर्चा केली, दालनात भेट घेतली.

**मा आयुक्त :-**

एवढ्या सर्व बारीक सारीक गोष्टी आपण उत्तरामध्ये थोडेच देणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

साडेचार कोओीचा विषय आहे. ही बारीक सारीक गोष्ट नाही आहे.

**मा आयुक्त :-**

साडेचार कोटीसाठी आपण एवढे गांभीर्य घेता. त्याच्यापेक्षा आम्हालासुध्दा त्या विषयाचे जास्त गांभीर्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच म्हणतोय. ही छोटी-मोठी गोष्ट नाही.

**मा आयुक्त :-**

बरोबर आहे. पण या विषयाकडे दुर्लक्ष झालेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

राज्यातील नगरपरिषद........

**मोहन पाटील :-**

मा महापौर मॅडम, शिपाई उत्तर देण्याऐवजी आपल्याला कमिशनर साहेबांनी उत्तर दिले व उत्तर दिल्यानंतरही उत्तरामध्ये प्रश्न विचारायचे, तर इतरांचेही प्रश्न आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

तरतुद आहे.

**मोहन पाटील :-**

पण इतरांचेसुध्दा प्रश्नोत्तर आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

आपण मधे बोलायचे कारण नाही.

**मिलन पाटील :-**

असे नाही. एकदा कमिशनर साहेबांनी उत्तर दिल्यानंतर.........

**मिलन म्हात्रे :-**

माझा प्रश्न चालू असताना आपण मध्ये बोलणे योग्य नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण याबाबत आपण रुलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझा प्रश्न चालू असताना, मेहरबानी करुन आपण मधे बोलू नका. आमची चर्चा चालू आहे. प्रश्नावर जर चुकीचे उत्तर आले तर आपण गप्प बसाल का?

**मोहन पाटील :-**

आपली चर्चा चालू आहे व जर आयुक्त साहेबांनी उत्तर दिले .......

**मिलन म्हात्रे :-**

ते उत्तर जर चुकीचे असेल तर आपण गप्प बसाल का?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण रुलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

एखादा आकडा, फिगर चुकीचा आला तर आपण मधे बोला, मला बोलू द्या ना. आपण कशाला मधे बोलता आणि सभागृहाचा वेळ घालवता.

**मोहन पाटील :-**

सभागृहाचा वेळ घालवत नाही. आपल्याला आयुक्त साहेबांनी उत्तर दिले तरी त्या उत्तरावरही आपण प्रश्न विचारतात.

**मिलन म्हात्रे :-**

आपण दोन महिन्यामध्ये कार्यवाही केलेली नाही. त्याबद्दल तुम्ही जे काय केले ते ह्याच्यामध्ये आले नाही जर ते आले असते तर हा विषय निघाला नसता. काहीतरी उत्तर देता. ती व्यवस्थित मोडीफाय करुन, लक्ष देऊन उत्तर देत जा. आता एकतर अधिकारी उपस्थित नाही. सगळ्यांनी सांगितले व्यथा काय सांगायच्या आहेत म्हणजे आम्ही तिथेही जाऊन काय विचारु शकत नाही. मी शिक्षण अधिकाऱ्याला पत्रव्यवहार केलेला आहे. त्याचे अजुनही उत्तरही आलेले नाही. महापालिकेकडून उत्तर नाही. मी हे बोलतोय हे फक्त सभागृहामध्ये आले नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापोर महोदया, यह जो सवाल इतने साल तक आगे बढ जाते है, इसका रिझन यही है और अभी जो आयुक्त साहबने जवाब दिया और सन्मा. सदस्य आसिफ शेखजी इन्होने कहा की, यह आयुक्त साहबने जवाब देने की कोई व्हॅल्यु नही रहती। यहा चपरासीका ही जवाब जादा उचित रहेगा।

**मिलन म्हात्रे :-**

जो चपरासीको उत्तर देने दो। आपभी वही हो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमने तो समझ लिया, हम आयुक्त महोदयकी कदर करते है। मा. महापौर मॅडमकी कदर करते है। लेकीन आप कदर नही करते हो।

**मिलन म्हात्रे :-**

चपरासीका नाम लेनेका और खुदही उत्तर देनेका।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपको चपरासीका जवाबही उपयुक्त होगा।

**मिलन म्हात्रे :-**

चपरासीका नाम लेते हो और खुदही उत्तर देते है। अभी कौन है वह आप ही समझो। मै क्या बोलू?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वह तो खुदही समझदार है, कौन किस लायक है।

**मिलन म्हात्रे :-**

आप ही समझते हो इसलिए ऐसी बात करते हो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप टाईम लिमिट दिजिए।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण ह्याच्यापुढे टाईम बॉन्ड लिमिट द्या. यापुढे काय काय करणार आहोत.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांचे म्हणणे ठिक आहे पण एका सन्मा. सदस्याला चपरासी बोलणे योग्य आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

हे त्यांनी सांगितले. मी सांगितले नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांना तुम्ही बोललात ना.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्यांना त्यांची भाषा सांभाळायला सांगा.

**मोहन पाटील :-**

हे चुकीचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे चपराशाचे पदही फार आहे.

**मोहन पाटील :-**

सदस्यांनी कसे संसदीय बोललले पाहिजे. सदस्यांनी असे बोलणे चुकीचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी भाषा चांगली नाही, खराब नाही. पहिले त्यांनी काढले आपण त्यांना सुधरवा. तुमचे ते जेष्ठ सदस्य आहेत.

**मोहन पाटील :-**

आपण सुधारलेले आहात हे आम्ही मान्य करतो. परंतु, आपण बोलताना विचार केला पाहिजे. प्रत्येक सदस्य हे सदनामध्ये बसलेले आहेत त्यांना बोलताना आपण विचार केला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आपल्या माणसाला आवरा हो.

**मोहन पाटील :-**

आपण टंगळमंगळ करा. जरुरी आहे. परंतु, अशा पध्दतीची टागळमंगळ योग्य नाही.

**मिलन म्हात्रे :-**

टंगळमंगळ नाही, महत्वाचा विषय चालू आहे.

**मोहन पाटील :-**

हा ह्यांचा महत्वाचा विषय चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची कशाला टंगळमंगळ पाहिजे. मला येथुन उत्तर पाहिजे. आपण खाली बसा. आपल्याला कोणी प्रश्न विचारले नाही. मा. महापौर मॅडम, आपण मला सांगा की यापुढे आपण काय करणार आहात? दोन ओळीत आपण मला निर्णय द्या. मी खाली बसतो. मा. महापौर मॅडम, आपण आपले रुलिंग द्या. मी खाली बसतो.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण रुलिंग द्या आणि विषय संपवा.

**मिलन म्हात्रे :-**

मी दुसरे आणखी काय मागतोय.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी उपस्थित केलेला प्रश्न, संबंधित प्रश्न हा हद्दीतील शाळा-इमारती भाडे ह्या प्रश्नांसंबंधित वेळोवेळी ह्याचा पाठपुरावा सुरु आहे. नुकतेच दि. १९/०१/२००६ रोजी या दिवशी स्मरणपत्र पाठवून संबंधीत चौकशी सुरु आहे. तरीसुध्दा आपल्याला पंधरा दिवसाच्या आत, आतापर्यंत पुर्तता कार्यवाही ह्याचे संबंधित अधिकारी लेखी स्वरुपात उत्तर कळवतील आणि संबंधित कार्यवाहीला वेग देऊन याचा लवकरात लवकर निर्णय लागावा म्हणूण सर्वजण संबंधित अधिकारी हे प्रयत्नशील राहतील.

**मिलन म्हात्रे :-**

धन्यवाद.

**प्र सचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. आजच्या सभेकरीता रजेचे दोन अर्ज आलेले आहेत. श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील व श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७३ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आमची एक लक्षवेधी आहे.

(मा. महापौरांच्या परवानगीने प्र. सचिवांनी लक्षवेधीचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी मांडलेली लक्षवेधी उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर शहरातील एकाच इमारतीमधील काही सदनिकांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली आहे. या कर आकारणीमध्ये सुसुत्रता येण्याकरीता मा. महासभा दि. १९/१०/२००५ ठराव क्र. ५७ ने ठराव केला आहे. या अनुषंगाने प्रत्येक विभागातील अशा इमारतीमधील सदनिका, गाळे यांची माहिती एकत्रित करण्याचे काम सुरु असून त्यातील निर्लेखित करावयाची रक्कमांची निर्लेखित यादी मा. स्थायी समिती रक्कमांची यादी तयार करण्याचे काम सुरु आहे. अशा रक्कमा निर्लेखित करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे. सदरचे काम प्रशासनाने त्वरीत लवकरात लवकर करण्याकरीता मी प्रशासनाला तसे निर्देश देऊन ही लक्षवेधी फेटाळण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, फक्त एक बाब येथे सांगू इच्छितो की, जी माहिती आहे आपले कर उपायुक्त आणि कर विभागाचे अधिकारी ह्यांच्या दोन्हीमध्ये दुमत आहे. ते सांगतात आम्ही जे जुने रेट आहेत ते लावू शकत नाही आणि उपायुक्त साहेब सांगतात की, मा. आयुक्तांचा शेरा मिळालेला नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, पॉईंट ऑफ ऑर्डर आहे की, आपण लक्षवेधीचे जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तरावर आता चर्चा होऊ शकते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर, आपल्याला माहिती आहे, हा ठराव मागच्या वर्षापासून लांबला आहे. हा ठराव तुमचाच आणलेला आहे. आम्ही तुमचाच ठराव आणलेला आहे. आता त्याच्यातले जे आतले व्हॅल्यु आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, त्यांच्या प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे परत चर्चेला प्रश्न कुठे येतो?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तशी कार्यवाही होत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी जी लक्षवेधी मांडलेली आहे त्या लक्षवेधीमध्ये ते स्वतः कमिट करतात की, काही प्रकरणामध्ये कार्यवाही झालेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी नाही तसे तुमच्या ठरावामध्ये मांडलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरांनी तसे आदेश दिलेले आहेत की, उर्वरित कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझे असे म्हणणे आहे की.......

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण लक्षवेधीवर उत्तर देऊन लक्षवेधी फेटाळली आहे तर त्याच्यावर चर्चा करण्याचा प्रश्न येतच नाही. लक्षवेधी फेटाळली आहे म्हणजे आपल्याला त्याच्यावर चर्चा करता येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझे एवढेच म्हणणे आहे की, ज्या लोकांनी एक-एक वर्षापूर्वी अर्ज केलेले आहे, त्यांना आपण दोन ओळींचे पत्र द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण जागेवर बसून घ्या. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, हा जनसामान्यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा तुमचा अपमान आहे, आमचा अपमान नाही. तुम्ही दिले नाही तर काही बिघडत नाही. तुमच्या ठरावाला प्रशासन.....

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपले लक्ष केंद्रीत करतो की, लोकांच्या समस्या मोदग गार होत चालल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा ठराव तुम्ही आणलेला आहे. आम्ही आणलेला नाही. नाही केल तरी काही बिघडत नाही.

**शशिकांत भोईर :-**

लक्षवेधी फेटाळली म्हणून असे बोलण्यापेक्षा अधिकारीच काम करीत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

करत कराहीच नाही. तुम्ही त्याची माहिती घ्या ना. ज्या लोकांनी एक वर्षापूर्वी अर्ज केला आहे त्यांना दोन वेळा तुम्ही टॅक्स लावता.

**मिलन म्हात्रे :-**

सदर विषयाचा ठराव आपण संमत केलेला आहे. तर अधिकारी वर्ग त्याच्यावर कार्यवाही का करत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण अगोदर आमच्या प्रश्नाचे उत्तर द्या आणि मग लक्षवेधी फेटाळा. तुम्ही केलेल्या ठरावाचे अधिकारी पालन करत नाही. त्याचे पहिला बोला. आपण रुलिंग दिली आहे आणि ठराव पास झालेला आहे. आपणच सुचक व अनुमोदक आहात.

**शशिकांत भोईर :-**

आपण सांगितले आणि तरीही आपल्या ठरावावर कार्यवाही होत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठरावावर सुचक, अनुमोदक आहात आणि त्याचे पालन प्रशासन करीत नाही.

**मा. महापौर :-**

कार्यवाही सुरु आहे.

**सिंग मदन उदितनारायण :-**

कार्यवाही करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

अगोदर त्याचे उत्तर द्या आणि मग ठराव फेटाळा. एकतर्फी तिथे मोहन पाटलांशी मोबाईलवर बोलणं करायच आणि फेटाळायचे हे आम्ही बघतोय.

**मा. महापौर :-**

संबंधित अधिकारी आपल्या या विषयावर माहिती देतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो निर्णय दिलेला आहे. पण अधिकाऱ्यांनी आपल्याला चुकीची माहिती दिलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

ठराव पारित होऊनसुध्दा ठरावाची अंमलबजावणी होत नाही हे दुर्भाग्य आहे. सत्ताधारी विषय आणतात, ठराव पारित होतो आणि त्या ठरावाची अंमलबजावणी होत नाही. मा. महापौर मॅडम हे आपले दुर्भाग्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा अपमान होतो पण त्याहून तुमचा ठराव हे प्रशासन मानत नाही. हे अगोदर आपण कबुल करा.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, प्रशासन तुमचा ठराव मांनत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची प्रशासनापुढे राजकीय हार झाली हे कबुल करा आणि मग ठराव फेटाळा आणि नसेल तर त्या ठरावाचे पालन आणि कार्यवाही करा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हालाही ह्या विषयावर बोलायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या लोकांचे अर्ज आलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, हा जो टॅक्सचा विषय आहे, तो विषय मागे जी सभा झाली त्या सभेमध्ये पास झालेला आहे आणि तो ठराव असा झालेला आहे की, सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांच्या मताशी सहमत आहे. आणि मी अर्जदेखील दिलेला आहे आणि ग्रामपंचायत पासुन जो टॅक्स लागला गेला आहे तो तसाच रहावा आणि ज्या नविन इमारती आहेत, त्यांना टॅक्स आता जो चालू प्रमाणात आहे त्याचपध्दतीने देण्यांत यावा असा ठराव पास झालेला आहे. आणि ज्या जुन्या घरांना नविन टॅक्स लागलेला आहे तो माफ करण्यात येईल. पण ह्या चालू वर्षाच्या आतमध्ये, सन २००६ मध्ये केला जाईल असा ठराव झालेला आहे. मग परत त्याच्यावर रिपीट करण्याचा अधिकार नाही.

**शशिकांत भोईर :-**

सन २००६ चा ह्याच्यात कुठे उल्लेखच नाही. २००६ नंतर असा कुठे उल्लेख नाही. आपण ठरावामध्ये दुरुस्ती केली असेल तर.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ठरावाची अंमलबजावणी ही होत नाही.

**परशुराम पाटील :-**

आता ह्याची अंमलबजावणी चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण सत्ताधाऱ्यांनी केलेला ठराव, संमत केलेला ठराव त्याच्यावर प्रशासन कार्यवाही करत नाही.

**मा. महापौर :-**

या विषयावर कार्यवाही सुरु आहे. गेल्या सभेमध्ये हा विषय पास करुन घेतलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला अधिकारी हे चुकीची मोहिती देतात.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय तीन वर्षापासून चालू आहे. अजून तीन वर्षापासून त्याची माहितीच जमा झालेली नाही का?

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत मंजूर करत आहे. इतिवृत्तांतावर दुरुस्ती असेल तर सुचवा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपका ठराव पास किया हुआ है। आपही उसे कार्यान्वित करना नही चाहते हो, तो आपको आपके राज्य मे जनता का कुछ भला करनेका ही नही है ऐसा लग रहा है। आपके राज्य मे आपको कुछ करनेका नही है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण दिलेले निवेदन अजूनपर्यंत पालन करत नाही.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे सभागृह कशासाठी चालते? लोकांची भावना व्यक्त करण्यासाठी ना. तुम्ही रुलिंग दिले व रुलिंग दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी काम नाही करायचे का? आणि तरी पण तुम्ही त्यांची बाजु घेता. त्यांना तुम्ही विचारायला पाहिजे, नक्की काय आहे?

**शरद पाटील :-**

आणि त्याच्यात असा उल्लेखच केला नाही की, आता परत २००६ चे पडेल.

**मोहन पाटील :-**

लक्षवेधी फेटाळण्यानंतर लक्षवेधीवर चर्चा होत नाही. आपल्याला लक्षवेधीचे उत्तर दिले आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, कर अधिक्षक अधिकाऱ्यांनी काहीही प्रॉपर माहिती दिलेली नाही. कर अधिक्षकांनी काय पत्र दिले आहे. ते आपण मागवा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौरांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्याची अंमलबजावणी का होत नाही? आम्ही ते विचारतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, काहीही कार्यवाही चालू नाही.

**सुधा गोयंका :-**

मॅडम, काहीही कार्यवाही चालू नाही.

**शशिकांत भोईर :-**

मुग गिळून बसले आणि डोळ्यावर पट्टी बांधून बसलेले आहेत. अधिकारी हे काहीही काम करीत नाही.

**सुधा गोयंका :-**

फक्त तेच कानुन ओळखतात बाकी कोण कानुन ओळखतच नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना सांगु इच्छितो की, निर्लेखित रक्कमा करण्याची कार्यवाही चालू आहे. निर्लेखित रक्कमांची माहिती जमा करुन आणि तो विषय स्थायी समितीसमोर आणावा लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्या प्रशासनाने गोषवारा द्यायला पाहिजे होता.

**सुधा गोयंका :-**

कौनसी कार्यवाही आप लोग कर रहे हो।

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, रक्कमा निर्लेखित करण्याबाबत माहिती मागवली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण डोळ्यावर पट्टी बांधून काम करता.

**सुधा गोयंका :-**

माहिती कशाबद्दल मागवता?

**परशुराम पाटील :-**

आपला ठराव पास झालेला आहे आणि आपल्याला त्याची अंमलबजावणी करायची आहे. हा विषय परत स्थायी समितीसमोर घेण्याची आवशक्ता नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अंमलबजावणी चालू आहे आणि नेमक्या किती रक्कमा निर्लेखित केल्या .......

**परशुराम पाटील :-**

आपण तसे सांगु नका. ठराव पास झालेला आहे त्याची अंमलबजावणी करायला पाहिजे. हा विषय जेव्हा मा. महापौर साहेबांनी आणला.

**शरद पाटील :-**

साहेब, हा विषय तीन वर्षापासून चालू आहे आणि आणि तीन वर्षे झाले. जर माहितीच जमा होत नसेल तर ह्या महापालिकेचे आणि या शहराचे कसे काय व्हायचे?

**शशिकांत भोईर :-**

अधिकाऱ्यांची कार्यवाही काय आणि त्यांची कामं काय? त्यांनी घरी बसावे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

निर्लेखित रक्कमांची माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे.

**शरद पाटील :-**

हे काम तीन वर्षापासून चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेबांना हा विषय घ्यायला लावला आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

निर्लेखित रक्कमा गोळा केल्याशिवाय .....

**रोहीदास पाटील :-**

दीड वर्षापासून हा विषय चालू आहे. तुमच्याकडून एक तितोर मिळत नाही.

**सुधा गोयंका :-**

साहब, आप महिती जमा करके क्या करना चाहते हो।

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

किती रक्कमा निर्लेखित केल्या हे कळल्याशिवाय विषय पुढे चालत नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेबांनी जेव्हा विषय घेतला होता तेव्हा तुम्ही गोषवारा द्यायला पाहिजे होता.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सर्व रक्कमा एकत्रित निर्लेखित करण्यात येणार आहे.

**सुधा गोयंका :-**

ठराव क्या हुआ है, एकही बिल्डींगमे जो रेट सबसे पहिले लगा था, वह लगाव।

**रोहीदास पाटील :-**

आता तुम्ही ठरावाची अंमलबजावणी करा.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अंमलबजावणीचे काम चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

काही करत नाही. अंमलबजावणीचे काम चालू नाही. आपण विभागाला आदेश दिले, कार्यवाही करायची नाही. त्याला जबाबदार कोण? आपण असे आदेश दिले आहे.

**सुधा गोयंका :-**

आप माहिती जमा करके क्या करना चाहते हो। ठराव तो किया है और आप किस चीज की माहिती जमा कर रहे है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण केलेल्या ठरावाची जर अंमलबजावणी होत नसेल तर अशा अधिकाऱ्यांना आपल्या येथुन कार्यमुक्त करावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ठराव ठेवले आहे आणि अधिकारी हे आपल्या ठरावाचे पालन करत नाही. हा तुमचा अपमान आहे, आमचा नाही.

**सुधा गोयंका :-**

वह हर व्यक्ती की एकदम दिशाभूल कर रहे है।

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्याने होत नाही. आपण केलेला ठराव ज्यावेळेस आपण रितसर विषय आणूण ठराव केला त्यावेळेस त्यांनी गोषवाऱ्यामध्ये माहिती द्यायला पाहिजे होती की, खालील रक्कमा निर्लेखित कराव्या लागतील. असे त्यांनी ठरावामध्ये दिलेच नव्हते. त्यांचे काम होते की, नाही गोषवारा देण्याबाबत.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, लक्षवेधी सुचनेवर आपण आपले मत मांडावे.

**शशिकांत भोईर :-**

लक्षवेधी नाही. आपण ठराव मानला नाही. त्यांच्यावर आमचा प्रस्ताव आहे. लक्षवेधी फेटाळली आहे. पण प्रशासन तुमचा ठराव मानत नाही.

**सुधा गोयंका :-**

आप लोग सोये हुए थे।

**मिलन म्हात्रे :-**

तुमची राजकीय हार झाली आहे हे आपण कबुल करा. प्रशासन तुमच्या ताब्यात नाही. तुमच्या ठरावाचे अवमुल्यन झालेले आहे. तुमच्या ठरावाला काडीची किंमत प्रशासन देत नाही. उद्या बहुमताने झालेला ठराव केराच्या टोपलीमध्ये टाकलेला दिसेल.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सदर विषयाबाबत प्रशासनाकडून ज्या काही कार्यवाही बाकी आहेत, तर मी आपणांस विनंती करतो की, आपण त्यांना एक विहित कालावधी द्यावा आणि ह्या कालावधीमध्ये उरलेले सर्व प्रकरण निकाली लावावे.

**मिलन म्हात्रे :-**

सदस्यांनी प्रस्ताव दिले की, ते फेटाळायचे. त्याची पार्श्वभूमी बघा. ते तुम्ही केलेले ठराव आहेत. तुमच्या ठरावावर आयुक्त साहेबांनी डिसीजन घेतले नाही तर लगेच त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे की, तुम्ही हे घेतले नाही. सुचक, अनुमोदन हे सगळे तुम्हीच आहात, आम्ही लोक नाही आणि पानपट्टे ह्यांना घेणारे देखील तुम्हीच.

**शशिकांत भोईर :**

मा. महापौर मॅडम बोलल्या की, रितसर आणले जाईल पण जेव्हा विषय आला तेव्हाच गोषवारा द्यायला पाहिजे होता.

**मिलन म्हात्रे :-**

कशाला रितसर आणता? हा प्रस्ताव आपण मंजुर करा. काही गरज नाही. नियम, कायदा तोच आहे. सेक्शन तेच चालते का, तुम्ही आणल्याने सेक्शन बदलणार आहे का? विषय आणि सेक्शन बदलू शकत नाही. दिड वर्षापासून आज स्थायी समिती आहे, मा. महासभा आहे आणि त्या ठरावाचा केरकचरा झाला आहे आणि दुर्दैवाची बाब आहे की, ह्या सगळ्या नगरसेवकांच्या वॉर्डमधला हा प्रश्न आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, यह दि. ३०/१०/२००५ को ठराव नक्की हो गया था और अभी तक तीन महिने तक इनको माहिती नही मिली और वापस से इस विषय को लक्षवेधी बोलकर लाना पडा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सर्वांच्या पोटात दुखते पण पोट दुखते म्हणून कोण सांगत नाही. सर्वांच्या पोटात दुखत आहे पण कोणी सांगत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ह्यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर, या विषयाची कार्यवाही करण्यासाठी अजून दोन महिन्याचा कालावधी देण्यांत येत आहे. त्यांनी त्या दोन महिन्यामध्ये संबंधित विषय पुर्णपणे संबंधित अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात कळवावा की, कुठल्या प्रकारे कार्यवाही केलेली आहे आणि ही कार्यवाही पुर्ण होण्यासाठी आयुक्त साहेबांनी लक्ष देऊन ताबडतोब कार्यवाही करावी असा मी आदेश देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दिड वर्षे झाले, कार्यवाही न झाल्यास आर्थिक जबाबदार कोण?

**मा. महापौर :-**

गेल्या महिन्यामध्ये ठराव झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांनी अर्ज केलेला आहे, ज्याने मागितले त्यांनी पैसे भरलेले नाही. आता ते पैसे भरणार नाही. अजुन दोन महिने त्याच्यावर निर्णय होणार नाही. गेल्या वर्षाचे व्याज, ह्या वर्षाचे व्याज.....

**मिलन म्हात्रे :-**

आर्थिक नुकसानीला जबाबदार कोण?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य बसून घ्या. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**रोहिदास पाटील :-**

व्याज आकारणार नाही असे आपण जाहिर करा ना.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, यह जो अधिकारी साहब बोल रहे है की, दो महिने के बाद जवाब देंगे......

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपल्याला ह्याचे उत्तर द्यायला लागेल. जनतेचे काय ते सांगा. अधिकाऱ्यांना तुम्ही सांभाळा.

**कैलासबेन जानी :-**

मॅडम, व्याजाचे काय?

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, आपण सांगा की, पॅनल्टी लावणार नाही.

**कैलासबेन जानी :-**

हजार रुपये पॅनल्टी लावतात. तुम्ही सांगा पॅनल्टी लावणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

व्याज आकारणार नाही असे आपण सांगा. ज्यात डिस्प्युट आहे त्यांना व्याज लावणार नाही असे आपण सांगा.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, ह्याच्यात आपलीच हार आहे असे आपण माना आणि तशी सुचना करा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण या विषयावर करणार नाही का?

**कैलासबेन जानी :-**

मॅडम, आपण सांगा पॅनल्टी घेणार नाही तर आम्ही बसणार.

**रोहिदास पाटील :-**

त्यांचे अर्ज पेंन्डींग आहे त्यांना तुम्ही व्याज, दंड लावणार का नाही लावणार? तो खुलासा करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

दिड वर्ष सफिशिएन्ट पिरिएड आहे. दिड वर्ष झाल्यानंतर आपण बोलतोय. तरी त्यांना अजुन दोन महिने पाहिजे. पावणे दोन वर्ष आपण भजन करत बसणार का? आणि आर्थिक नुकसान झाले त्याचे जबाबदार कोण? जे येणे आहे ते येत नाही. त्यामुळे त्याचा बजेटवर परिणाम होतो.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सीधा साधा ठराव था। उसके उपर अंमलबजावणी करने की जगह पर आपने उलटी कार्यवाही चालू की, अभी माहिती लेने के लिए शुरुवात कर रहे है।

**रोहिदास पाटील :-**

जे डिस्प्युट आहे त्याच्यावर महापालिकेची काय भुमिका आहे ते जाहिर करा ना. त्यांना तुम्ही दोन महिने दिले पण नागरिकांचे काय?

**कैलासबेन जानी :-**

नागरिक किती परेशान आहेत? ते किती वेळा येतात? महापालिकेत ते तीन-तीन, चार-चार वेळा फेऱ्या मारतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही शरमेची बाब आहे. या महापालिकेच्या सभागृहामध्ये ठराव होतात आणि अधिकारी हे त्याच्यावर कार्यवाहीच करत नाही. कशाला मा. महासभा पाहिजे? कोणाला मा. महासभा पाहिजे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ठरावावर कार्यवाही होत नाही. मग मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कामे कशी होतात? ह्यांच्या वॉर्डामध्ये कामे कशी होतात? रस्ते कसे बनतात? गटारे कशी बनतात?

(सभागृहात गोंधळ)

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा जनतेचा प्रश्न आहे. त्याच्या हिताचा प्रश्न आहे.

**शुभांगी नाईक :-**

हा बांधकामाचा प्रश्न नाही. हा कराचा प्रश्न आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आणि आर्थिक नुकसानीला कोण जबाबदार?

**शुभांगी नाईक :-**

यामध्ये अर्थिक नुकसान किती होत आहे? महापालिकेचे नुकसान किती होत आहे?

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आमच्यासाठी भांडत नाही. आम्ही जनतेसाठी भांडत आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७३, दि. २०/०९/२००५ व दि. १९/१०/२००५ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह सदरचे इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांताची पाने कधी वाचली?

**मा. महापौर :-**

सचिवजी, पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ७३ :-**

दि. २०/०९/२००५ व दि. १९/१०/२००५ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७८ :-**

दि. २०/०९/२००५ व दि. १९/१०/२००५ रोजीचे मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७४ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुमचे हे काय चालले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांताची पाने कधी वाचली?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हांला सभा घ्यायची नाही का? मॅडम, लोकशाहीची इज्जत ठेवा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर, आपको अगर इसी तरह सभा चलाने की है तो मा. महासभा की जरुरत क्या है? अपने कॅबिन मे ही ठराव पास कर दो, मा. महासभा की क्या जरुरत है?

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडम, आप ही ठराव मंजुर कर दो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपके कॅबिन मे सब ठराव करा। सब ठराव उधर ही करा। सभा उधर ही लो।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलायला संधी दिल्यानंतर एका वेळेस एकाने बोला. सगळेजण एकत्र उठून गोंधळ घालू नका.

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ४१, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास कामे, भुमीपूजन, उद्‌घाटन समारंभ, नामफलक, निमंत्रण पत्रिकेबाबत धोरण निश्चित करणे याबाबतीमध्ये प्रकरण क्र. ४१, मा. स्थायी समिती दि. २२/०१/२००४, ठराव क्र. १९२ याबाबत फेरविचार करणे. तसेच, महानगरपालिका कामाची भुमिपूजन, उद्‌घाटन समारंभ, नामफलक बाबतचे धोरण निश्चित करणेबाबत प्रकरण क्र. २२१ असे दोन ठराव स्थायी समितीचे या सदनामध्ये पास झाले होते. परंतु, मागच्या वेळेला आपण जो नगरसेवक फंड वापरतो तो नगरसेवक फंड सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आणि त्यांचे सहकारी ह्यांनी हा फंड जो भाईंदर पोलिस स्टेशन येथे वापरला व जी निमंत्रण पत्रिका काढली त्या पत्रिकेमध्ये सन्मा. महापौरांचे नांव त्या पत्रिकेमध्ये नव्हते. म्हणून हा विषय याकरिता येथे आहे. धोरण निश्चित होणे फार आवश्यक आहे. परंतु, प्रोटोकॉलप्रमाणे जो नगरसेवकांचा फंड आहे, हा फंड नगरसेवकांचा वैयक्तिक फंड नाही. त्यांच्या खिशातून ते पैसे देत नाही. हा जनतेचा पैसा आहे. महानगरपालिकेतर्फे आपण तो पैसा देतो म्हणून त्या फंडावर संपुर्णपणे अधिकार हा महानगरपालिकेचा आहे आणि जेव्हा महानगरपालिका खर्च करायला तयार होईल तेव्हा सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सन्मा. स्थायी समिती सभापती, सन्मा. सभागृह नेते, सन्मा. विरोधी पक्षनेते ही सर्व मंडळी जी आहेत आणि जे अन्य सभापती आहेत त्या सर्वांची नांवे त्या भूमिपुजनाच्या नामफलकावर असायला पाहिजे, पत्रिकेमध्ये असायला पाहिजे. परंतु, असा कार्यक्रम मागच्या वेळेला जेव्हा झाला त्या पत्रिकेमध्ये कोणतेही नांव नव्हते. म्हणून त्याकरिता विषय या ठिकाणी आपण आणलेला आहे. तरी ह्याचे धोरण निश्चित होणे फार जरुरी आहे. म्हणून प्रोटोकॉलप्रमाणे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते आणि अन्य सभापती ह्यांचे नांव भूमिपुजनाच्या फलकावर यायला पाहिजे, सुचना फलकावर यायला पाहिजे. म्हणून या ठिकाणी हा विषय आणलेला आहे. कृपया आपण तशा पद्धतीचे निर्देश प्रशासनाला द्यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, जैसा अभी सन्मा. सदस्य मोहन पाटील इन्होंने कहा, अगर कोई सेलिब्रेट करता है तो ठिक है और गटार बनायेंगे तो उधर भी महापौर मॅडम और उपमहापौर साहब का फलक लगाने का क्या?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, हा जेव्हा ठराव झाला त्यात त्यांनी स्थायी समिती सभापती ह्यांनी कोणतीही नशापाणी केलेली नव्हती. नशापाणी न करता मी बोललो काय........

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी केलेल्या वक्तव्याला आमचा आक्षेप आहे की, सभा.....

**मोहन पाटील :-**

नशापाणी न करता तुम्ही सभागृहात आहात आणि आम्ही सभागृहात आहोत.

**लिओ कोलासो :-**

सभागृहात नशापान कोण करुन आलेले?

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

ही कुठली भाषा आहे आणि ती जी वास्तु आहे ती पी.डब्ल्यु.डी.ची वास्तु आहे. त्या वास्तुवर जर खर्च करायचा असेल, खर्च करतांना त्याचा प्लॅन आपण मंजुर केला का? ते करणे आवश्यक बाब आहे ना?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते काम प्रशासनाचे आहे.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलू इच्छिते की, माजी महापौर मॅडम ज्यावेळेला हस्तगत होते त्यावेळेला सुदामा नगरच्या टाकीचे भूमीपुजन केले होते. तेव्हा आमच्या विभागातील जे चारही नगरसेवक आहेत त्यापैकी एकच नगरसेवक राष्ट्रवादीचा तिथे गेला आणि आम्हां तिघांनाही त्याने बाजुला ठेवले होते आणि त्याबद्दल मी पत्रही दिले होते. तिथे आमच्या टाकीवर नांवसुद्धा नाही. मग तुमचे लोक असे करतात ना?

**मोहन पाटील :-**

नगरसेवकांच्या नावाचा प्रश्न नाही. मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती ह्यांची नांवे लिहायला पाहिजे ना?

**रक्षा शाह :-**

त्यांचे नांवे पाहिजे तर आमची पण नांवे पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

ठराव तुम्हीच केलेला आहे ना?

**मोहन पाटील :-**

ठराव आम्हीच केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण सद्सद्विवेकबुद्धीने ठराव केला होता.

**मोहन पाटील :-**

त्यावेळी ठराव केला होता म्हणून आज विषय कसा आला तर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी ना? धोरण निश्चित व्हावे म्हणून आपण येथे विषय आणला आहे ना?

**रक्षा शाह :-**

महानगरपालिका का काम जहाँ होता है, वहाँ सबका नाम आना चाहिए।

**मोहन पाटील :-**

आम्हांला मागचा इतिहास बघायचा नाही. जे धोरण आहे ते धोरण निश्चित व्हावे म्हणून आपण हा विषय येथे आणला आहे.

**कैलासबेन जानी :-**

नगरसेवकाचे नांव यायला पहिजे ना? पण नगरसेवकांना मॅसेजसुद्धा देण्यांत आला नव्हता.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवक निधीच्या व्यतिरिक्त इतर जे महानगरपालिकेच्या वतीने कामे केली जातात, त्या ठिकाणी नगरसेवकांचे बोर्ड का लागले जातात? ह्यांच्या प्रयत्नाने, त्यांच्या प्रयत्नाने. आमच्या प्रयत्नाने काम होत नाही का? की, आम्ही करत नाही असे आहे का? ते बोला.

**मोहन पाटील :-**

तुम्ही प्रयत्न करत नाही. प्रयत्न सत्ताधारी पक्ष करतात.

**शुभांगी नाईक :-**

असा नियम आहे का?

**मोहन पाटील :-**

सत्ताधारी पक्ष ठराव मंजुर करतो आणि काम करतो.

**रोहिदास पाटील :-**

सत्ताधारी खोड्या लावायचे काम करतात असे सांगा ना.

**शुभांगी नाईक :-**

मग एकाही नगरसेवकाचे बोर्डावर नांव नाही आले पाहिजे. पाण्याचा प्रश्न आला की, ह्यांचे नांव टाका. ह्याचा प्रश्न आला, त्याचे नांव टाका. मग आम्ही काय करायचे?

**मोहन पाटील :-**

सत्ताधारी पक्ष ठराव मंजुर करते.

**शरद पाटील :-**

सत्ताधारी पक्ष ठराव मंजुर करते, पण त्याला सर्वानुमते मंजुर मिळते ना? मा. महापौर मॅडम, सत्ताधारी पक्ष जरी ठराव मंजुर करत असले तरी त्याला आम्ही सर्वानुमते मंजुरी देता ना.

**मोहन पाटील :-**

सत्ताधारी पक्ष आपल्या बरोबर असायला पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

आम्ही कामे मांडावी आणि दुसऱ्याने प्रयत्न करावे असे आहे का?

**मोहन पाटील :-**

सहकाराची भुमिका असायला पाहिजे. बोलण्या आधी, आपण सहकार्य मागता आणि आम्ही तुम्हांला सहकार्य देतो.

**शुभांगी नाईक :-**

हा जनतेचा पैसा आहे, आपला पैसा नाही. माझे म्हणणे असे आहे की, नगरसेवक आपल्या स्वतःचे बोर्ड लिहितात, हे कितपत योग्य आहे? आम्ही कामे मांडतोय.

**मोहन पाटील :-**

म्हणून त्याचे धोरण निश्चित करण्यासाठी विषय येथे आलेला आहे.

**शुभांगी नाईक :-**

कोणी एका सदस्याने आपले बोर्डावर नांव लिहायचे नाही की, ह्याच्या प्रयत्नाने आणि त्याच्या प्रयत्नाने. निधी असेल तर निधीचाच घ्या. बाकी कोणताही घ्यायचा नाही, एकाही सदस्याने.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, किती वेळा धोरण निश्चित करणार? त्या वेळेस आपणच सभापती होता आणि तुमचाच ठराव आहे. किती वेळा धोरण निश्चित करायचे?

**मोहन पाटील :-**

धोरण निश्चित करण्यासाठी पुन्हा विषय येथे आणला ना?

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यावेळी काय कमी होते, ते आज तुम्हांला खोचटलय, खटकलंय. त्या ठरावात काय कमी होती आणि आता काय कमी आहे?

**मोहन पाटील :-**

धोरण निश्चित करण्यासाठी हा विषय येथे आणलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७४ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

या ठरावाला मी उपसुचना सुचवितो.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या ठरावावर आपण माझी सुचना लक्षात घ्या की, जो ठराव आता वाचून दाखवला त्याच्यात प्रोटोकॉलप्रमाणे आयुक्त साहेबांचे नाव वर असायला हवे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय क्र. ७४ महापालिकेच्या विविध कामांसाठी आपण जे उद्घाटन करतो त्यावेळेस कुणाची नावे असावीत यासंबंधी ठराव झालेला आहे. मी आपणाला दि. २९/०८/२००५ रोजी पत्र पाठवले होते, त्याचे उत्तर मला अद्याप मिळालेले नाही कदाचित आपल्या महापालिकेत उत्तर न देण्याची पद्धत असेल. हे मला माहित नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील माझ्या प्रभागातील दोन कार्यक्रमाचे उद्घाटन होते. दि. २९/०८/२००५ रोजी आता ज्यांची नावे घेतली, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. विरोधी पक्ष नेते, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेते ह्यांची नावे त्या पत्रिकेमध्ये येतील. तशा तऱ्हेची पाटी त्या कार्यक्रमाच्या स्थळी आपण लावलेली आहे. परंतु, आपले काही राजकीय आराखडे असतील, कदाचीत वेळ नसेल. काहीही कारण असु असेल. त्या कार्यक्रमाला कोणी आले नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की,

कार्यक्रम महापालिकेचे आहे. कार्यक्रम जयंत पाटील, प्रफूल्ल पाटील किंवा लिला पाटील ताई ह्यांचा नाही. महापालिकेने पन्नास लाख रुपये खर्च करून तो तलाव बनवला. त्या तलावाचे उद्घाटन त्यावेळेस थोडीशी कॉन्ट्रासी झाली होती. शिवसेनेवाल्यांनी अगोदरच केले. तो त्यांच्या कार्यक्रमाचा वेगळा भाग असु शकेल. परंतु, त्या कार्यक्रमाला आपल्या पैकी कोणीही आलेले नाही. मला आठवते की, सभापती सुरेखा गायकवाड हे त्या कार्यक्रमाला आले होते. मला असा प्रश्न विचारायचा आहे की, त्या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून जर महापौरांचे नाव असेल किंवा मा. आयुक्त, मा. उपमहापौरांचे नांव असेल आणि जर ते आले नाही तर काय करायचे? पाटीवर लिहिलेले नाव वर्षानुवर्षे तिथेच राहणार आहे. आपण येणार म्हणुन लोक जमलेली असतात. आपले मार्गदर्शन ऐकण्यासाठी लोक तिथे येतात. परंतु, तेव्हा आपण आला नाहीत, येऊ शकला नाहीत मग तिथे बनवलेल्या पाटीचे आपण काय करायचे? ती पाटी आपण काढुन टाकायची का? त्यावेळेस ज्यांनी कोणी उद्घाटन केले त्यांचे नाव टाकायचे का? आपण यावर रुलिंग द्यायला पाहिजे. याबाबतीत आपला निर्णय व्हायला पाहिजे, कार्यक्रम महापालिकेचा आहे. कार्यक्रम कोणाचा वैयक्तीक नव्हता. आपल्याला आम्ही त्यावेळेस भेटलो. संध्याकाळी साडेतीन वाजेपर्यंत आपली भेट झाली. आपण येणार असे कबुल केले. माझ्या माहितीप्रमाणे आपली तब्येत बरोबर नव्हती आणि येणाऱ्याला जर कोणती अडचण असेल तर त्याने तसे कळवणे गरजेचे आहे. त्यांनी सांगीतले पाहिजे की, या कारणामुळे मी येउ शकणार नाही. सगळेच कार्यक्रमाला येतात अशातला भाग नाही. याबाबतीत आपला निर्णय काय? मी आपल्याला त्यावेळेस पत्र पाठवले आहे. सभागृहाने या गोष्टीचा निर्णय घ्यायला पाहिजे. कारण कार्यक्रमाच्या पाटीवर नाव लिहिलेले आहे. ते टाकण्याचा कार्यक्रम आम्ही करणार आहोत.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी जो सुझाव मांडला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. कारण मॅडम, आम्ही तिन्ही नगरसेवकांनी येउन आपल्याला आमंत्रण केले होते आणि अगदी उत्सुकतेने आम्ही तुमची वाट बघत होतो. त्या पाटीवर तुमचे जे नाव आहे ते पुसायचे का, ठेवायचे?

**जयंत पाटील :-**

हा अपमान जयंत पाटीलांचा होत नाही तर हा महापालिकेचा आहे. महापालिकेचे पदाधिकारी आपले आम्ही स्वागत करायला तयार आहोत, लोक स्वागत करायला तयार आहोत.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याला अजून एक गोष्ट सांगू इच्छिते......

**मिलन पाटील :-**

काहीतरी तत्काळ अपर्यायी कारण असु शकते ना.

**जयंत पाटील :-**

काही अपर्यायी कारण असु शकते ते सर्वांना समजते, पण त्याठिकाणी सौजन्य असायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी सुचना मांडलेली आहे. आपण तत्कालीन जे नगरभवन बांधले होते, नगरपालिकेच्या वेळेला. त्या वेळेला नगरपालिकेच्या नगरभवनावर रामदास आठवलेजी मंत्री महोदय येणार होते आणि त्यावेळी काही कारणस्तव ते येउ शकले नाही. परंतु, आजपर्यंत त्याठिकाणी ती पाटी अशीच आहे ना.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम आजारी होत्या तर सगळेच आजारी झाले का?

**मिलन पाटील :-**

ते चूकीचे आहे. उद्घाटक म्हणुन नाव असते ते नाव लिहायचे असते. ते आले नाही तर त्यांचे नाव टाकायचे नाही.

**लिला पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील त्यावेळेस सगळेच आजारी पडले का? मा. उपमहापौर, मा. आयुक्त हे सगळे आजारी पडले का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना शहराची काय कदर नाही का? ते आले नाही त्याच्यावरुन समजते त्यांना आपल्या शहराची कदर नाही. तिथे त्यांचे नाव टाकायचे नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब हा कार्यक्रम महापालिकेचाच होता ना.

**मोहन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. पण एकदा पाटी लागल्यानंतर ती पाटी लागते. सन्मा. पाहुणे आले पाहिजे हा विषय बरोबर आहे. परंतू, एखाद्या वास्तुवर जर महापालिकेत मोठी वास्तु बांधली व पाहुण्यांचे नाव आपण लिहिले तर ते नाव पुन्हा काढता येत नाही. तिथे नाव असतेच ना.

**मिलन म्हात्रे :-**

जो उद्‌घाटन करतो त्याचे नाव टाकायचे असते.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ११ नव्हेंबरला गटाराचे ओपनिंग केले. त्यावेळी आम्ही तुम्हाला ह्यासाठी आमंत्रण केले नाही कारण तलावाच्या वेळेला आपण आल्या नाहीत. ११ नव्हेंबरला आम्ही गटाराचे ओपनिंग केले त्यादिवशी प्रफुल्ल पाटील ह्यांचा वाढदिवस होता. तेव्हा आम्ही जाणुन बुजुन तुम्हाला बोलावले नाही. कारण आपण आमचा अपमान केला. लोकांपुढे आमचे हसु झाले आणि त्याच्यानंतर दुसऱ्या आठवड्यात आपण जाउन, सन्मा. सदस्य मोहन पाटील, सन्मा सदस्य आसिफ शेख जाऊन तिथे ओपनिंग केले, त्याला काय अर्थ आहे का? आपण कोणाला सांगीतले? नगरसेवकांना सांगितले का? तुम्ही जर आम्हाला सांगीतले असते तर आम्ही सगळे नगरसेवक आलो असतो आणखी सात आठशे माणसे घेऊन सन्मानाने तुमचे आथित्य केले असते.

**जयंत पाटील :-**

महापालिकेच्या वास्तुचे उद्‌घाटन करतान आपण कुठलेही राजकारण बघू नये असा नियम आहे. अलिखित नियम आहे. त्याच्यामध्ये कुठलेही राजकारण आणता कामा नये. कारण आपण प्रथम नागरीक आहात. आपल्याला येथे खूप मोठे मानाचे स्थान आहे आणि आपण पक्ष विरहीत रहायला पाहीजे. सन्मा. सदस्य मोहन पाटील काय बोलतात? खालून फोन करतात की वरुन काय उत्तर येते, हा महत्वाचा भाग नाही. महत्वाचा भाग असा आहे की, आपण या शहराचे प्रथम नागरिक आहात.

**मा. महापौर :-**

तुमचे आमच्या फोनवर बारीक लक्ष असते.

**जयंत पाटील :-**

सगळ्यांचेच आहे.

**मा. महापौर :-**

आपण सभागृहामध्ये विषय मंजुर करण्याकरिता येता की, फोन बघायला येता, कोण फोन करतो?

**मिलन पाटील :-**

फोन करून आपण या शहराची वाट लावता.

**मा. महापौर :-**

म्हणजे फोन टॅपींग करता का?

**जयंत पाटील :-**

आमचा कॉंग्रेस पक्ष फोन टॅपींग करत नाही.

**मोहन पाटील :-**

तुमच्या बरोबर राष्ट्रवादी पक्ष आहे, तोही फोन टॅपींग करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

फोनवरूनच या शहराची सगळी वाट लावता चुकीचे स्टेज बरोबर सांगता.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील आपण समर्थन करू नका.

**मोहन पाटील :-**

आम्ही समर्थन करित नाही.

**जयंत पाटील :-**

आता आपण बोलतात की, आजारी असतील, रामदास आठवलेजी आले नव्हते तसा हा भाग नाही. हा कार्यक्रम महापालिकेचा आहे.

**आसिफ शेख :-**

रामदास आठवलेजी आले होते पण अशोक चव्हाणजी आले नव्हते.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे ते आम्हाला मान्य आहे.

**मोहन पाटील :-**

पाटीवर असलेली नाव खोडता येत नाही, काढता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

उद्‌घाटनाला का आले नाही ते पण सांगा. ह्याच्यामागे कारण होते.

**जयंत पाटील :-**

सौजन्य असायला पाहिजे ना.

**मोहन पाटील :-**

साहेब, सौजन्य आहे. परंतु, असा विषय घ्यायचा नाही, पाटीवर नाव आहे ते नाव काढण्याचा विषय येतच नाही.

**जयंत पाटील :-**

न येण्यामागे राजकीय कारण आहे.

**लिला पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींनी तिथले ओपनिंग केले तर त्यांच्या नावाची तिथे पाटी लावु का?

**जयंत पाटील :-**

आणि जरी कोणी आले नाही तरी कार्यक्रम थांबत नाही. हा महत्वाचा भाग लक्षात घ्या. कार्यक्रम करण्याची क्षमता आमच्यामध्ये नक्कीच आहे.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे आणि तो कार्यक्रम लावुन घ्यायचे व तो कार्यक्रम झाला पाहिजे म्हणुन पालिका प्रशासन आपल्या बरोबर आहेच ना.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, या ठिकाणी प्रकरण क्र. ७४ मिरा भाईंदर महापालिकेच्या विकास कामांची भुमीपुजन, उद्‌घाटन समारंभ, नामफलक, निमंत्रणपत्रिका धोरण निश्चित करणेबाबत विषय आलेला आहे व या संदर्भात ठराव झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आम्हाला या विषयामध्ये काही सुचना करायच्या आहेत. त्या सुचना त्या ठरावामध्ये सामावून घेण्यात याव्यात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला या विषयाबाबत ठराव मांडायचा आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये आम्हाला सुचना मांडायच्या आहेत.

**आसिफ शेख :-**

या विषयावर सुचना करतो ते आपण त्या ठरावात नमुद करुन घ्या. पहिला जो स्थायी समितीचा ठराव झाला होता तो दि. २२/०१/२००४ ठराव क्र.१९२ सुचक होते शरदजी पाटील आणि अनुमोदक मी स्वतः होतो. आणि त्यावेळी मोहनजी पाटील हे सभापती होते. त्यानंतर स्थायी समितीमध्ये दुसरा एक ठराव झाला होता दि. २२/०१/२००४ रोजी त्यावेळी सुचक चंद्रकांतजी वैती होते आणि सभापती मॉरस रॉड्रीक्स साहेब होते. असे दोन ठराव आपण स्थायी समितीमध्ये केले. जेव्हा हे ठराव झाले तेव्हा प्रभाग समितीही अस्तित्वात नव्हती. प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यामुळे जी विकास कामे नगरसेवक निधींमधून होत होती किंवा पाच लाखाच्या अखत्यारित जी कामे होत होती ती परस्पर स्थायी समितीमार्फत किंवा मा. आयुक्तांची मंजूरी घेऊन होत होती. परंतु प्रभाग समिती अस्तित्वात आल्यानंतरदेखील हाच पायंडा पुढे सुरु आहे. तर ते कितपत योग्य आहे? मा. महापौर साहेबा आणि मा. आयुक्त साहेबांनी सांगावे. प्रभाग समितीची स्थापना झाल्यानंतर प्रभाग समिती सभापती तिथे आले, सगळे सदस्य आले. प्रभाग समितीमध्ये पाच लाखाचे काम मंजूर व्हायला पाहिजे. एका प्रभाग समितीमध्ये जे काम असेल. आता मला वाटते, मी प्रभाग समिती क्र. ०१ चा सभापती आहे तर मी प्रभाग समिती क्र. ०४ मधली कामे मंजूर करु शकतो का? तसा प्रकार या ठिकाणी झालेला आहे. हे मी आपल्याला निदर्शनास आणूण देऊ इच्छितो की, एक प्रकरण झाले. सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल हे आमचे चांगले मित्र आहेत. त्यांनी जे काम केले त्याला माझा विरोध नाही. त्यांनी जे केले ते त्यांच्या मताप्रमाणे योग्य झाले. परंतु, ते ज्या समितीमध्ये सदस्य आहेत ते प्रभाग क्र. ०२ मध्ये सदस्य आहेत. काम कुठले होते? तर प्रभाग क्र.०१ मधले काम होते. परंतु, प्रभाग समिती क्र. ०२ ने ते काम मंजूर केले. प्रभाग समिती क्र. ०१ च्या मंजूरीची आवश्यकता भासली नाही का? आयुक्त साहेब, जर असेच प्रकार होत राहिले तर प्रभाग समितीची स्थापना करण्याची आपल्याला आवश्यकता नव्हती. परस्पर आपणच कामे मंजूर करायचे होते. असा जो प्रकार झालेला आहे, तर येथुन पुढे असाच प्रकार होता कामा नये. आपण सर्व संबंधित विभाग प्रमुखांना मा. महापौर साहेबा सक्त असे आदेश द्या की, जे काम ज्या प्रभागात आहे त्या प्रभागाच्या प्रभाग समितीच्या समितीमध्ये आवश्यक त्या मंजूरी घेऊनच पुढील कार्यवाही करण्यात यावी. या संदर्भात आमची नुकतीच आता दि. ०९/०१/२००६ रोजी सभा झाली. त्या सभेमध्ये सन्मा. सदस्य अनंतजी पाटील साहेब ह्यांनी तो मुद्दा उपस्थित केला आणि त्या अनुषंगाने आम्ही असा एक प्रस्तावही पारित केलेला आहे. तो प्रस्ताव आपल्याकडे आम्ही पुढील कार्यवाहीसाठी पाठवलेला आहे. कृपया आपण सर्व संबंधित अधिकारी, विभाग प्रमुखांना स्पष्ट सुचना द्या की, येथुन पुढे असे होता कामा नये. कारण यामुळे चुकीचा संदेश जातो. व येथुन पुढे असे प्रकार होता कामा नये. जे सदस्य ज्या समितीमध्ये सदस्य आहेत त्यांना जर वाटले की दुसऱ्या प्रभागामध्ये काम करायचे आहे तर त्यांनी त्या प्रभाग समितीकडे आपल्या अधिकारी वर्गाने तो प्रस्ताव पाठवला पाहिजे. येथुन पुढे अशी कार्यवाही करावी असा निर्देश मा. महापौर साहेबा आपण द्या आणि आयुक्त साहेब आपण संबंधित अधिकारी वर्गाला असा निर्देश द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य आणि प्रभाग समिती क्र. ०१ चे अध्यक्ष आसिफ शेख ह्यांनी नगरसेवक निधीबाबत येथे वक्तव्य केले. मा. आयुक्त साहेब प्रभाग समिती क्र. ०२ मध्ये प्रभाग समिती क्र. ०२ च्या निधी अंतर्गत एखाद्या सन्मा. सदस्यांनी प्रभाग समिती क्र.०१ मध्ये ऑलरेडी त्या एकच्या प्रभाग समिती सदस्याने ते काम शिफारस करुन मंजूर करुन घेतलेले आहे. अशा अवस्थेमध्ये प्रभाग समिती क्र. ०२ मधून दुसरे सदस्य प्रभाग समिती क्र. ०१ चे काम तेच काम जे मंजूर झालेले आहे, असे काम ते सुचवतात हे परस्पर बरोबर नाही. कारण मागच्या सभेमध्ये ह्याच विषयावर बराच वाद झाला. एखाद्याचे जनरल फंडाचे जर काम असेल तर साहेब, आपण समजु शकतो. परंतु, प्रभाग समिती हे त्या प्रभागापुरते नेमुन दिलेले आहे. तर अशा प्रकारची घटना पुढे न घडतील ह्याची आपण कृपया दक्षता घ्यावी.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे सभागृह आहे. या सभागृहामध्ये फक्त एक प्रभाग समिती क्र.०१ व प्रभाग समिती क्र.०२ अशी जी चर्चा चाललेली आहे. एक नगरसेवक म्हणून, या सभागृहाची सदस्या म्हणून मला जाणून घेण्याचा हक्क आहे की, हा प्रकार काय आहे? कृपया सगळ्यांना समजेल अशा पध्दतीने आपण समजावून सांगावे. म्हणजे आमच्या प्रभागात असा गोंधळ होता कामा नये. ती घटना संपूर्णपणे आम्हाला कळली पाहिजे की, नक्की काय गोंधळ आहे?

**आसिफ शेख :-**

घटना कळली पाहिजे, तर पुन्हा खुलासा करतो की, घटना काय घडली. माझे तर मी पाहिलाच सांगितले की, माझी भूमिका अगदी पारदर्शक आहे. हयानात लेके चलो, कायनात लेके चलो, चलो तो सारे जमाने को साथ लेके चलो प्रभाग समिती क्र. ०१, ०२, ०३, ०४ या प्रभाग समितीची आपण स्थापना केल्यानंतर सर्व आमच्या सन्मा सहकारी सभापतींनी प्रभाग समितीचा चार्ज घेतला. आपले पॉवर्सचे डीसेंट्रलाईजचे जे स्वप्न आपले स्वर्गीय पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी ह्यांनी पाहिले होते की, अधिकाराचे विकेंद्रीकरण करायला पाहिजे होते. तर मी त्या संदर्भात पाठपुरावा केला. आमचे प्रथम नगराध्यक्ष, आमचे नेते गिल्बर्टजी मेन्डोंसा साहेब यांच्याकडे प्रस्ताव दिला आणि त्यांनी सन्मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव दिला आणि सन्मा. आयुक्त सुदामरावजी गायकवाड साहेब त्यांनी ते मनावर घेतले आणि त्याच्यानंतर २ करोड रुपये हा निधी प्रभाग समितीला मंजूर झाला आणि आपली प्रभागातील कामे व्हायला लागली. आणि काही अधिकार जे प्रभाग अधिकाऱ्यांना मिळत नव्हते ते अधिकार सन्मा. आयुक्त साहेबांनी त्यांना वर्ग केलेले आहेत आणि आता प्रभाग समितीचे काम, मला वाटते चांगले चालले आहे. परंतु, काही विषय जे परस्पर मंजूर होतात त्यामुळे प्रभाग समितीचा अनादर होतो. म्हणजे आपले सगळे नगरसेवक ज्या समितीमध्ये जे सदस्य नगरसवेक आहेत त्या सगळ्यांचा अनादर होतो. आता मी एक तुम्हाला सांगितले की, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीयाजी हे प्रभाग समिती क्र. ०२ मध्ये सदस्य आहेत. त्यांचे सभापती सन्मा. मॉरस रॉड्रीक्स साहेब आहेत. परंतु, त्यांनी जे काम सुचवले ते माझ्या प्रभाग समिती क्र. ०१ अंतर्गत होते आणि वॉर्ड क्र. ०३ मधले ते काम होते. ते काम माझ्याकडे मंजूरीला आलेच नाही. मला कधी कळल, जेव्हा त्यांची निमंत्रण पत्रिका आली, त्या निमंत्रण पत्रिकेवरुन फार मोठा विषय झालेला आहे. कोणाचे नांव असायला पाहिजे होते, नसायला पाहिजे होते. परस्पर निमंत्रण पत्रिका काढली. प्रशासनाने सांगितले की, आम्ही ती निमंत्रण पत्रिका काढली नाही. त्यांनीच ती पत्रिका काढली. तरी त्या कार्यक्रमाला त्यांनी निमंत्रण दिले व मी गेलो. माझ्या वॉर्डमधला कार्यक्रम आहे. माझ्या प्रभाग समितीमध्ये कार्यक्रम आहे. पोलिसांचे मला चारवेळा फोन आले की, तुम्ही तरी किमान यायला पाहिजे. तर मी त्या कार्यक्रमाला गेलो होतो. माझ्या वैयक्तिक स्तरावर मी त्या ठिकाणी गेलो होतो. तो कार्यक्रम अटेन्ड केला. त्यांनी चांगले काम केले. त्याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु, त्यांनी जी पध्दत अवलंबीली होती त्याबद्दल सर्वांच्या मनात रोष व्याप्त होता. ते या ठिकाणी नमुद करायला पाहिजे. परंतु, प्रभाग समिती क्र. ०१ मध्ये जे काम मंजूर करण्यासाठी यायला पाहिजे होते. ते काम परस्पर प्रभाग समिती क्र. ०२ ने मंजूर केलेले आहे. तर ते प्रकरण होते. उद्या जर सन्मा. सभापती नरेंद्र मेहता प्रभाग क्र. ०३ चे सभापती आहेत. त्यांना वाटले त्यांच्यामध्ये जे सदस्य आहेत ते म्हणतील आम्ही प्रभाग समिती क्र. ०४ मधले काम मंजूर करु. मग तिथे सन्मा. सभापती आसिफ पटेल ह्यांचे काय काम आहे? असा तो प्रश्न उपस्थित होतो ना. ज्या प्रभाग समितीमध्ये जी कामे आहेत, पाच लाखाच्या आतमध्ये ज्याला घटनेने आपल्याला अधिकार दिलेला आहे. ती कामे त्या प्रभाग समितीची योग्य ती मंजूरी घेऊनच पुढे जायला पाहिजे. ती कामे परस्पर मंजूर होता कामा नये. आता नगरसेवक निधीचे ते काम आहे ते पाच लाखाच्या आतले काम आहे म्हणूण आपल्या समितीकडे मंजूरीकरिता येणार. पाच लाखापर्यंत जी विकास कामे करायची आहेत ती पण त्या समितीकडे मंजूरीकरिता यायला पाहिजे. असा एकदम सर्व करा आणि स्पष्ट आणि पारदर्शक आपले काम या पध्दतीने असायला पाहिजे. परस्पर कामे मंजूर होता कामा नये. आपण प्रभाग समितीची स्थापना का केली? की, सत्तेचे विकेंद्रीकरण व्हायला पाहिजे. स्थानिक स्तरावर लोकांच्या समस्या तातडीने मार्गी लागायला पाहिजे. लोकांना वारंवार मुख्यालयात येण्याची आवश्यकता भासली नाही पाहिजे. या दृष्टीकोनातुन आपण संपूर्ण हे केलेले आहे. परंतु, वारंवार जर असे प्रकार होत असतील तर ते योग्य नाही. यासाठी सन्मा. महापौरांनी सांगितल्याप्रमाणे आपण संबंधितांना तशा सक्त सुचना द्या आणि आता आपण त्यांना त्या संदर्भात

रुलिंग द्या, निर्देश द्या की, येथुन पुढे असे प्रकार होता कामा नये. पाच लाखाची जी कामे आहेत ती संबंधित प्रभाग समितीची योग्य ती मंजूरी घेऊनच करण्यांत यावी.

**मा. महापौर :-**

प्रभाग अध्यक्ष आसिफ शेख ह्यांनी मांडलेली सुचना ज्या ज्या प्रभागातील समितीतील जी कामे आहेत त्या त्या संबंधित अधिकाराखाली झाली पाहिजे आणि संबंधित अधिकाऱ्याने ह्याची नोंद घ्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावामध्ये आमची सुचना आहे. आपण ती सुचना मान्य केल्यास योग्य आहे. नाहीतर, आमचा पुन्हा एक ठराव आहे. याची आपण नोंद घ्यावी. दुसरी गोष्ट आता जो आपण ठराव मांडला आहे. मॅडम, त्या ठरावामध्ये पुन्हा गोंधळ आहे, घोळ आहे, स्पष्ट झालेला नाही. आतापर्यंत नगरसेवक निधीचे काम हे अवलोकनार्थ म्हणूण आयुक्त साहेब करत होते. प्रभाग समिती स्थापन होऊन दोन महिने झालेले आहेत. आज प्रभाग समितीला तुम्ही दोन-दोन कोटी रुपये दिलेले आहेत. तुम्ही प्रभाग समितीचे त्या दोन-दोन कोटी रुपयांमध्ये कुठली कामे घेतलेली आहे? ते आपण दाखवा. पुन्हा गोंधळ होणार आहे. प्रभाग समिती क्र.०१ ने प्रभाग समिती क्र.०४ मध्ये काम घेतले आहे आणि प्रभाग क्र.०४ ने प्रभाग क्र.०१ मध्ये काम घेतलेले आहे. हा पुन्हा गोंधळाचा विषय होणार आहे. मॅडम, नगरसेवक हा आपला निधी कुठेही वापरु शकतो. या लोकशाहीमध्ये विधानसभेमध्ये कुठलाही आमदार, कुठलाही खासदार, लोकप्रतिनिधी कुठेही जाऊन आपला निधी वापरु शकतो. ते त्याला बंधनकारक नाही. फक्त प्रशासनाची बाजू मांडायची. प्रशासनाने ते योग्य आहे की नाही ते बघायचे काम हे प्रशासनाचे आहे. म्हणूण नगरसेवकांनी निधी येथे वापरायचा नाही हा विषय या सभागृहामध्ये होऊ शकत नाही. ह्याची आपण दखल घ्यावी. कुठल्याही प्रभाग समितीमध्ये तो विषय पाठवायची गरज नाही. आम्ही सुचविल्यानंतर ते पत्र कुठे पाठवायचे ते काम अधिकाऱ्यांचे आहे. त्या प्रभाग अधिकाऱ्याचे किंवा प्रभाग अध्यक्षांचे ते काम नाही. याची आपण नोंद घ्यावी. पुन्हा हा विषय प्रभाग समिती क्र.०१ ने मंजूर केला. प्रभाग समिती क्र.०२ ने फेटाळला हे होत नाही. प्रभाग समिती क्र.०१ चा अधिकार आहे की, त्यांनी तो विषय प्रभाग समिती क्र.०२ मध्ये पाठवायचा की नाही. पाठवायचा हे त्यांनी ठरवायचे किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी ठरवले पाहिजे. मॅडम, आपण आता जो ठराव मांडलेला आहे, त्यामध्ये पुन्हा असे मा. महापौर ह्यांनी परवानगी दिल्यानंतरच ह्याचा अर्थ आपण परवानगी दिली नाही. कारण आम्ही विरोधीपक्ष कार्यक्रम लावू शकत नाही. ह्याचा अर्थ असाच झालेला आहे. उद्या तुम्ही परवानगी देणार नाही आणि तुम्ही परवानगी देणार नाही म्हणून आमची विकास काम वेळेत होणार नाही.

**रोहीदास पाटील :-**

हा महत्वाचा मुद्दा आहे की, अध्यक्ष स्थान तुम्ही स्विकारणार आणि तुम्ही अव्हलेबल नसाल तर?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आता जे बोलले की, नगरसेवक निधी हा स्वेच्छा निधी असतो. स्वेच्छा निधी आपण मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत कुठेही वापरु शकतो. त्याला कोणतेही बंधन नाही. परंतु, प्रॉपर जी प्रक्रिया आहे, त्या प्रक्रियेला धरुनच.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याचे बंधन ठरवा ना.

**रोहीदास पाटील :-**

ते बंधनकारक नाही. तो प्रशासनाचा भाग आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो प्रशासनाचा भाग आहे.

**रोहीदास पाटील :-**

ते तुम्ही सांगायचे नाही. तुम्ही तिथे सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठे वाढवायचा, कुठे ठरवायचे ते प्रशासनाचे काम आहे.

**आसिफ शेख :-**

आणि ते सभापती जर अनुपस्थित असणार तर दुसरा जो सदस्य आहे त्याला आपल्याला सभापती करता येते.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपणाला या ठरावाचा खुलासा करावा लागेल. हा ठराव कुणाला दुखले आणि आले त्याचे चिंतन करा. कारण सन्मा. सदस्य मोहन पाटील हे कधीही उठतील आणि कधीही सांगतील ते लिहून घेऊन वाचून दाखवतील. तो ठराव बहुमताने मंजूर होईल. ह्याचे आम्हाला काय दुःख नाही. पण त्याचे परिणाम सांगतो. एक गटाराचे काम सुचवले दुसऱ्या वॉर्डातुन गटार जाते. काय उद्घाटन करणार तुम्ही? मा. महापौर मॅडम आपण या विषयावर खुलासा करा. आयुक्त साहेब आपण प्रशासन म्हणूण खुलासा करावा. सत्ताधारी आपण महापौर पिठासीन अधिकारी म्हणूण खुलासा करा. एक नगरसेवक काम सुचवेल, त्याने तो रस्ता सुचवला. तो रस्ता दुसऱ्या वॉर्डात जातो त्याला तुम्ही काय करणार? एक चांगले चाललेले, कुठेतरी

जरासे समजून घ्यायचे. थोडीही पचवायची हिम्मत नाही. शंभर ठिकाणी आपण पाटी लावली आहे. सन्मा. सदस्य मोहन पाटील तुमचे भरपूर नावाची पाटी लावली आहे. कारण नसतानाही तुमचे नाव लिहलेले आहे. तरीपण तुम्ही उगाच.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नावाचा विषय कुठून आला? कामाच्या अधिकाऱ्यांचा विषय आला होता, त्या विषयामध्ये.....

**रोहीदास पाटील :-**

नगरसेवकांच्या नावाचा वादच नव्हता. तीन वर्षे नीट चालले होते. कुठेतरी तुमचेच दुखतेय, आम्हीही सांगतोय सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींने बोर्ड लावला, सन्मा, सदस्य धनराज अग्रवालजींने बोर्ड लावला. मला जेव्हा फोन केला. मी सन्मानाने सांगितले होते की, महापौरांचे नांव असते तर काहीही बिघडले नसते. त्यांचे नांव असणे योग्य होते. तिथे विषय मिटवायला पाहिजे होता. ठराव करता, कशासाठी ठराव?

**मोहन पाटील :-**

विषय मिटवला ना.

**रोहीदास पाटील :-**

आपण जो ठराव मांडला आहे त्याचा खुलासा करा ना की, एक रस्ता जेव्हा येथुन सुरु होतो, त्याची लक्ष्मणरेषा कुठे मांडणार? इकडचा नगरसेवक, तिकडचा नगरसेवक, तिकडे उद्घाटन. ती कामं आहेत.

**मोहन पाटील :-**

जेव्हा एखाद्या कामाच्या उद्घाटनाचा प्रश्न निर्माण होईल तेव्हा हा प्रश्न निर्माण होईल.

**रोहीदास पाटील :-**

तीन वर्षापासून सगळ्या ठिकाणी........

**मोहन पाटील :-**

विकास कामामध्ये कोणतेही काम निघाले, गटाराचे काम निघाले.

**रोहीदास पाटील :-**

जर त्यांच्या डोक्यात आले की, पोलिसांना शेड बांधून द्यावे, तर एवढे दुखायचे काय कारण आहे?

**मोहन पाटील :-**

कुणाला दुखले? साहेब, त्याचे तुम्हाला दुखले.

(सभागृहात गोंधळ)

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर या विषयावर आम्हालाही बोलायचे आहे, आपण आम्हाला या विषयावर बोलू द्या.

**रोहीदास पाटील :-**

एक रस्ता, एक गटार हे अनेक वॉर्डातुन जाते. त्याच्यावर नाव कोणाचे लिहणार? आपण प्रशासनाची भूमिका सांगा.

**मोहन पाटील :-**

येथे स्वेच्छा निधी वापरण्याबाबतचा विषय चालू आहे.

**रोहीदास पाटील :-**

हे कुठलेही ठराव करतील. ह्यांच्या ठरावाबद्दल आमचे काही दुमत नाही.

**मोहन पाटील :-**

जेव्हा एखादा रस्ता दोन प्रभागातुन जातो व त्याचा आपण उद्घाटन समारंभ ठेवतो. तेव्हा दोन्ही प्रभागाचे नगरसेवक त्या ठिकाणी असतात व त्यांची नावे असतात. अशी पध्दत आपण ठेवलेली आहे. आणि तशी आपली पध्दतही आहे. तो विषय नाही. सन्मा. सभापती आसिफ शेख ह्यांनी असा मुद्दा मांडला की, एखाद्या प्रभागामध्ये काम होत असेल........

**रोहीदास पाटील :-**

त्यांचा मुद्दा चांगला आहे. त्यांच्याशी आम्ही भांडलो नाही. बोललोही नाही.

**मोहन पाटील :-**

माझा कोणता मुद्दा आहे? ते सांगा ना.

**रोहीदास पाटील :-**

तुमचा मुद्दा त्याला मुद्दाच नाही.

**मोहन पाटील :-**

मी कुठला मुद्दा मांडला.

**रोहीदास पाटील :-**

मुद्दाच नाही. कशासाठी तुमची घाई चालली आहे तेच समजत नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटीलजी मग आपण तो मुद्दा म्हणून का घेता? आमचा मुद्दा नाही तर आपण तो मुद्दा म्हणून घेऊ नका.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चांगले काम करतील त्यांचे नांव लागेल. मा. उपमहापौर साहेब चांगले काम करतील त्यांचे नावंही लागेल. मा. सभापती साहेबांचे नाव लागेल. तुम्हाला कशाला काय गडबड झाली हे मला समजत नाही. काही उगाच करतात. सगळे व्यवस्थित चालले होते . आमचा अजूनही आग्रह ज्या ज्या प्रभागामध्ये जो जो नगरसेवक त्याचा नगरसेवक फंड वापरेल. दोन नंबरचा ठराव ह्यांनी चांगला तर्कशुध्द अर्थ लावून हा ठराव तयार केला आहे. त्यांनीच तो ठराव केला आहे. हेच आहेत त्यांचे जन्मदाते. दुसऱ्या ठरावाचे जन्मदाते तेच आहेत. त्यांना कोणीतरी पंपींग केले की, त्यांचे बिघडते.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य पपींगचा प्रश्न येथे येत नाही. आपण जो विषय याठिकाणी आणलेला आहे......

**रोहीदास पाटील :-**

तुमच्या ठरावाचे विश्लेषण करा ना.

**मोहन पाटील :-**

आपण आत येथे ठराव आणलेला आहे ना.

**रोहीदास पाटील :-**

आपण उद्‌घाटन कसे करणार? मा. महापौर मॅडम, ८४ नगरसेवक आहोत. माझ्या नगरसेवकाचे म्हणणे असेल दोन लाख रुपये. दोन लाखात मी पन्नास हजाराची चार कामे सुचवितो. चार वेळा तुम्ही यायचे. बोर्ड तुम्ही बनवायचा. किती बाय कितीचा बोर्ड आहे त्याची तुम्ही साईज सांगा. नाहीतर, आमच्या विरोधी पक्षाचे नाव दिसणार नाही असेच लिहीणार. असा संशय घ्यायला मौका देऊ नका. ह्याच साईजचा बोर्ड बनेल त्याच्यात तुमचे नाव ठळक, महापौरांचे नाव ठळक, उपमहापौरांचे नाव ठळक, स्थायी समिती सभापतींचे नाव ठळक, विरोधी पक्षनेत्याचे नाव ठळक, प्रभाग समिती अध्यक्षांचे नाव ठळक, त्याची मापे सांगा, साईज सांगा. हा हसण्यावारी विषय नाही. उगाच सभागृहाचे टाईम घेता.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, जो नगरसेवक निधीका काम होगा उसके अंदर नगरसेवक की इच्छा से उस वॉर्ड का काम रखीए।

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अजूनही वेळ आहे. सद्सद्विवेक बुध्दीने जो ठराव बनवायचा आहे त्याचा मसुदा तयार करा. त्याच्यावर जर लिगल ॲडव्हाईज घ्यायचे असेल तर लिगल ॲडव्हाईज घ्या. त्याच्यात खर्च किती येईल? पन्नास हजार रुपयाचे काम आणि पाच हजार रुपये किंवा दहा हजार रुपयाची पाटी बनेल. त्या ठरावाला काय अर्थ आहे की, नाही?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य आपल्या ज्या काही सुचना असतील त्या आपण सांगा

**रोहीदास पाटील :-**

आम्ही आमच्या सुचना देतो ना.

**मोहन पाटील :-**

द्या ना, आपण आपली सुचना द्या.

**रोहीदास पाटील :-**

आम्ही सुचना दिली ना की, पुन्हा सद्सदविवेकबुद्धीने मसुदा तयार करा. गटनेत्यांच्या सभामध्ये विषय ठेवा. नाहीतर, तुम्ही काय ॲडवाइज घ्या आणि ठरवा. पण असे उठले आणि बोलले, असे सभागृहाला अपमानीत करु नका.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, आमच्या प्रभागात आम्ही जी कामे सुचविली आहेत. सन्मा. सदस्य अनंत पाटीलजी आणि स्वतः तीच कामे दुसऱ्या नगरसेवकाने सुचविली आहेत. जर आपण प्रभागासाठी, निधीसाठी भांडतो. मग तो निधी दुसऱ्या प्रभागात का वापरला जातो? आपल्या प्रभागात तो निधी वापरावा ना आणि त्यासंबंधित आमच्या प्रभागाच्या सभापती साहेबांबरोबर दुसऱ्या प्रभागाच्या सभापतींनी माहिती घेउन सांगावे की, हे दुसऱ्या प्रभागाचे काम तुमच्या प्रभागात आलेले आहे. त्याचा ठराव कसा करायचा, काय करायचा? आमच्या सभापतींना आपण विचारुन घ्या आणि दुसऱ्या प्रभागाच्या नगरसेवकांना आम्ही आमच्या प्रभागात कामे करु देणार नाही.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा जो आता वाद चालु आहे त्याच्यात आयुक्त साहेबांनी प्रशासनाच्यावतीने खुलासा करावा की, प्रभाग समितीकरिता जो निधी उपलब्ध करून दिलेला आहे म्हणजे प्रत्येक प्रभाग

समितीला दोन करोड रुपयाची रक्कम उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ती रक्कम त्या प्रभागापुरतीच वापरायला हवी की, तो निधी दुसऱ्या प्रभागामध्येही वाटला गेला तर चालेल. कारण नगरसेवक निधी हा स्वेच्छा निधी असतो. तो आपण कुठेही वापरु शकतो. परंतु, प्रभाग विभागासाठी जो दोन करोड रूपयाचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. तो फक्त त्या प्रभागामध्ये वापरायचा की, इतर प्रभागामध्ये वापरायचा ह्याचा अगोदर खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :-**

प्रभागांसाठी महापालिकेचा जो निधी वितरीत केला जातो त्याबाबत असा संकेत आहे की, तो निधी त्या प्रभागापुरताच मर्यादित रहावा.

**अशोक पाटील :-**

मग असे आदेश तुम्ही प्रशासनाच्या तुमच्या अधिकाऱ्यांना द्यावे त्याच्यामुळेच हा वाद झालेला आहे.

**रोहीदास पाटील :-**

तीन निधी आहे. एक प्रभाग निधी आणि एक जनरल आपले काम होते तो निधी. तीन निधीतुन कामे होतात. जो नगरसेवक निधी आहे तो प्रभाग निधी नाही तो स्वेच्छा निधी आहे. आता जो वाद चालला आहे व त्यांनी जो ठराव मांडला तो स्वेच्छानिधीवर मांडलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, प्रभाग निधी जो आहे तो प्रभाग क्षेत्राकरिताच वापरला पाहिजे. डुएल पॉलिसी ठेवायलाच नाही पाहिजे. प्रभाग समितीला दोन करोड रुपये दिले आहे ना. तो त्यांनी त्याच प्रभागात वापरायला पाहिजे.

**रोहीदास पाटील :-**

त्या ठरावामध्ये नगरसेवक निधी म्हणजे स्वेच्छा निधी आला ना.

**आसिफ शेख :-**

आणि जो स्वेच्छा निधी आहे तो आपण मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत कुठेही वापरु शकतो.

**हॅरल बोर्जीस :-**

स्वेच्छा निधीचा प्रश्नच येत नाही. सन्मा. सदस्यांच्या स्वेच्छेवर आहे त्यांनी तो कुठेही वापरावा.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आमच्या प्रभाग समितीच्या कामकाजपद्धतीचे निवेदन करतो ते आपण ऐकुन घ्या. चोविस लोक आम्ही एकत्र काम करतो. आमचा नगरसेवक निधी आमच्या सुचनेनुसार वापरला जातो. मी जे काम सांगतो ते त्याप्रमाणे बसेल, नियमात बसत असेल तर महापालिकेकडुन मंजुर होते दूसरे प्रभाग समितीच्या अध्यक्षांनी सांगितलेले आहे की, एवढा निधी माझ्या ताब्यात आहे आणि प्रत्येक एक सदस्याला सांगीतलेले आहे, आम्हाला सात सात लाखाची कामे सुचवायला सांगितलेली आहेत. सन्मा. सभापती नरेंद्र मेहताजी बरोबर आहे. सात लाखाचे काम मी सुचवले. नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी तो जो सात लाखाचा निधी आहे त्याला मी काम सुचवले, सन्मा. सदस्य मदनसिंगजी ने काम सुचवले, सन्मा. सदस्य शानु गोहील त्यांनी काम सुचवले. कामे व्यवस्थित चालू आहे आणि आणखीन उरलेला निधी तो त्यांनी वापरला ते आम्हाला त्यांनी सांगितले. आम्ही कोणी नाही सांगितलेले नाही. सगळा निधी नीट वापरला. कुठेही वाद नाही आणि मोठी जी कामे आहेत की, आता जसे वाटले प्रभाग, जे महापालिकेचे कामकाज आहे की, ह्या चेण्याच्या डोंगरातून निघालेले पाणी मिरा रोडला येईल. कोणता प्रभाग कोणता विभाग त्यात ते काही आहे की, नाही. मिरारोडचे सगळे पाणी आता तुम्ही पुर्वेला आणतात. तो तुम्हाला आणायलाच लागेल. मग कोणाला विचारणार तुम्ही? कोणाला विचारणार तिथे? सन्मा. प्रभाग समिती सभापती आसिफ पटेल ह्यांना विचारणार की, सन्मा. प्रभाग समिती सभापती नरेंद्र मेहता ह्यांना विचारणार. उगाच कुठेतरी आपण जोडपाय झुंझवायला कोणालातरी लागलो आहे आणि आपण वेळ घ्यायला लागलो आहोत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटीलजी आपली सूचना समजलेली आहे. स्वेच्छा निधी आणि नगरसेवक निधी कुठेही वापरू शकतो. नगरसेवक निधी म्हणजेच स्चेच्छा निधी तो निधी पुर्ण शहरामध्ये कुठेही वापरला जाउ शकतो. फक्त प्रभाग समितीचा जो निधी आहे, त्या प्रभागाची जी हद्द आहे त्याच्यामध्येच वापरला गेला पाहिजे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांचा नगरसेवक निधीच वापरला गेला होता.

**आसिफ शेख :-**

आपण गफलत कशाला करता?

**मा. महापौर :-**

निधी कुठे वापरला त्याचा वाद नाही. विषय वेगळा होता की, मा. महापौरांचा आणि मा. उपमहापौरांचे तिथे फलकावर नाव नाही.

**रोहीदास पाटील :-**

तसा तुम्ही ठराव केला नव्हता.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे.

**रोहीदास पाटील :-**

सन्मानाने तुमच्याबद्दल असलेला आदर, मला जेव्हा फोन गेला तेव्हा मी सांगीतले की, मा. महापौरांचे नाव असते तर चांगले.....

**आसिफ शेख :-**

स्वेच्छा निधी जो आहे तो आपण कुठेही वापरु शकतो. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत परंतु, तो निधी ज्या प्रभागात वापरत असाल तर त्या प्रभागसमितीची मंजुरी तरी घ्यायला पाहिजे की, नाही. त्याच्यात वाद वगैरे काही होणार नाही. याची दक्षता घ्यायला पाहिजे. स्वेच्छा निधी जरी असला तरी संबंधित प्रभाग समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. म्हणजे वाद हा होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही मनाई करत नाही. ते काम प्रशासनाचे आहे. ते आमचे काम नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य प्रशासनावर वारंवार टिका करतात. प्रशासनाने तुमचे काम केले, चांगले काम केले. आम्हाला संबंधितांना विश्वासात घेतले नाही. पण तुमचे काम केले. तरी तुम्ही त्यांना दोषी म्हणता. ही तुमची डबल पॉलिसी आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते तुम्ही करता ना.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, एक चीज मै अभी आपको बताता हूॅं, मै इसके पहले......

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, यह जो विवाद जितना उठ रहा है, कम से कम नगरसेवक निधी को अपने अपने वॉर्ड तक सिमीत करनेका यह काम करनेकी मै आपको सुचना देता हू। काम करते वक्त अपने एरिया का काम न करके और एक दुसरे एरिया मे जाके काम करिये ये कहा तक उचित है। ऐसे हमेशा झगडा होता रहेगा अभी संबंधीत नगरसेवकने सवाल उठाया की, उसके वॉर्ड मे दुसरा नगरसेवक काम कर रहा है। पोलिस चौकी मे क्या कभी पेशाबघर नही था क्या? यह नगरसेवक दुसरे वॉर्ड के और उन्होने पेशाबघर बनाने का काम उधर लिया यह कौनसा तरीका है। जनहीत के लिये यह नगरसेवक निधी दी जाती है। अपने एरीया मे काम करने के लिये। कम से कम अपने एरिया के नगरसेवक वहा के लोगो के लिए सुविधा नही दे सकते क्या, यह जो सुविधा दे रहे है यह कौनसा तरीका है? मा. आयुक्त महोदय, जब तक यह रोक नही लगेगा तबतक नगरसेवक अपने एरिया मे नगरसेवक निधी युझ करे। तब तक यह लढाई इसितरह होती रहेगी। मेरी यह सुचना है की, इसपर आप निर्बंध लगाया जाए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जो सन्मा. आमदार है, जो मंत्री है वह दिया वापरते है। क्या वह आपको पुछना चाहीये?

**जोजफ घोन्सालविस :-**

नगरसेवक निधीचे काम हे आयुक्तांच्या अवलोकनातुनच व्हायला पाहिजे. कुठल्या राजकीय ह्याच्यातुन गेले नाही पाहिजे. कारण तो स्वेच्छा निधी आहे आणि आतापर्यंत आपण तेच करत आलो आहोत.

**महेंद्रसिंग चौहान :-**

स्वेच्छा निधी मुंबई महानगरपालिका मे भी है लेकिन नगरसेवक अपने अपने वॉर्ड को छोडकर दुसरे के वॉर्ड मे काम नही करते ? मै मेरा वॉर्ड छोडके क्यो दुसरे के वॉर्ड के काम करु, यह गलत तरीका है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य आपको गलतफॅमी है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

खाली पुलिस की फेवर लेने के लिए। वहा बनाने की क्या जरूरत थी?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपको किसने रोका है, आप भी किजीए।

**महेंद्रसिंग चौहान :-**

क्या इनके वॉर्ड मे कोई काम नही है क्या? मॅडम, यह गलत है। यह मेरी सुचना है की, आयन्दा से नगरसेवक अपने वॉर्ड मे कम से कम नगरसेवक निधी का काम करे। बाकी दुनिया के लिये अपने वॉर्ड मे काम करिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यह कोई नियम नही है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

नगरसेवक निधी से अपने एरिया को डेव्हलप करिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्वेच्छा निधी के लिए कोई भी नियम नही है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

नगरसेवक निधीसे अच्छे काम करिए। प्रभाग छोडके पुलिस चौकी मे जाकर पेशाबघर बनाने का, क्या उससे पहले पुलिस चौकी पेशाबघर नही था क्या? यह गलत तरिका है। नगरसेवक निधी का युझ अपने अपने नगरसेवक के क्षेत्र मे ही होना जरूरी है। कायदा बनाईए, कानुन बनाईए अपनी जी कनव्हेन्शन है, उसको सुधारिए और यह दुसरे वॉर्ड मे काम करेंगे तो इसी तरह का झगडा चलता रहेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान साहब यह तो एक झाँकी है, अब की बार आपकी बारी है। यह ध्यान रखना। हम आपके वॉर्ड मे भी खर्चा करेंगे।

**महेंद्रसिंग चौहान :-**

हम ग्यारह साल से काम कर रहे है। मै सारे नगरसेवको को बता रहा हू मैने पहिले साल के नगरसेवक निधी से पहिले साल फाऊन्टन बनाया आपके ऑफीस मे मेरा फोटो लगा हुआ है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपको किसने अधिकार दिया है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मैने अपने वॉर्ड की झोपडपट्टी मे बढिया सा शौचालय बनाया उसका फोटोग्राफ आपके यहा लगा है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

झोपडपट्टीवालो को शौचालय बनाके दिया आपको झोपडपट्टी का वोट चाहीये वोट

**महेंद्रसिंग चौहान :-**

आयुक्त महोदय, यह सुधारणा बहुत जरुरी है। यह नगरसेवक दुसरे वॉर्ड मे जबतक काम करेंगे तबतक इसीतरह की लढाई होती रहेगी। कम से कम नगरसेवक को निधी मिलती वह अपने एरिया मे, अपने वॉर्ड मे अपने लोगो को सुधारके वहा डेव्हलपमेंन्ट करना होता है । यह नही है की, पुलिस चौकी मे छत डाले। यह कौनसा तरीका था। यह भारतीय जनता पार्टी का कौनसा तरीका था।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमारे वॉर्ड की आप चिंता मत करो ।

**महेंद्रसिंग चौहान :-**

जब तक इसपर रोक नही लगेगा तब तक ऐसा ही होता रहेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आप हमारे वॉर्ड की चिंता मत करो । आप अपना वॉर्ड संभालो। आप अपने वॉर्ड की चिंता करो हमारे वॉर्ड की चिंता नही करनेका। उसके लिये हम सक्षम है।

**मा. महापौर :-**

विषय सर्वानुमते मंजुर. सचिवजी पुढचा विषयला सुरूवात करा. सन्मा. सदस्य आपण बसुन घ्या.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, जो गलत है वह गलत है। यह मेरी सुचना नमुद करिये की, कोई भी नगरसेवक दुसरे वॉर्ड मे काम ना करे।

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य आप पहिले अपना वॉर्ड संभालो।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एकच गोष्ट मला विचारायची आहे की, ह्या एवढ्या सगळ्या चर्चेमध्ये आपण एवढा मोठा गोंधळ घातला आहे. परंतु, आपण पाठीमागे बघा आपला एकही अधिकारी उपस्थित आहे का, हे सर्व ऐकण्यासाठी प्रभाग अधिकारी आहे का? की, कोणते डिपार्टमेन्टली अधिकारी आहेत का? म्हणजे आपण

नुसता गोंधळ घातला. आपणच एकमेकांचे झिंझ्या उपटायला लागलो आहोत. पण ज्यांनी काम करायचे आहे ते कुठे आहेत?

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, आयुक्त साहेब आपण ऐकावे आयुक्त साहेब मी आपल्याला संबोधित करतो आपण एक खुलासा करावा. मा. महापौरांच्या आदेशाने की, नगरसेवक निधी जो आहे तो कोणीही कुठल्याही प्रभागात वापरू शकतो का?

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, असे असेल तर कॉपमधील नगरसेवक आपला निधी कुठे वापरतील?

**आसिफ पटेल :-**

ते घरी वापरतील. याबाबत आयुक्त साहेब उत्तर देतील ना म्हणुनच मी विचारला आहे की, असे काम करताना प्रभाग समितीची परवानगी लागेल का?

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवक स्वेच्छानिधीतुन कामे शिफारस केल्यानंतर प्रभाग समितीची मंजुरी आवश्यक आहे का? प्रशासनाने शिफारस केले की नगरसेवक निधीतुन हे काम करण्यात यावे त्याची मान्यता नियमामध्ये आहे का? कारण नगरसेवक शिफारस करतो की हे काम करा आणि प्रभाग समिती सांगते की मंजुरी घ्या. हे नियमात आहे का?

**आसिफ पटेल :-**

आयुक्त साहेब, आपण याबाबत खुलासा करावा.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आपण प्रभाग समितीमधुन जो निधी वापरणार आहोत तो निधी वापरताना.......

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपला मेन मुद्दा भूमिपुजन आणि त्याच्यावर फलक लावण्याचा होता तरी माझी अशी सुचना आहे की, प्रभाग समितीचे कार्य असु दे की, जनरल कार्य असु दे की, नगरसेवक निधीचे कार्य असु दे मा. महापौर, मा. उपमहापौर आणि इतर पदाधिकारी आपले महानगरपालिकेचे मान्यवर आहेत आणि त्यांची नावे टाकण्याबद्दल मला असे वाटते की, कुठलाही नगरसेवकाचा विरोध नसायला पाहिजे. ते विरोधी पार्टीचे असु दे की, रुलिंग पार्टीचे असु दे. कारण आज या महापौरांच्या खुर्चीवर काँग्रेस पार्टीचे की, राष्ट्रवादी पार्टीचे महापौर, उपमहापौर बसलेले आहेत. आज आपण हा ठराव करताना विचार करायला पाहिजे की उद्या विरोधी पक्षाचे ही महापौर बसू शकतात. मग तेव्हा तुम्ही त्यांचे नाव टाकायला विरोध करणार आहात का? म्हणजे कुठल्याही प्रभागाचे काम असु दे की जनरल काम असू दे की कुठलेही काम असु दे. त्याच्यावर आपल्या महानगरपालिकेचे जेवढे पदाधिकारी आहेत, सभापती आहेत आणि आयुक्त आहेत त्यांचे नाव टाकण्यासाठी कोणचाही विरोध करायला नको आणि ते नाव टाकण्यासाठी आपण कम्पलसरी करा की, ही नावे टाकायलाच पाहिजे आणि दुसरी गोष्ट नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी अशी दोन निधी आता उपलब्ध आहेत. नगरसेवक निधी पुर्वीपासुन आहे. आयुक्त साहेब, नगरसेवक निधी पुर्वीपासुनच होती. प्रभाग समितीमध्ये आम्ही मान्य करतो की, आमच्या प्रभागाचे जेवढे काम आहे आणि आमच्याच प्रभागाचे काम आम्हाला सुचवायला पाहिजे हे आम्ही मान्य करतो आणि मला असे वाटते की, कायद्यातही तसे आहे. परंतु, नगरसेवक निधी हा निधी मला असे वाटते की, प्रभाग समितीमध्ये घेउन ते पास करणे हाच मेन मुद्दा आता उपस्थित झालेला आहे. तर प्रशासनाने त्याचा खुलासा करावा की, नगरसेवक निधी बाबत आयुक्त साहेबांचे पॉवर आहेत की ते प्रभाग समितीमध्ये पास होऊन नंतर ते होऊ शकते. कारण आता मी नगरसेवक निधीतुन काम सुचवले होते. तर त्या फाईलवर आपली सिगनेचरसुद्धा झाली होती आणि ते काम सुरु ही झालेले आहे. परंतु, पंधरा दिवस उशिरा झाले. कारण ते काम प्रभाग समितीमध्ये घ्यायला लागेल आणि नंतर ते काम सुरू करणार म्हणून मी असे विचारतो की, ते कायदेशीर आहे का? नगरसेवक निधीचे जे पण काम आहे ते प्रभागाच्या सभेमध्ये घेणे आवश्यक आहे का? कायदेशीर आहे का? तसे कायद्यामध्ये आहे का? त्याचा फक्त खुलासा करा आणि सर्वांचा हा जो झगड्याचा मुद्दा आहे तो तोच टेक्निकल मुद्दा आहे की, नगरसेवक निधी हा नगरसेवकाचा स्वतःचा निधी आहे. मग ते स्थायी समिती समोर घेणे गरजेचे की, प्रभागसमिती समोर घेणे गरजेचे आहे की, आयुक्त साहेबांचे हे स्वतःचे पॉवर आहेत?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. नगरसेवकांनी जे काही प्रभाग निधीच्या बाबतीमध्ये आणि सन्मा. नगरसेवकांच्या निधीबाबतीमध्ये जो काही प्रश्न उपस्थित केलेला आहे. याठिकाणी सभागृहामध्ये जी काही चर्चा चालू आहे त्या चर्चेच्या संदर्भामध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रभाग समितीला जो काही निधी दिला जातो तो प्रभाग समितीच्या क्षेत्रापुरताच मर्यादित असतो आणि त्या प्रभाग क्षेत्रातील कामे करणे हा एक संकेत आहे. नगरसेवक निधीच्या बाबतीमध्ये जो काही याठिकाणी उहापोह होत आहे. त्याबाबतीमध्ये मी स्पष्ट सभागृहाला सांगू इच्छितो की, नगरसेवक निधी हा स्वेच्छा निधी आहे. त्या नगरसेवकाला तो निधी कुठेही वापरता येईल. त्या

निधीची जी रक्कम आहे ती दोन लाख सत्तर हजारापर्यंत आहे. त्या दोन लाख सत्तर हजार रुपये निधीच्या बाबतीमध्ये प्रशासकीय मंजुरी असेल आयुक्तांची मंजुरी घेउन त्याप्रमाणे प्रभाग नगरसेवकांना ती कामे पार पाडता येतील.

**अनंत पाटील :-**

मा. आयुक्त महोदय, एक प्रश्न आहे आता नगरसेवक निधीतुन.........

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, आता जो आयुक्त साहेबांनी खुलासा केला तर नगरसेवक निधीबाबत प्रभाग समितीकडे जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तर मग याठिकाणी जो विषय झाला. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी ठराव मांडला त्या ठरावाला अनुमोदन झाला. विषय संपला होता. तरीपण सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेबांनी हा विषय उपस्थित केला आणि त्यामुळे एवढा वाद झाला. आपण हा विषय संपला असे जाहीर करा आणि पुढचा विषय घेण्यात यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय संपलेला नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसुन घ्या आणि सचिवजी आपण पुढील विषयाला सुरवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला ठराव मांडायचा आहे. आम्ही ठराव मांडलेला आहे.

**रोहीदास पाटील :-**

त्यावर आपण काय रुलिंग दिले.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर झालेला आहे. सचिवजी पुढील विषयाला सुरवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठराव मांडतोय.

**रोहीदास पाटील :-**

ठराव सर्वानुमते मंजुर होउच शकत नाही.

**अनंत पाटील :-**

आयुक्त महोदय, हा आर्थिक निधी वापरताना त्या निधीचे टायटल वगैरे आहे का ह्याच्याबद्दल प्रशासनाने खुलासा करावा. आपण निधी वापरतो पण त्या जमिनीचा टायटल क्लिअरन्स रेफरन्स देउन वापरतो का? की, आपण कुठल्याही सरकारी जागेवर बांधकाम करणार आहोत. ह्याचा खुलासा प्रशासनाने जरुर करावा. कारण आमच्याकडे अशी घटना घडलेली आहे. आर्थिक आपला जो काही अर्थसंकल्पीय निधी आहे. ते एका गार्डनसाठी तो निधी वापरताना त्या निधीचा टायटल क्लिअर नसल्याकारणाने प्रशासकीय अधिकारी हे बेकायदेशीर बांधकाम करतात. अशातऱ्हेचे रहीवाशांचे पत्र आलेले आहे आणि त्याच्यात आपले नगरसेवक सामिल आहेत. सन्मा. सदस्या नयना म्हात्रे आणि सन्मा. सदस्य रोहीत सूवर्णा. तरी याबाबत आपण खुलासा करावा की, आपण जो निधी वापरणार आहोत. ते टायटल क्लिअर निधीमधुन वापरणार की, कसे? त्याचा खूलासा आपण करावा.

**अशोक पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण जरा संभ्रमित झालेला दिसता. सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या मुद्याचा मतीथार्थ असा आहे की, या महानगरपालिकेमध्ये आज जवळ जवळ पावणे तीनशे करोडचा बजेट आहे, तर बांधकाम विभागातर्फे अशी बरीच विकास कामे केली जातात. तर ती विकास कामे जेव्हा प्रशासकीय आर्थिक मंजुरी आणि निविदा झाल्यानंतर त्या कामाचा मुहुर्त होउन ते प्रशासन म्हणजे बांधकाम विभाग त्या संबंधीत जागेचे टायटल संदर्भात काय पुर्तता करते का आणि ती न करता जर करत असेल आणि जर कोणी ऑब्जेक्शन घेतले तर ते काम बंद करण्यात येइल का? अशा पद्धतीची सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांची समस्या आहे. म्हणजे आमच्याच प्रभागामध्ये बांधकाम विभागाने गार्डनचे काम मंजुर केले. त्याच्या निविदा काढल्या आणि ते काम सुरू देखिल झाले आणि ते काम सुरू झाल्यानंतर तिकडच्या रहिवाश्यांना चिथावून त्या जमिनीच्या टायटल संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. असे जर झाले तर या शहरामध्ये विकासाची कामे होणार नाही. कारण महत्वाचे असे की, जे मोठे एक स्टेडीयम आमच्या प्रभागामध्ये आहे त्याच्या टायटलची काहीही पुर्तता न करता आपण या नगरपालिकेचे लाखो रुपये त्याच्यावर खर्च केले व टायटलची पर्वा केली नाही आणि अशी बरीचशी विकास कामे जिथे शौचालय बांधली जातात, समाजमंदिर बांधली जातात त्यावेळी देखिल टायटलचा आपण कधी विचार केला नाही. तेव्हा असा मुद्दा उपस्थित झालेला आहे.

**अनंत पाटील :-**

असा कहर म्हणजे नगरसेवक निधी सन्मा. सुवर्णा ह्यांचा आमच्याच एका खार लँडमध्ये वापरला गेला आहे. त्याचे टायटल क्लिअर नाही. 'आमचा आहे तो बाब्या आणि दुसऱ्याचा आहे ते कार्टा', अशा तऱ्हेने

ह्यांचा हा व्यवहार चालतो. मग त्यांचे टायटल क्लिअर आहे का? टायटल क्लिअर नसताना तुमची बेकायदेशीर कामे चालू शकतात.

**अशोक पाटील :-**

अशा पद्धतीने जर टायटलचा विचार केलातर शहरातील विकास कामे होणार नाही.

**अनंत पाटील :-**

असे केलेतर विकास कामे होणार नाही म्हणुन सांगतो आपण आता जो निधी वापरणार आहोत ते टयटल क्लिअरसाठी वापरणार असाल तर बांधकामे करा आणि जर टायटल क्लिअर नसेल तर एकाचाही निधी आपण वापरु नका ह्याचा आपण खुलासा करा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर महोदया, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये नगरसेवक आपआपल्या परीने स्वेच्छा निधी वापरतो किंवा नगरसेवक जी कामे सुचवितात, ती कामे लोकोपयोगी पडावी व नागरीकांना त्याचा लाभ घेता यावा. समाजमंदिराचा विकास आपण करतो त्यावेळी टायटल बघितले पाहिजे हा आपला मुद्दा टेकनिकल आहे. परंतु, ज्या ठिकाणी ऑब्जेक्शन येऊ शकत नाही त्या ठिकाणी कामे झाली पाहिजेत. अशी कामे अगोदर झालेली आहेत. उदाहरणार्थ, भाजपच्या माझ्या मित्रांनी अर्थ वेगळा काढू नये की, तिथे आपण स्वेच्छा निधी वापरला त्याची आपण कोणत्याही तऱ्हेची पी.डब्ल्यू.डी.ची परवानगी किंवा प्लान टाकला नाही. परंतु, ते समाजउपयोगी काम आहे ते काम झाले पाहिजे व त्याच्यात कोणी खो घातला नाही पाहिजे म्हणून त्या पद्धतीने जी कामे करुन घेता येईल ती कामे केली पाहिजे. नागरीकांना भडकवायचे नागरिकांना त्याविषयी काहीतरी बोलायचे त्याच्यापेक्षा ते काम लोकोपयोगी काम आहे, समाजाला ते काम उपयोगी पडते तशापद्धतीने ते काम झाले पाहिजे व ते काम करण्यासाठी सर्व नगरसेवकांनी त्याला सहकार्य केले पाहिजे. कारण शेवटी अधिकारी वर्ग, अधिकाऱ्यांना कामाच्या काही लिमिट आहेत त्यांना त्याच्यापुढे कायद्याने काम करता येत नाही. परंतु, काही गोष्टीमध्ये कायद्यात न पडता जर काम होत असेल व लोकांच्या उपयोगी पडत असेल तर त्याचा उपयोग केला पाहिजे आणि तशी कामे करुन घेतली पाहिजे आणि त्यासाठी सन्मा. इतर नगरसेवकांनी सहकार्य केले पाहिजे आणि असे जर कोण नगरसेवक खो घालतील त्यांना ही कनव्हेन्स केले पाहिजे. परंतु, आपण ही पद्धत सुरू ठेवा. तुम्ही कायद्याने ठेऊ नका पण पद्धत ही सुरू झाली पाहीजे. कारण लोकांसाठी जे समाजमंदिर बांधले किंवा आणखीन कुठले काम केले, गार्डन विकसित केले तर कोण घरच्याकरिता करत नाही, लोकांसाठी करतात. ही माझी या ठिकाणी सुचना आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आयुक्त महोदय, सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, तिथे कोणीतरी ऑब्जेक्शन घेतले आहे. मी माझे मत या सभागृहाला सांगू इच्छितो की, ज्याअर्थी ज्याने ऑब्जेक्शन घेतले आहे त्याअर्थी त्यांनाच माहिती असेल की, त्याच्यामध्ये काय अडचण आहे. ती त्याची माहिती त्याच्याकडूनच घ्यावी. आपले जे अधिकारी बसले आहेत त्यांनी त्याच्याकडून माहिती मागावी. त्याने ऑब्जेक्शन घेतले आहे, काय ऑब्जेक्शन घेतले आहे, कोणाचे आहे, त्याच्याजवळ काय कागदपत्र आहे? त्याची माहिती संबंधित जो अडथळा निर्माण करतो त्याच्याकडूनच घेतली पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला असे वाटते की, आयुक्त साहेब येथे बसले आहेत आणि गेल्या आठवड्यामध्ये जी स्थायी समितीची सभा झाली त्याच्यामध्ये उड्डाणपुलाच्या बाजुला जे मैदानाचे आरक्षण आहे. आपला विषय झाला त्या दिवशी तो पुर्नविलेखित करण्यासाठी १२२ मध्ये तो विषय आलेला आणि तिथेसुद्धा कायद्याच्या काही बाजू पेंडिंग असताना आपण चांगली भुमिका घेतली की, जरी आपल्याकडे कायदेशीर पुर्तता झालेली नसेल तरी आपल्या शहराचा एक विकासाचा भाग म्हणून आपण जर तिथे आतापासूनच काम करण्याला सूरुवात केली तर त्याची बांधणी, योग्यता बघून, मागणी बघुन शासन आपल्याला नेमकी ती परवानगी देईल आणि अशा पद्धतीने आपण तो ठराव त्या दिवशी स्थायी समितीमध्ये मंजूर करुन घेतला त्याच पद्धतीने इतर कामेसुद्धा करायला पाहिजे, त्याला कोणाचीही हरकत नसावी.

**रोहीदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील हजेरी रजिस्टरवर आता कशी काय सही करता आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मोहन पाटील जागेवर बसुन कशी काय सही करता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभा चालु होउन दोन ते तीन तास झाले आहे आणि आपण आता सही करता?

**रोहीदास पाटील :-**

आम्ही माजी महापौरांचा मान ठेवू शकतो. कारण ते आता मान घ्यायला तयारच नसतात जसे तुम्ही आता नावासाठी भांडता त्या कधी भांडल्याच नाही. पण सन्मा. सदस्य मोहन पाटील कशी काय सही करतील. माजी महापौरांना आम्ही बोलणार नाही. पण सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी सही आता केली हे सभागृहाचे कामकाज नाही. ही सभेच्या कामकाजाची पद्धत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते ठराव मांडतात आणि ते येथे हजरही नाही, असे कसे होते?

**रोहीदास पाटील :-**

हे कशा पद्धतीचे कामकाज आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या रजिस्टरवर वेळ बघावी आणि त्याच्या अगोदर सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी जे वक्तव्य केले आहे ते सभा कामकाजातुन काढून टाकावे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या व्यतिरिक्त हजेरी रजिस्टर कोणाकडे ही घेउन जायचे नसते. आपण त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही करा अशी आम्ही मागणी करतो.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या अगोदरचे वक्तव्य कामकाजातुन काढून टाकण्यात यावे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण जी विकास कामे करतो........

**रोहीदास पाटील :-**

आयुक्त साहेब, तुम्हाला हे स्पष्ट करावे लागेल, सदस्यांकडे जाउन सही घेण्याचे त्या कर्मचाऱ्याचे काम नाही. आपल्याला प्रशासन म्हणून ही भुमिका बजावायला लागेल, आपण त्यांच्यावा कार्यवाही करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सदस्य ठराव मांडतात आणि ते सभागृहात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सहीच्या वेळेच्या अगोदरचे सन्मा सदस्य मोहन पाटील ह्यांचे वक्तव्य कामकाजातुन काढून टाकावे. त्यांची आता सही झालेली आहे. त्यावेळेला त्यांची सही झाली त्यावेळपासुन ते उपस्थित आहे. आता त्यांनी जी सही केलेली आहे ती १.३० मि. सही झालेली आहे. त्याच्या अगोदरचे त्यांचे सगळे वक्तव्य काढून टाकावे आता त्यांनी जी ह्यावेळेला सही केली आहे ती १.३० मि. त्यांच्या अगोदरचे सगळे वक्तव्य काढुन टाकावे. टेकनिकली ते वक्तव्य काढून टाकायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सचिव, सभागृहासमोर आलेल्या दोन्ही ठरावाचे वाचन करावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण पहिला ते सहीचे सांगा की काय आहे? असे चालत नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला दोन शब्द बोलण्याची परमिशन द्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही सभा कामकाजाची पद्धत नाही.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण जी विकास कामे करतो आणि आपण विकास करताना कायद्याची बाब विसरतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सहीचे काय? उपविधीमध्ये काय आहे आणि त्यांनी आता सही कशाला केली?

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण विकास करताना कायदा बिघडतो. तेव्हा आपण आता ही जी विकासाची कामे करतो ते आपण रोडमार्जीनमध्ये करु शकतो का? आणि रोड मार्जीनमध्ये केलेली कामे जर पुन्हा रोडवायडींग झाली तर तुम्ही तोडू शकता का? ह्या निधीचा वापर जर आपण अपव्यय केला तर व त्याचा योग्य तो उपयोग केला नाही आणि तिथे पुन्हा रोड वायडींग झाल्यानंतर पुन्हा विकास करण्याचे काम असेल तर तुम्ही ते तोडाल का? ह्याचे आपण मला उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

सचिवजी आपण ठरावाचे वाचन करा. सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील आता जे बोलले ते काम रोडमार्जीन मध्ये चालू आहे. मग तुम्ही रोडमार्जीन मध्ये काम कराल का?

**मा. आयुक्त :-**

नाही.

**मिलन पाटील :-**

मग ते काम होउ शकत नाही.

**प्र. सचिव :-**

नियमानूसार दुसरा ठराव मी मतदानाला टाकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आपण माझ्या प्रश्नाचा खुलासा करा की, सही करण्याची काय पद्धत आहे? सचिव अगोदर खुलासा करा, सन्मा. सदस्य तीन तासापासुन सभागृहामध्ये आहेत आणि सही केलेली नाही.

**प्र. सचिव :-**

सभागृहामध्ये येताना सही करायची असते.

(प्र. सचिवांनी दुसऱ्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**सूधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मेरा एक सवाल है, अभी जैसे इन्होने कहा की, नगरसेवक निधी मे जिन सन्मा. सदस्योका नाम डाला जाएगा अगर वह उपस्थित नही हुए तो उस नाम का क्या किया जाए।

**प्र. सचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, मतदानाच्या वेळेत कोणीही सभागृहाच्या बाहेर जाऊ नये किंवा आत येउ नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण पुन्हा एकदा ठराव वाचुन घ्या नाहीतर, नंतर आमची आठवण कराल.

**जयंत पाटील :-**

ठरावाचे वाचन चांगल्या तऱ्हेने करा. मुळ ठराव काय आहे आणि त्याला दुसरा ठराव काय आहे आणि ठराव कोणी कोणी मांडलेले आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव महोदय, दोन्ही ठरावामध्ये फरक काय आहे तेवढेच सांगा.

**प्र. सचिव :-**

तसे सांगता येत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्यांनी जो ठराव दिला त्याच्यामध्ये फरक कुठे आहे ते सांगा.

**प्र. सचिव :-**

मी दोन्ही ठराव वाचुन दाखवतो.

**शशीकांत भोईर :-**

मा. महापौरांची परवानगी असेल तर मी बोलतो की, आपण जे पत्रकार बंधू आणि अधिकारी वर्गाला दालन केलेले आहे. त्या दालनामध्ये एकही अधिकारी बसलेले नाही. अधिकारी वर्गाला दालन केलेले आहे. त्या दालनामध्ये एकही अधिकारी बसलेले नाही. अधिकारी वर्ग कुठे गेला त्याचा आपण खुलासा करावा.

**शुभांगी नाईक :-**

सचिव साहेब, २९/०९/०५ च्या इतिवृत्तांतात पान क्र. ६४ मध्ये प्रियांका करंबळे उपस्थित होत्या. उपस्थितीमध्ये त्यांचे नाव ॲड करा.

**शशीकांत भोईर :-**

सर्व अधिकारी वर्ग बाहेर उभा आहे. मी हे सभागृहाच्या निदर्शनात आणून देऊ इच्छितो की, सर्व अधिकारी वर्ग बाहेर उभा आहे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी त्यांना विचारल्यावर त्यांनी आम्हाला बसायला खुर्च्या नाहीत असे सांगितले आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांना खुर्च्या नसल्यामुळे ते बाहेर उभे राहिलेले आहेत.

**दिपक खांबीत :-**

आलेल्या दोन ठरावामध्ये असा फरक आहे की....

**शशिकांत भोईर :-**

खांबीत साहेब एक मिनिट, ठराव वाचण्यापूर्वी जो अधिकारी वर्ग बाहेर उभा आहे, बसायला खुर्च्या नसल्याकारणाने.

**दिपक खांबीत :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांच्या ठरावामध्ये नगरसेवक निधीच्या निमंत्रणपत्रिकावर नामकरण फलकावर ज्या नगरसेवकाची निधी आहे फक्त त्याचेच नाव लिहीण्यात यावे. ज्या इमारती, समाजमंदिर, शाखा इत्यादी पुर्वीपासुन अस्तित्वात आहे त्याचे नगरसेवक निधीतुन नुतनीकरण करतेवेळी उल्लेख केलेल्या

सर्व अधिकारी, पदाधिकारी ह्यांच्यासहीत नगरसेवक निधीतुन काम केलेल्या नगरसेवकाचे नाव लिहावे म्हणजे हे असे नगरसेवक निधीच्या बाबतीत आहे आणि ज्या जून्या इमारती वगैरे आहेत, कुठल्याही प्रभागात जरी केले तरी त्या नगरसेवकाचे नाव यायला पाहिजे असे आहे आणि इतर मान्यवर नागरीकांची नावे असावीत.

**मोहन पाटील :-**

म्हणजे ज्या प्रभागामध्ये नगरसेवकाने काम केले नाही व दुसऱ्या नगरसेवकाने काम केले.

**दिपक खांबीत :-**

एकतर नगरसेवकनिधीच्या ह्याच्यावरती फक्त त्या नगरसेवकाचे नाव असावे, त्यांच्या म्हणण्या प्रमाणे जे असतील ते.

**मोहन पाटील :-**

आणि त्या नगरसेवकाने बाजुच्या वॉर्डमध्ये काम केले असेल तर?

**दिपक खांबीत :-**

त्याचा उल्लेख नाही.

**मोहन पाटील :-**

म्हणजे विषय असा झाला आहे की, २३ नंबरमध्ये जे काम केलेले आहे त्या नगरसेवकाने २२ नंबरमध्ये काम केल्यानंतर २२ नंबरचे जे नगरसेवक असतील त्यांनी काय करायचे? टाळ्या वाजवायला जायचे की नाही, ते सांगा. म्हणजे ज्याने स्वेच्छा निधी दिलेला आहे त्याचे फक्त नाव येईल.

**रिटा शहा :-**

आयुक्त साहेब, आपण ह्याचा खुलासा करावा की.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, त्यांनी ठराव काय मांडलेला आहे, त्यांनी असे लिहलेले आहे की, चार नंबरचे नाव पाच नंबरमध्ये टाका असे तुम्ही लिहले आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसुन घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, आपण लिहिले का चार नंबरचे नाव पाच नंबरमध्ये टाकायचे.

**प्र. सचिव :-**

दुसरा आलेला ठराव मी परत वाचुन दाखवतो. कृपया सदस्यांनी शांतपणे ऐकुन घ्यावे. प्रकरण क्र. ७४ करिता सुचक ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदक धनराज अग्रवाल ह्यांनी मांडलेला दुसऱ्या ठरावाचे मी वाचन करतो.

(प्र. सचिवांनी सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदन श्री. धनराज अग्रवाल यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

नुतनीकरण करताना जी नावे आहेत ती राहतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, या दोन्ही ठरावामध्ये साम्य काय? साम्य काहीच नाही?

**प्र. सचिव :-**

साम्य काय आहे ते मला सांगता येणार नाही. मतदानाला टाकण्यात येत आहे. मतदानाने निर्णय घ्यावा. मला साम्य सांगता येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते दोन्ही एकच ठराव आहेत.

**प्र. सचिव :-**

वेगवेगळे आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

वेगवेगळे आहेत पण त्याच्यात साम्य काय आहे?

**प्र. सचिव :-**

साम्य असे सांगता येणार नाही. मतदानाने निर्णय घ्यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, ह्याच्यामध्ये फरक काय आहे?

**प्र. सचिव :-**

ठराव वाचुन दाखवतो. अगोदर दुसरा आलेला ठराव वाचुन दाखवला आणि हा पहिला ठराव सुचक हॅरल बोर्जीस आणि अनुमोदक परशुराम पाटील ह्यांचा ठराव आहे.

(प्र. सचिवांनी सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन श्री. परशुराम पाटील यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

मला असे वाटते दोन्ही ठरावामध्ये काही जास्त तफावत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, समजा कुठल्याही प्रभागामध्ये गटाराचे किंवा कुठलेही काम असेल तर आपण तिथे उद्घाटनासाठी येणार का?

**मा. महापौर :-**

येणार ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग ठीक आहे.

**मा. महापौर :-**

विकास कामे मा. महासभेमध्ये जर मंजुर करू शकतो, तर उद्घाटनाला येणार नाही का?

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, मॅडम जर आमच्या प्रभागात यापुढे कार्यक्रम ठेवला तर आपण उद्घाटनाला नक्क़ी येणार ना की, पुन्हा तोच फोन येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, दोन्ही ठरावाचे सभागृहात वाचन झालेले आहे. कृपया सचिव साहेब आपण ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांना उभे रहायला सांगा.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम यापुढे जर कार्यक्रम असेल तर तुम्ही नक्की याल ना?

**मा. महापौर :-**

त्यावेळी परिस्थिती वेगळी होती. सन्मा. सदस्य जयंत पाटील, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांना माहित आहे. त्यांनी त्यावेळची परिस्थिती बघितली.

**लिला पाटील :-**

परिस्थिती वेगळी होती ही खरी गोष्ट आहे.

**जयंत पाटील :-**

आपण आजारी होत्या पण बाकीच्यांचे काय? सगळे आजारी होते का? की राजकीय आजार होता.

**मा. महापौर :-**

अचानक वेळेवर जर काही अशी वेळ आली तर........

**जयंत पाटील :-**

ठिक आहे, आपण आजारी होता पण बाकीच्यांचे काय?

**लिला पाटील :-**

बाकीच्यांचे काय?

**मा. महापौर :-**

बाकीचे सदस्य उपस्थित असतात ना.

**जयंत पाटील :-**

ते गॅसवर होते की, काय?

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅउम, आपण राष्ट्रवादीचे महापौर आहात की, पुर्ण मिरा भाईंदरचे महापौर आहात?

**जयंत पाटील :-**

तो राजकीय आजार होता.

**प्रभात पाटील :-**

ठराव मांडण्यापुर्वी मला असे वाटते की, सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी सुचना केली होती त्याच्यामध्ये बदल व्हावा आणि मलाही असे वाटते की, सभागृहाने ह्याच्याबाबत विचार करावा. आपण त्याच्यामध्ये आयुक्तांचे नांव अगदी खाली घेतले आहे. सगळ्यांच्या शेवटी ते कुठेतरी प्रोटोकॉलप्रमाणे घेण्यांत यावे अशी माझी सुचना आहे व त्यानंतरच तो ठराव पारित करा, नाहीपेक्षा तो ठराव तसाच येईल.

**मोहन पाटील :-**

आपण जी ठरावामध्ये नांवे दिलेली आहेत त्याचा क्रम लावलेला नाही. तो क्रम आपण लावायचा असतो. ह्यांची नांवे असावी अशा पद्धतीचे आपण दिलेले आहे. क्रम त्या त्या वेळेला त्या त्या पद्धतीने क्रम लावायचा असतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, दोन्ही ठरावामध्ये दुःखाची गोष्ट आहे. आपण महिला महापौर आहात. आपल्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींच्या नावाचा त्याच्यामध्ये उल्लेखच नाही.

**अशोक पाटील :-**

ठरावामध्ये सगळ्या सभापतींच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. उपसभापतींचेही नांव घ्यायला लागेल.

**मोहन पाटील :-**

सभापती म्हणून दिलेले आहे तर सगळेच सभापती त्यात आले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आमचा जो ठराव आहे त्याच्यामध्ये एवढी दुरुस्ती आहे की, जो खासदार आणि आमदारांचा फंड त्यामध्ये त्यांनी सुचविलेली अतिरिक्त दोन नांवे व बाकी प्रशासनाची नांवे. नगरसेवक निधी ज्या प्रभागामध्ये वापरणार आहे, जे गटार आहे किंवा त्यामध्ये नगरसेवकांची इच्छा असेल तेव्हा जी महापालिकेत वास्तु आहे, ग्रामपंचायत काळापासून त्यांना कुठेतरी रिन्युव्हेशन करायचे असेल त्यामध्ये आपण दिलेल्या ठरावाप्रमाणे त्यांची नांवे असावीत. नगरसेवक निधीमध्ये नगरसेवकाने जर इच्छा व्यक्त केली तर त्या ठिकाणी दोन नांवे त्यांनी सुचविलेली नांवे आणि प्रशासनाने असा ठराव आहे. आमचा त्याच्यात काही विरोध नाही. बहुतेक तुमचे म्हणणे, आमचे म्हणणे बरोबर आहे.

**मोहन पाटील :-**

मग आपण आपला ठराव मागे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, उद्या जर येथे आमदार आले आणि मुख्यमंत्र्यांना बोलावले तर तुम्ही त्यांचे पाटीवर नांव लिहिणार की नाही लिहिणार? उद्या आमदारांनी येथे उद्‌घाटन लावले आणि त्यांनी इच्छा व्यक्त केली की, गडकरींना बोलवायचे. तर तुम्ही त्यांना उद्‌घाटन करायला देणार की नाही? म्हणून त्यांची इच्छा असेल तर ती दोन नांवे आणि नगरसेवकांची इच्छा असेल तर दोन नांवे त्या पाटीवर असली पाहिजेत असा आमचा आग्रह आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपली उपसुचना या ठरावात नमुद करुन घेण्यांत येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उपसुचना आहे. पण त्या ठरावामध्ये आपण काय लिहिणार आहात?

**मोहन पाटील :-**

उपसुचना, सुचना आपल्या ज्या असतील त्या आपण आपल्या ठरावामध्ये द्या आणि आपण आपला ठराव मागे घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्या अगोदर आपण जी रुलिंग दिलेली आहे. त्याच्यात ह्या सुचना ॲड करण्याचे आपले रुलिंग देत आहात तसे ॲड होत नाही. ह्याचे तुम्ही पुर्णपणे खंडन करा. त्याच्या अगोदरच्या ठरावामध्ये आमच्या सुचना मांडलेल्या नाहीत. त्याच्यात लिहून घेतलेल्या नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस आणि विरोध पक्षनेते परशुराम पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावामध्ये सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी दिलेल्या सुचना, उपसुचनांसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपले रूलिंग झालेले आहे पण तशी कार्यवाही झालेली नाही. त्या ठरावामध्ये कुठेही ह्या सुचना आपण संलग्न करून घेत नाही. ही फार गांर्भीयाची बाब आहे. आता विषय मारुन नेता पण तसे होत नाही.

**मा. महापौर :-**

सदरचा ठराव वाचून कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास कामांची भुमीपुजन, उद्‌घाटन समारंभाचे नामफलक, निमंत्रण पत्रिकेबाबत धोरण निश्चित करणे.

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यांत येतात.

सदर विकास कामांची उद्‌घाटने, भुमिपूजन, समारंभावेळी निमंत्रण पत्रिका व नामकरण फलकावर कोणकोणत्या पदाधिकारी यांची नावे असावित याबाबत वेळोवेळी वाद उत्पन्न होत असतात. मा. स्थायी समिती सभा दि. २२/०१/२००४, ठराव क्र. १९२ व मा. स्थायी समिती सभा दि. २४/०६/२००४, ठराव क्र. ४९ अन्वये परील झालेले आहे.

वरीलप्रमाणे मा. स्थायी समितीचे ठराव रद्द करण्यांत येत आहेत. यापुढे महानगरपालिकेचा कोणत्याही भूमीपुजन, उद्घाटन कार्यक्रम आयोजित करतांना निमंत्रण पत्रिका व नामकरणची पाटी यावर खालील मान्यवरांची नावे ठेवण्यात यावी.

१) मा. महापौर
२) मा. उपमहापौर
३) मा. आयुक्त
४) सभापती, स्थायी समिती
५) सभागृह नेता
६) विरोधी पक्ष नेता
७) प्रभागातील तीन / चार ही नगरसेवकांची नावे
८) संबंधित प्रभागातील प्रभाग समिती अध्यक्ष

तसेच आमदार / खासदार निधीतून केलेल्या कामाच्या उद्घाटन फलकावर संबंधित आमदार / खासदार यांची नांवे लिहिण्यांत यावी. रु. १.०० कोटी रक्कमेच्या वरील कामांच्या उद्घाटन फलकावर सर्व नगरसेवकांची नांवे लिहिण्यंत यावी. आमदार / खासदार निधीतील कामांच्या निमंत्रण पत्रिका व उद्घाटक फलकावर त्यंनी सुचविलेल्या दोन पाहुण्यांची नावे लिहावित. नगरसेवक निधीतील कामाच्या निमंत्रण पत्रिका व नामफलकावर सुद्धा संबंधित नगरसेवकांनी सुचविल्यास दोन पाहुण्यांची नांवे लिहिण्यांत यावी.

प्रत्येक कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मा. महापौर राहतील. कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे मा. महापौरांच्या सुचनेनुसार बोलविण्यात यावे.

वरील पदाधिकारी व अधिकारी यांची नांवे प्रत्येक विकास कामाच्या / नगरसेवक निधीच्या निमंत्रण पत्रिका व नामकरण फलकावर लिहिण्यांत यावीत. प्रशासनाने याबाबत दक्षता घ्यावी असा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र सचिवांनी प्रकरण क्र. ७५ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ७५ प्रवासी तिकीट दर तसेच प्रवासाजवळील सामानाच्या आकारणीबाबत परिवहन समिती ठराव क्र. ६४ दि. २९/११/२००५ च्या अनूशंगाने चर्चा करून निणर्य घेणे. मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. ४ दि. ०४/०१/२००६ अन्वये मा. महासभेस शिफारस केलेले प्रकरण.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब आपण हा ठराव मांडण्याच्या अगोदर मी माझे पत्रव्यवहार या विषयी केलेला आहे. त्याच्या विषयी मला बोलायचे आहे. नंतर मग आपण ठराव मंजुर करून घ्यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण फक्त भाडे टप्प्याबाबत निर्णय घेत आहात. मला वाटते विरोधी पक्षनेते ह्यांचे पत्र प्रवासी भाडयामध्ये वाढ करण्याच्या संदर्भात मला वाटते पत्र दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

वाढ करू नये याबाबत पत्र दिलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

वाढ करत नाही पण आपण काही ठरावीक टप्प्यामध्ये प्रवासी दरामध्ये......

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जे पत्र दिलेले आहे त्याचे वाचन करण्यात यावे नंतर हा ठराव मांडा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेत्यांनी आपल्याला जे पत्र दिले आहे त्यामध्ये परिवहन सेवेच्या प्रवासी तिकीट दराच्या भाडेवाढीबाबत. त्यांनी भाडेवाढीबाबत आपल्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु, आपण सामानाच्या आकारणीबाबत निर्णय घेत आहोत.

**परशुराम पाटील :-**

ठराव नंतर मांडा.

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला या विषयी बोलायचे आहे आपण ठराव नंतर मांडा. ठराव मांडणारच आहात.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७५ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

साहेब, ह्या विषयाला अनुमोदन देण्याच्या अगोदर सगळ्यांची चर्चा होउ द्या. तरच तुम्ही कोणीतरी अनुमोदन द्या. हा पब्लिकचा प्रश्न आहे. नागरीकांचा प्रश्न आहे.

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, महापालिकेची परिवहन सेवा सुरु करण्यासाठी.....

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जेम्स कोलासो :-**

सी.आय.आर.टी.चा आपण जर रिपोर्ट घेतला.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य आपल्याला आता अनुमोदन देता येणार नाही. व्यक्तीगत चर्चा चालू झालेली आहे. अनुमोदन देताच येणार नाही, चर्चा चालू असताना.

**जेम्स कोलासो :-**

महापालिकेचे उपक्रम सुरू करताना आपण कन्सलटन्ट नेमुन सी.आय.आर.टी.चा रिपोर्ट घेतला आणि त्या रिपोर्टमध्ये अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये फक्त सत्ताधाऱ्यांच्या ठेक्यामुळे आणि त्यांच्या हेकेखोरपणामुळे हा उपक्रम राबविण्याचे आपण ठरवले. परिवहन सेवा सुरू होऊन जवळजवळ चार महिने झाले असतील मी प्रथम मागणी करतो या परिवहन सेवेबाबत अनेक वर्तमानपत्रामध्ये उलटसुलट चर्चा येत आहे. तरी संबंधित उपायुक्तांनी या परिवहन सेवेची.....

**मिलन पाटील :-**

वर्तमान पत्राच्या बातम्या काय सगळ्याच खऱ्या नसतात.

**जेम्स कोलासो :-**

म्हणूनच मी विचारतो ना, संबंधित उपायुक्तांनी नक्की या परिवहन सेवेची आजची परिस्थिती काय आहे. ती तोट्यामध्ये चालते की नफ्यामध्ये चालते त्याचा खुलासा व्हावा आणखीन एक मा. हॅरल बोर्जीस साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये सवलती जाहीर केलेल्या आहेत. या आधी आम्हा ग्रामिण भागामध्ये एस.टी.ची. सर्व्हिस चालू होती. त्यावेळीस सर्व विद्यार्थी पासेसना जवळजवळ ७७ टक्के कन्सेशन होते. आपल्या ठरावामध्ये ते पन्नास टक्के केलेले आहे. हे शैक्षणिक दृष्ट्या जे गरिब ग्रामीण भागामधले लोक आहेत त्यांच्यावर अन्याय आहे. शिवाय जो लगेझचा भाव ठरविण्यात आलेला आहे. त्यात सुरूवातीला उत्तनमध्ये उद्‌घाटन होताना संबंधित लोकांनी ग्रामिण भागामधल्या लोकांना थापा ठोकल्या आणि एस.टी. चे प्रचलित दर राहतील असे तिथे जाहीर केले. परंतु, सुरूवातीलाच महापालिकेने भाईंदर ते पाली नऊ रूपये तिकिट लावले आणि त्याचप्रमाणे नऊ रूपये लगेज लावण्यात आले. वास्तविक एस.टी. रेट लगेझचा फक्त एक रूपया होता. म्हणजे लोकांची दिशाभूल करून एस.टी. ला येथुन हद्दपार केले.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, एस.टी.चे लगेझचे भाडे तीन रूपये होते. सभागृहाला चुकीची माहिती देण्यात येत आहे. विचारा तुम्ही.

**जेम्स कोलासो :-**

या ज्या सवलती आहेत या सवलतीवर फेरविचार व्हावा. विद्यार्थी पासेसमध्ये ७७ टक्के जे एस.टी चे कन्सेशन होते ते देण्यात यावे आणि लगेझमध्ये सन्मा. सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे साडेचार रुपये झालेले आहे. एस.टी च्या लगेझचा रेटमध्ये वाढ केलेली आहे. तर लोकांना खोटी माहीती देऊन एस.टी.ला येथुन हद्दपार केले आणि आजच्या तारखेला मी जो सुरूवातीला प्रश्न विचारला आहे की, महापालिकेची परिवहन सेवा तोट्यामध्ये आहे का, नफ्यामध्ये आहे? शिवाय गेल्या दोन महिन्यामध्ये गोराई मनोरीमध्ये रस्ता रोको आंदोलन झाली. त्यांचे म्हणणे असे आहे की, शाळेच्या वेळेमध्ये आपल्या परिवहन सेवेच्या बसेस फार तुटपुज्यांने सुटतात आणि मुले तास-नृ-तास बसस्टॉपवर आणि शाळेच्या आवारात उभी असतात. तर त्यांच्यासुद्धा तक्रारींचा विचार व्हावा. तिथे बसेसच्या फेऱ्या वाढवाव्यात आणि परिवहन सेवेच्या संदर्भात लोकांमध्ये जी चर्चा चालु आहे त्याचा खुलासा व्हावा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आयुक्त साहेब, विषय परिवहन सेवेच्या तिकिट दराच्या वाढीबाबत.

(सदर पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेम्स कोलासो :-**

मी खुलासा विचारला होता, मला अजून उत्तर दिलेले नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतोय, खुलासा देता की....

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्या आणि नंतर सर्व प्रश्नावर एकदम खुलासा करा ना. प्रत्येकाला उत्तर देत बसाल तर.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण परिवहन समितीचा हा जो ठराव मा. महासभेसमोर आणलेला आहे. माझ्या माहितीनूसार परिवहनसमितीची सभा दि. ०४/०१/२००६ ठराव क्र. ४ यांच्यावर सुचक श्री. विद्याधर रेवणकर आणि अनुमोदन मा. सभापतींची सही आहे. आणि मग हे कायदेशीर दृष्टीकोनातुन टेक्निकली पाहता ठराव परिपुर्ण आहे असे आपण समजायला हरकत नाही. परंतु, या ठरावामध्ये जे कोष्टक दिलेले आहे. आता जे सन्मा. सभागृह नेते ह्यांनी अगदी व्यवस्थितपणे शांतपणे वाचले आणि आम्ही शांतपणे ते ऐकले. परंतू, सदर ठराव मंजुर झाल्यानंतर त्याच्यात शेरा हा जो कॉलम आहे. याच्यात संपुर्ण कोष्टकाचा शेरा प्रशासनाला हे दर मंजुर आहेत का? ठराव पास झाल्यानंतर त्याच्यावर प्रशासनाने काय शेरा दिला आहे. त्या शेराच्या ठिकाणी निरंक असे आहे. त्यामुळे हा जो परिवहन समितीचा ठराव मा. महासभेपुढे आणलेला आहे हा पुर्णपणे अपूर्ण असून ह्याच्यामध्ये हा बेसलेस आहे. प्रशासनाला हे दर मंजुर नाही असा ह्याचा समज होतो. प्रशासनाला मंजुर असते तर त्याच्यावर जे कोणी डी.एम.सी. नेमलेले आहेत किंवा आयुक्त साहेब किंवा प्रभारी जो कोणी आहे त्यांची स्वाक्षरी, की प्रशासनाने या समितीने आम्हाला जे दर मंजुर करून दिले ते आम्हाला मान्य आहे. ह्या प्रकारचा शेरा येथे दिलेला नाही हे कोष्टक मुळात अपुर्ण अवस्थेत आहे. हा प्रस्ताव आपण परत घेउन यावा ज्या ठरावाचा आपण या मा. महासभेला हवाला दिला तोच अपुर्ण अवस्थेत आमच्याकडे आला आहे. तुमच्या रॅपरला किंवा तुमच्याकडे काय असेल त्याचे आम्हाला महत्व नाही. पण अगदी स्वयंस्पष्ट असे दिसते की, कुठलाही शेरा प्रशासनाच्या वतीने मारलेला नाही. त्याकरिता ह्या प्रस्तावाची एक बाजु पुणर्पणे लंगडी आहे हा प्रस्ताव पुणर्पणे तुम्ही शेऱ्यासकट सभागृहापुढे आणावा सगळ्यात पहिला म्हणजे त्याच्यावर अन्य बरीच कॉमेन्टस आम्हाला करायची आहेत. पण प्रशासनाचा शेरा काहीच नाही. त्याबद्दल आपण रुलिंग द्यावे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, आयुक्त साहेब तुमच्या राज्यात ही नवीन एक सिस्टम सुरू झाली म्हणजे आधी असे नक्की नव्हते. आम्ही तुमचे लक्ष वेधू इच्छितो की, असे याआधी नक्की नव्हते. आता तुम्ही आग्रहाने करता असे मला वाटायला लागले आहे परिवहन समितीचा ठराव त्यांनी केल्यानंतर आता प्रशासकीय मत काय आहे, ते काही नाही. ह्यांनी ठराव मांडला, तो परिवहनाचा ठराव वाचून दाखवला. परिवहन समितीचा ठराव हा सत्ताधारी पक्षाचा ठराव नाही. आज सभागृहाचा जर ठराव होत असेल त्यांनी त्याची कोणती दुरुस्ती केली, कुठे सवलत दिली? सवलत दिली का, नाही दिली? वाढ केली? दुरूस्ती कुठेच नाही. जसा आहे तसा आणि कोणत्या तारखेला कोणी मंजुरी दिलेली आहे. ह्याच्यात लिहिलेले आहे २३/०८/०५ मा. महासभेने मंजुरी दिली. मग त्याच्यात आता नविन लोकांच्या सुचना आल्यानंतर त्यात तुम्ही लिहिले आहे. सदर भाडे दराबाबत स्थानिक प्रवाशी निरनिराळे राजकीय पक्ष, प्रतिनिधी वेळोवेळी प्रवासी भाड्याचे दर कमी करण्यासाठी पत्राव्दारे विनंती केलेली आहे. कुठे दर कमी केले की वाढवले ह्याचे कोणते कोष्टक आहे? पहिल्यांदा बारा होते आणि आम्ही दहा केले. नउ होते तर सात केले, ह्याच्यात सवलत दिली आहे आणि कीती लोकांची दिशाभुल करायची हे लोक तसेच करणार आहेत. सत्ताधारी पक्षाशिवाय त्यांच्याकडे दुसराच बिझनेस नाही. आता शाळकरी मुलांना जी सवलत द्यायचे जे कोष्टक लिहिले आहे. पंचविस दिवासाचे तर शाळा पंचवीस दिवस चालत नाही. तीस दिवसाच्या ऐवजी पंचवीस दिवस म्हणजे सवलत काय? आणि एक रकमी पैसे घेणार, पाच रुपये पाच दिवस कमी करणार आणि सवलत दिली म्हणून सांगणार. शिक्षण क्षेत्रामध्ये पण तुमचा हेतु शुद्ध नाही. प्रशासनाचे ही नाही आणि सत्ताधाऱ्यांचे ही नाही. मुले कोणाचीही असु दे ना. हेतु तरी शुद्ध असावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जेवढ्या सूचना मांडायच्या आहेत त्या सूचना मांडा.

**रोहीदास पाटील :-**

सुचना देतो.

**मोहन पाटील :-**

सुचना देताना सत्ताधारी काय आणि हे काय हे बोलण्याची आवश्यकता आहे का?

**रोहीदास पाटील :-**

आहे ना.

**मोहन पाटील :-**

नाही, अशी बोलण्याची आवश्यकता नाही. कारण आम्हाला पुर्ण कल्पना आहे. तुमच्याकडे पोटदुखी झालेली आहे. सत्ताधाऱ्यांनी शहराला परिवहन सेवा दिली, ती सेवा देताना तुमचा विरोध झाला होता. परंतु तो विरोध आम्ही मानला नाही. तुम्हाला आम्ही सहभागी केले आणि तुम्ही सहभागी झालात. परिवहन सेवा शहराला मिळाली.

**रोहीदास पाटील :-**

नाही, नाही. एकमताचा ठराव पारित झालेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्ही परिवहन सेवा लुटायला लावली आहे का?

**मोहन पाटील :-**

तुम्ही सुचना लावा.

**मिलन म्हात्रे :-**

परिवहन सेवा लुटते ते चालते.

**मोहन पाटील :-**

तुम्ही तुमच्या सुचना मांडा. सत्ताधारी घ्या.

**रतन पाटील :-**

परिवहन सेवा ही किती लॉसमध्ये आहे ते सांगा ना. लॉसमध्ये किती आहे ते सत्ताधाऱ्याने सांगावे.

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

त्याचे उत्तर तुम्हाला प्रशासन देतीलच. परंतु, तुम्ही तुमच वक्तव्य करताना सत्ताधारीने हे बजावण असणे, हे असे काय? सत्ताधराने परिवहन सेवा सुरू केली. त्या तरी परंतु.......

**रतन पाटील :-**

महापालिकेत सत्ताधारी पक्ष आहेत. ठेकेदार, हे परिवहन सेवे मधले आणि तुम्ही चालवता?

**मोहन पाटील :-**

परिवहन सेवा ही परिपुर्ण तुम्हीच चालवा बेस्ट ची सेवा............

**रतन पाटील :-**

वाटेल तशासाठी शोभता. प्रशासनाला बदली करायला लावलेले आहे. अजुनपर्यंत तुम्ही बदली केलेले नाही.

**मोहन पाटील :-**

आपण विरोधी भुमिका मांडावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषय पटलावर सन्मा. सदस्यांना ज्या सुचना असेल त्यांना त्या मांडायला सांगा.

**मोहन पाटील :-**

आपण सांगू शकत नाही.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने हे संदर्भात करावा.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे. तुम्हाला ही परिवहन सेवा सुरु हवी आणि सत्ताधारी पक्षाची मागणी ही चुकीची मागणी आहे.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही बसा. मी सुचना देतो.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने सांगावे की, परिवहन सेवा लॉसमध्ये चालली आहे की, प्रॉफीटमध्ये चालली आहे हे सभागृहाला कळू दे.

**मोहन पाटील :-**

त्याचा खुलासा होईल आणि झालाच पाहिजे.

**रतन पाटील :-**

खुलासा झालाच पाहिजे.

**मोहन पाटील :-**

खुलासा झालाच पाहिजे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी जे चांगले काम केले आहे. त्याच्याविषयी तुम्हाला वाह वाह करता आली पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

परंतु, कामाला आली हे दाखवा. असे लिहा. आम्ही करून देणार आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, बसुन घ्या.

**मोहन पाटील :-**

तुम्ही काय करु देणार आणि काय करू देणार नाही हे तुम्ही बोलू नका. आमच्या सत्ताधारांच्या कुबड्यावर आपण विकास कामे करत आहेत.

**रतन पाटील :-**

आम्हाला जो काही निर्णय घ्यायचा आहे. तो घ्यायचाच आहे.

**मा. महापौर :-**

संबंधीत अधिकाऱ्यांनी विषयाचा खुलासा करावा. आपण बसुन घ्या.

**रोहीदास पाटील :-**

त्याच्यातल्या दोन सुचना सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

मोहन पाटील यांनी सांगितले की, सत्ताधारांच्या............

**मोहन पाटील :-**

मी काय बोलतो ते विचारा

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही लोक इकडेच पैसे लुटतात. इकडच्या पैशानेच तुमची घर चालतात. आम्हाला तुम्ही काढणार तुमची लायकी तरी आहे का?

**मोहन पाटील :-**

तुमची लायकी आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

सोडून द्या. तुम्ही जरा निट सांभाळून बोला. तोंड संभाळून बोलायचे जरा.

**मोहन पाटील :-**

मी बोललो विकासाची कामे आमच्या............

**मिलन म्हात्रे :-**

दुकाने बंद होतील?

**मोहन पाटील :-**

पहिले ऐकावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाजवा पेट्या वाजवा.

**मोहन पाटील :-**

ही मुळ सत्ताधाऱ्यांचे कुबड्यांवर विकास, तुकड्यांवर नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही तुकड्यांवर बोलले.

**मिलन म्हात्रे :-**

तुकड्यांवर आमच्या, तुमच्या वेगळ्या कुबड्या आणायला नको का?

**मोहन पाटील :-**

आम्हाला सनसनी भाषा कळता आली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मोहन पाटील साहेब, सभागृहाने एकमताने ठराव दिले, हे तुम्ही विसरले.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने याबाबत, परिवहन सेवेबाबत.............

**मा. महापौर :-**

आपण बसुन घ्या. संबंधित अधिकाऱ्याने खुलासा करावा.

**मोहन पाटील :-**

निवडणूकीच्या दृष्टीकोनातुन ही महानगरपालिका, ज्यांनी चांगली विकास कामे केलेली आहेत. ती आपल्याला पहावली नाही. ही आम्हाला पुर्णपणे कल्पना आहे. आणि आपली ऐकायची क्षमता आमच्यात आहे.

**मा. महापौर :-**

संबंधित अधिकाऱ्याने खुलासा करावा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सर्वांच्या सुचना घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये दोन सुचना आहेत. दुसरा तो सर्व साधारण आरक्षण मध्ये त्याच्यामध्ये प्रासंगिक करा. त्याचा तुम्ही रेट लिहिलेला आहे, सहा हजार रुपये. कोणतीही खाजगी बस, आपण लोकांसाटी सेवा करतो. आपला हेतू आहे की नाही. चार हजार रूपयांत जेव्हा लोकांची बस मिळेल तर आपल्या परिवहनची बस कोण सहा हजारात घेणार का? तुम्हाला कसे धन्यवाद देतील सांगा ना. चार हजार रूपयात बस मिळते, साडे तीन हजार रूपया मध्ये मिळते, साडे चार हजार रूपया मध्ये मिळते. त्यांनी याच ठरावात वाचून दाखवले. यात अपंग, सिनियर सिटीझन, विद्यार्थी, प्रार्थमिक विद्यार्थी ते महाविद्यालयीन, काही तंत्र निकेतन किंवा इंजिनिअरींग. मॅडम याचा उल्लेख यायला पाहिजे. आपण सवलत कोणाला द्यायची नंतर अधिकारी कोण येईल, उपमहापौर साहेब, तुम्ही ऐकावे. पट्टी लावून काय बसले. त्याच्यामध्ये चांगल्या सुचना ॲड करा किंवा प्राथमिक पासून ते महाविद्यालयीन किंवा अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय अट रहाणार नाही. ते त्याच्यामध्ये सगळे यायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

विद्यार्थ्यांचा २० दिवसाचा खर्च........

**रोहीदास पाटील :-**

जो विद्यार्थी सवलतीचा आहे त्याचा नक्की खुलासा करा. कसे काय करणार ते, ३० दिवसापैकी २५ दिवसाची सवलत नाही. सिनियर सिटिझन अलग घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम माझी अशी सुचना आहे की, अपंगांना काही सवलत दिलेली नाही. ह्याच्यामध्ये अपंग जास्त आहे त्यांना सवलत द्यावी. कुबड्या आम्हाला नको.

**रोहीदास पाटील :-**

सिनिअर सिटीझन सगळे घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

अपंग जो असतो त्याच्याकडे कुबड्या असतात एवढे मला माहिती आहे.

**रोहीदास पाटील :-**

आयुक्त साहेब, पुन्हा तुम्हाला आमची नम्र विनंती आहे.........

**मोहन पाटील :-**

परंतु, सत्ताधाऱ्यांपेक्षा विरोधी पक्षाची संख्या नगण्य आहे. त्यांना कुबड्या हव्यात.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही प्रशासनाला समज देत नाही, ह्यांना त्याचे काही वाटत नाही. पण तुमचे मत येणार तर आम्हाला एवढी चर्चा करायला लागणार नाही. आपल्याकडे सगळे एक्सपर्ट आहेत. ते डबल एक्सपर्ट आहेत.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी स्टेशनला आपल्या गाड्या उभ्या राहतात व जेव्हा रेल्वे येते त्यावेळी आपल्या ह्या बसेस रिक्षेवाल्यांच्या स्वतःचे मालकीचे आहे असे समजले जाते की, रिक्षावाले सरळ सांगतात 'ये' हा ईशारा कोणता? 'ये' म्हणजे असे काय? आपल्या बस निघून जातात म्हणजे आपण हा तोटा किती सहन करायचा? नागरिकांचे किती हाल होतात. अर्ध्या-अर्ध्या तासाने, एक एक तासाने तुम्ही ज्या बसेस ठेवल्या आहेत त्या पंधरा पंधरा मिनिटांनी ठेवा किंवा दहा मिनिटांनी ठेवा. कारण आमच्या येथे ९० फुटीला ज्या बसेस येतात. एक जर रिक्षात माणूस असेल तर दहा रूपये घेतो आणि आपल्या बसेस एक एक तासाने येतात. मी मागच्या वेळेलाही सभापती साहेबांना बोलले होते की, हा इशारा आहे तो कमी करा आणि आपल्या स्वतःच्या बसेस चालवा तिथे आपली माणसे काय करतात? परिवहन समिती काय करते? म्हणजे एखाद्याला धमकी दिल्यासारखे होते ना. म्हणजे रिक्षावाले वाटेल ते धमकी देतात का, आपल्या परिवहनवाल्यांना हे कितपत योग्य आहे?

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे ते समजले नाही की, कोणी कोणाला धमकी दिली? बसवाल्याला धमकी दिली की, रिक्षावाल्याला धमकी दिली? अति महत्वाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. फक्त आपल्याला समजण्यात आले नाही की, नक्की काय सांगायचे होते. ही हसण्याची गोष्ट नाही. परीवहन सेवा ही सर्व शहरासाठी उपयोगी सेवा आहे आणि आपण शहरात एक चांगला कार्यक्रम राबविला आहे आणि परीवहन सेवा ही आपल्या शहराला पाहिजे आणि सुरूवातीला तोट्यात जाणार हेही आपण मान्य करायला पाहिजे. कारण जेव्हा आपण आपली परीवहनची सेवा ठाण्यापर्यंत आणि बोरिवली पर्यंत वाढवणार......

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, किती असा किती तोटा आपण सहन करायचा?

**रिटा शहा :-**

आणि त्याच्यामध्ये मी अजुन एक सुचना देत आहे की, भाईंदर पश्चिमेपासून दहिसर चेक नाक्यापर्यंत बस चालू करण्याची गरज आहे. कारण रिक्षावाले दहिसर चेकनाक्यापर्यंतचे ५५ ते ६० रुपये असे भाडे घेतात जर आपण अशी बससेवा दिली तर मला वाटते की, आपली परिवहन सेवा चांगली चालणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने जी परिवहन सेवा जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध केली आहे. या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये गेली आठ वर्षांपासून आम्ही कला क्रिडा महोत्सव साजरा करतो, मिरा भाईंदर कला-क्रिडा समितीव्दारे, त्या समितीने परिवहन सेवेचे सभापती ह्यांच्याशी पत्रव्यवहार करुन रात्री बाराच्या दरम्यान दोन बसेस सुभाषचंद्र बोस मैदान येथून सोडाव्यात अशी त्यांना विनंती केली होती. पण ती नागरीकांच्या सोयीसाठी न करता त्यांनी त्या पत्राला साधे उत्तर ही देऊ शकले नाही की, आम्ही तुमची सेवा तुम्हाला देउ की, नाही की, नाकारतो हेही दिले नाही. आपण ही जी सेवा चालू केली आहे ती जनतेच्या सेवेसाठी आहे आणि या प्रशासनाने आम्हाला साधे एक पत्र सुद्धा पाठवलेले नाही. यासाठी या गोष्टीचा मी निषेध करतो की, ही जनतेची सेवा नाही ही तुमची सेवा आहे. आपली खिसे भरू सेवा आहे असे झाले आणि आम्ही जनतेसाठी भांडत होतो, की वैयक्तीक शशिकांत भोईर त्या बसमधुन रात्री बारा वाजता जाणार होते तसे नाही. कारण आमचा कार्यक्रम हा कधी बारा वाजता, एक वाजता संपत असे. पण जे नागरीक मिरा रोड, सृष्टी किंवा काशीमिरा मधून यायचे त्यांचे अतोनात हाल व्हायचे. रिक्षावाले त्यावेळेस चाळीस रूपये, पन्नास रूपये असे भाडे घ्यायचे ते परवडत नव्हते. पण या परिवहन सेवेने आमची कधीही विनंती मान्य केलेली नाही. तरी ह्याच्यावर आपण लक्ष ठेवावे ही विनंती आपणांस करतो.

**लिला पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, याबाबतीत मी पत्रव्यवहार ही केलेला आहे. आपणाला एक विनंती करते की, सिग्नल पासुन न्यू गोल्डन नेस्ट येथून इंद्रलोक, ज्योती पार्क, श्रीनाथ धाम आणि विमल डेरी येथे भरपूर लोकसंख्या आहे आणि तिथे लोकांना अक्षरक्षः त्रास होतो. रिक्षावाले अव्वाचे सव्वा त्यांच्याकडून भाडे घेतात. त्यासाठी आपण जर तेथून एक बस सेवा सुरू करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जब से बससेवा शूरू हूआ है उत्तन का जो पहिले एस. टी. सेवा था उसका फेरा जास्ती था और अपनी बससेवा होने के बाद उसका फेरा कम कर दिया। हमलोग २५० कि.मी. का रोज का भाडा देते है। अपनी बससेवा किमनी चलती है। २५० कि.मी. चलती नही। मै देखता हू की, पूल के निचे कभीभी जाओ वहा दो या तीन बस खडी रहती है। फीरभी पुरे परिवहन की सेवा चालू नही रहती और पूरा बस का भाडा अपनेको देना पडता है। परिवहन सेवा खडी करने के लिये जो ठेकेदार मा. महासभा मे पास हूआ की, वह अपनी जगह खुद नक्की करेगा। हमारी महापालिकेकी जगह उनको कीसने दिया, कभी दिया? कभी अपने यहा पास नही हुआ और कितने मे भाडे मे दिया? जो बस खडी रहती है उसको कन्डक्टर पाणी से धोता है उस धोने का खर्चा है वह कौन दे रहा है? अपने महापालिकाका वहलोग पाणी खर्च कर रहे है । वह भी कभी पास नही हुआ है । अभी जो सवलती का भाडा आपने कहा है उसमे आप जो एक महिनेका २६ किया है उसकी जगह बढाईए। नही तो उसमे कोई सवलत होती नही है। जो सामाजिक काम के लिए धार्मिक काम के लिए कभी भीड होती है। तो यहा पे आके कोई समुदाय आपसे रिक्वेस्ट करता है, सुधांशु महाराजने आपके यहा रिक्वेस्ट किया की, हमको बस भेजीए आपने उनको लेटर दिया की, बस आएगी लेकीन एक भी बस आपकी तरफ से गई नही। यह फसवणूक जैसा हो रहा है की हमलोग बस भेजेंगे लेकिन आपके पास बस नही है। बस वहा खडी रहती है फिरभी आप वहा बस भेजते नही है। ऐसी किसको आप आश्वासन नही देना चाहीए की, हमारी बस हमारे पास है, हम भेजेंगे और कौनसा रूट बंद किया कभी उसकी सुचना भी नही देते हो। जैसा सन्मा. सदरचा रिटा शहा मॅडमने कहा की, भाईंदर वेस्ट से आपको चेक किया है, लिखित मागणी भी किया है। लेकिन बस चालू नही कर रहे है। भाईंदर ईस्ट से बोरीवली, मलाड सब जगह बसेस जा रही है लेकिन भाईंदर वेस्ट से कोईभी सेवा चालू नही है। उसके लिए आप तुरंत वह सेवा चालू करवाईए।

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर अधिकारी खुलासा देतील.

**रतन पाटील :-**

आम्ही विचारलेल्या प्रश्नाचा खूलासा देणार आहात की, परिवहन सेवा कशी चालली आहे? त्याचा खुलासा द्या?

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण असे करु नका. उगाच पुन्हा पुन्हा बोलायला लावू नका.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबा, ठराव मंजुर नाही. चर्चा चालू आहे.

**रतन पाटील :-**

विद्यार्थ्यांसाठी ज्या सुचना आहेत, त्या सुचना सूद्धा मांडायच्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सुचना केलेली आहे.

**रोहीदास पाटील :-**

साहेब, प्रारूप काय करता? दुरूस्त्या काय घेतल्या आहेत त्याचे वाचन करा. समजावून सांगा आम्ही मान देतो ना तरी बोलता मान देत नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये परिवहन सेवेच्या संदर्भामध्ये जी काही चर्चा सुरू आहे. सन्मा. सदस्यांच्या त्या बाबती जाणून घेण्याची आतुरता किंवा ही परिवहन सेवा आपण जी चालू केलेली आहे ही सेवा आहे. ही भावना लक्षात घेता. परिवहन सेवा जेव्हापासुन आपण सुरु केलेली आहे तेव्हापासुन आतापर्यंत महापालिकेला पर्यायाने परिवहन उपक्रमाला किती पैसे जमा झाले, किती खर्च झाला किंवा इतर शहरांच्या तुलनेमध्ये आपण ही जी परिवहन सेवा सुरू केलेली आहे ती कशी यशस्वीरित्या चालु आहे या संदर्भामध्ये सभागृहाला माहिती देण्यात येइल आणि मी परिवहन सेवेचे सहा. आयुक्त मनाळे आहेत त्यांना मी सुचना देतो की, त्यांनी याबाबतीतली संपुर्ण माहिती द्यावी.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सा़े.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपली बससेवा १५ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे. आता सध्याच्या घडीत एकूण २३ बस आपल्याकडे धावतात डिसेंबर महिन्याचा आम्ही लेखाजोखा जवळ ठेवलेला आहे की, डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत आपल्याकडे वीस बसेस धावायच्या वीस गाड्या आणि दहा अकरा मार्ग होते. तर नियोजीत किलोमीटर प्रतिदिवस आणि गॅरेंटेड जे आपण म्हणतो की, अडिचशे किलोमिटर पर डे देता किंवा नाही वगैरे वगैरे. जर वीस बसच्या हिशोबाने आपल्याला जर गॅरेंटेड किलोमिटर पर डे चे पाच हजार असताना आपल्या गाड्या प्रत्यक्षात ५,५३९.५ कि. मी. धावत होत्या. म्हणजे आपण त्यांना जे हमी किलोमीटर दिले होते की, मीनीमम एवढे त्याच्यापेक्षा जास्त धावतात. दुसरी बाब आहे, अर्निंगची, अर्निंगवर बऱ्याच वेळेपासून चर्चा होत आहे. डिसेंबर महिन्याचे एकुण उत्पन्न फक्त बसच्या तिकीटाच्या माध्यमातुन ३४,५२,७४१ रू. इतके झालेले आहे आणि ठेकेदाराला देय आहे ते एकोणीस रुपयाच्या दराने तर त्याची देय अमाऊन्ट होते ३२ लाख ५५ हजार. म्हणजे आपण ठेकेदाराला जे एकोणीस रुपयाच्या देय दराने जे देतो त्याच्यापेक्षा आपली रिकव्हरी जास्त आहे. अगदी कमी कालावधी आपण ठेकेदाराचे एकोणीस रुपये देऊन त्यापेक्षा सुद्धा आपली अर्निंग जास्त होते. ही निश्चितच आपल्यासाठी चांगली बाब आहे. आज जवळपास आपले पर किलोमीटर अर्निंग हे वीस रुपयापेक्षाही जास्त आहे आणि एकोणीस रुपये हे ठेकेदाराचे आपण देतो. म्हणजे आस्थापना रिलेटेड खर्च वगळता आपण इतर खर्चाची रिकव्हरी केलेली आहे आणि आपण इतर खर्चाची रिकव्हरी केलेली आहे आणि आपण आणखीन इतर मार्ग अवलंबणार आहोत. आपण बसवर जाहिराती लावणार आहोत. या माध्यमातून आपण उत्पन्न वाढवणार आहोत. त्याच्यामुळे आपले अर्निंग भविष्यात आणखीन वाढणार आहे आणि आपण ना नफा ना तोटा या तत्वावर चालवू.

**जयंत पाटील :-**

आज आपली परिवहन सेवा फायद्यात आहे का?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सा़े.) :-**

साहेब, तेच सांगतोय की, आज आपण ठेकेदाराला एकोणीस रुपये पर किलोमीटर जरी देत असलो तरी आपली अर्निंग ही वीस रुपये पाच पैसे ते वीस रुपये पन्नास पैशांच्या दरम्यान पर किलोमीटरची आपली अर्निंग आहे. आपण ठेकेदाराचे जे पेमेन्ट करतो त्यापेक्षा अर्निंग जास्त आहे. फक्त आता ॲडमिनीस्ट्रेटीव्ह एक्स्पेन्स आपल्याला थोडे बहोत बेअर करावे लागत आहे. जर आणखीन येथे पर्यायाचा आपण जर विचार केला आणि ठाणे, बोरीवली रुटवर प्रत्यक्षात गाड्या धावायला लागल्या तर अर्निंगमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे.

**जयंत पाटील :-**

आत्ताची परिस्थिती काय? आपण आत्ताच्या परिस्थितीवर बोला.

**मा. आयुक्त :-**

आपली आत्ता जी परिस्थिती आहे ती खरंच कौतुकास्पद आहे.

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण उगाच आपली पाठ थोपटवून घेण्याचे काही कारण नाही. आपण जर एवढे प्रॉफीटमध्ये दाखवता तर भाव वाढवण्याचे कारण काय?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये एका गोष्टीची गफलत झालेली आहे. आपण काही प्रवासी टप्प्यामध्ये बदल करत आहोत. बाकी दुसरे कुठेही आपण बदल केलेला नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते, मला बोलू द्या ना. आज आपण सांगता, चार महिन्यामध्ये, चारच महिने झालेले आहेत. चार महिन्यामध्ये आम्हांला भाववाढ करण्याची गरज भासली. का? आम्ही लॉसमध्ये गेलो. आजच्या महाराष्ट्र टाईम्सला एवढा मोठा लेख आलेला आहे. आज संपुर्ण महाराष्ट्रामध्ये तो वाचला गेला असेल आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा ही लॉसमध्ये आहे. प्रत्येक महिन्याला तीन ते साडेतीन लाख रुपये लॉसमध्ये आहे. विरोधी पक्षनेत्याचे त्याच्यामध्ये नांव आहे. त्यांचासुद्धा पत्रव्यवहार त्या बाबतीत आहे. हा जो लॉस झाला आहे तो लॉस का झाला? चार महिन्यामध्ये डिझेलचे भाव वाढलेले नाही. इतर काही भाव वाढलेले नाही. मग पुर्वी जे आम्ही ठरवलेले दर आणि आजचे दर ह्याच्यामध्ये एवढी तफावत का? की, आम्ही जे दर ठरवले ते अगदी डोळे झाकून ठरवले का? असे आपल्याला म्हणायचे आहे का? चार महिन्यामध्ये आम्ही भाव वाढवतोय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभेमध्ये ठरवले होते की, सहा महिन्यापर्यंत भाव वाढवणार नाही.

**जयंत पाटील :-**

आणि आपण तसे कबुल केले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण कबुल केले होते की, सहा महिन्यापर्यंत भाव वाढवणार नाही.

**जयंत पाटील :-**

त्यावेळेस शेख साहेब होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी मी प्रश्न उपस्थित केला होता.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण जरा समजून घ्या.

**जयंत पाटील :-**

आपण आम्हांला बोलू द्या. एक तर अनेक बाबींमध्ये आपण त्रुटी ठेवल्या आहेत. त्यावेळेस आम्ही सुचना केल्या. परंतु, त्यावेळेस असे भासवले गेले की, परिवहन सेवा ठिक आहे. या शहराचे भाग्य आहे. या शहरामध्ये आपली स्वतःची परिवहन सेवा आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण ह्याचा अर्थ असा नव्हे की, एवढ्या घाईगर्दीमध्ये ते करायला पाहिजे होते. कुठल्याही तऱ्हेचे इन्फ्रास्ट्रक्चर आमच्याकडे नसतांना त्यावेळी मी विषय काढला होता की, ड्रायव्हरला झोपायला आज आम्ही व्यवस्था करतोय. स्थायी समितीला तो विषय आला. पुलाखाली त्यांची राहण्याची व्यवस्था करा अशा तऱ्हेचा ठराव मांडला गेला. त्याची आम्हांला काय आवश्यकता नव्हती. ड्रायव्हरची व्यवस्था करणे हे आमचे काम नव्हते. परंतु, ती व्यवस्था आम्ही केली कारण की, परिवहन सेवा ही आमची आहे. चार महिन्यामध्ये एवढे प्रचंड दर आम्ही वाढवतोय. या शहरातल्या सर्वसामान्य नागरिकांना..........

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जे वक्तव्य करता किंवा सभागृहाला आपण जी माहिती देता, त्या माहितीच्या आधारे मी आपल्याला फक्त एवढेच सांगू इच्छितो की, हा जो प्रस्ताव आलेला आहे हा दरवाढीचा प्रस्ताव नाही. आपल्यासमोर जो प्रस्ताव आहे तो प्रस्ताव दरवाढीचा नाही.

**जयंत पाटील :-**

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण कन्डक्टरची भरती केली. तर स्थानिक लोकांना आपण नोकऱ्या द्याव्यात असा त्यावेळी ठराव झालेला आहे. आपण किती स्थानिक लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत? साहेब, असा ठराव झालेला आहे. मला वाटते आपण त्यावेळेस नव्हते.

**मा. आयुक्त :-**

आपली स्थानिकची व्याख्या काय?

**जयंत पाटील :-**

जी व्याख्या आम्ही गृहीत आहे तीच व्याख्या आहे. त्यावेळेस त्यांची नांवे घेतली नाही. ह्या ठिकाणचा मुळचा समाज जो आहे ख्रिश्चन, कोळी, आगरी की, इतर पाचकळशी ह्यांच्या तरुण मुलांना नोकऱ्या मिळाव्यात अशा तऱ्हेचा ठराव झालेला आहे. अशा किती लोकांना आपण या परिवहन सेवेमध्ये नोकऱ्या दिल्या आहेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पंधरा वर्षांचा दाखला? आहे ना पंधरा वर्षांचा दाखला.

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे मिरा भाईंदरमध्ये न राहणाऱ्या लोकांनासुद्धा आपण बाहेरुन येथे खास बोलावून घेतले की, या लवकर परिवहन सेवेमध्ये भरती चालू आहे. लवकर धावत या इकडे. माझ्या घरातले कोणी नको. माझा कुठलाही नातेवाईक मी येथे लावणार नाही. परंतु, येथे अनेक तरुण गरीब आहेत. ही चर्चा सभेमध्ये झालेली आहे. महापालिकेमध्ये ठराव मंजुर झालेले आहेत. मा. महापौर मॅडम, ह्यांना तो ठराव

माहिती आहे आणि त्यांचे इम्प्लिमेंन्टेशन व्हायला पाहिजे. आपण गावावरुन जी लोक बोलावले, मला मंजुर आहे की, ते गरीब आहेत आणि गरीब असतील.

**मा. आयुक्त :-**

आपण जी परिवहन सेवा सुरु केलेली आहे ही सभागृहाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आपण परिवहन सेवा सुरु केलेली आहे. सन्मा. सदस्यांना मी ह्याच्या पुढे जाऊन सांगतो की, आता जो काही प्रश्न उपस्थित केला की, स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य द्यावे. स्थानिकमध्ये साधारण शासनाने जी काही व्याख्या केलेली आहे की, या महाराष्ट्रामध्ये सलग पंधरा वर्ष राहिलेला असेल, तोच स्थानिक होतो. पर्टीक्युलर फक्त भाईंदर पुरता विचार करणे हे असे स्थानिक होत नाही. तर त्याला जे काही शासनाने नियम आणि निकष लावून दिलेले आहेत ती व्याख्या ही फार व्याप्त स्वरुपाची आहे, संकुचित स्वरुपाची नाही.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आपण हा जो विषय आणला आहे, पंधरा वर्षाचा तो विषय चांगला आहे. पण आम्ही मराठी शब्दामध्ये बोलतो की, आत्ताच्या गव्हर्नमेंटचाच हा रुल आहे की, कसेल त्याची जमीन आणि राहिल त्याचे घर, हे आम्हांला माहिती आहे आणि ते तसे वाक्यच आहे. तरीसुद्धा मागच्या वेळेला मा. महासभेमध्ये जे लोक भरले गेले, बाहेरुन लोक भरले गेले. स्थानिक लोक सुशिक्षित आहेत, सगळे आहे. त्यांची भुमी गेली, सगळे गेले व त्यांच्या जागेवर ॲक्वायर्ड झालेले आहेत. नगरपालिकेने सोय केलेली आहे. रिझर्व्हेशन झालेले आहे. त्यांनासुद्धा नोकऱ्या नाही. आपण त्यांना एम्प्लॉयमेंट थ्रु मागवून घ्यावे असा आपला ठराव झाला होता आणि शिंदे साहेबांना मी जास्त करुन बोललो होतो की, ह्याच्यापुढे आम्ही स्थानिक लोकांची लिस्ट मागवून घेऊ आणि त्यांना आम्ही नगरपालिकेमध्ये समाविष्ट करुन घेऊ आणि आता हाच मुद्दा आलेला आहे. आत्ता लोकांनी करायचे काय? बाहेरचे लोक आहे, त्यांना खेचुन बांधुन आणले व त्यांना नोकऱ्या दिल्या. त्यांचेही पोट आहे. त्यांनीही यावे. पण त्याला काय प्रमाण आहे की, नाही? मग इथल्या लोकांनी कुठे जायचे? आम्ही लोकांचे कसे समज घालायचे? आज आम्हांला आमच्या लोकांनी मदत केलेली आहे. ती कशाकरिता केली? तर त्यांना नोकरीच्या पदाची आस आहे म्हणून त्यांनी आम्हांला निवडून दिलेले आहे. मग त्यांना आम्ही कोणत्या पद्धतीने पटवून द्यायचे? आयुक्त साहेब, आपण या विषयावर विचारा करावा. कारण जर त्यांच्याकडे बॅच नसेल तर त्याला सांगून बॅच काढून घ्या. ड्रायव्हींगचे बघतो ना. मी सभागृह नेते साहेबांनासुद्धा सांगितले आहे. आम्हालासुद्धा ड्रायव्हींगचा अनुभव आहे, कशी ड्रायव्हींग करायची. गाडी कशी चालवतात. काय करतात,. नुकसान होणे, न होणे हे त्या ठेकेदाराचे काम आहे. आम्हांला त्याच्यात काही बोलायची इच्छा नाही. तरीसुद्धा आपण नोकरी देतांना विचार केला पाहिजे. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेबा आपण विचार केला पाहिजे की, स्थानिक लोकांचा विचार करुन त्यांना आपण महानगरपालिकेमध्ये रोजंदारी दिली पाहिजे असे आमचे प्रामाणिक मत आहे.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब, एक मुद्दा अजुन क्लिअर झालेला नाही. खाजगी ठेकेदाराकडून जेव्हा ड्रायव्हर ठेवले जातात तर त्या ड्रायव्हरकडून जर ॲक्सीडेंट झाला तर त्याचा कुठेही सभागृहामध्ये उहापोह झाला नाही. त्याची सुरक्षितता काय? ड्रायव्हरकडून ॲक्सीडेंट झाल्यानंतर त्याच्याबद्दल आपली सुरक्षितता काय? हा विषय कधीही चर्चेला आलेला नाही. ड्रायव्हर शिक्षित आहे की, प्रशिक्षित आहे की सक्षम आहेत त्याची छाननी त्यांनी करायची आहे. पण जर एखाद्या बसचे ॲक्सीडेंट होत आहे तर नागरिकांची सुरक्षितता काय? हे अधिकाऱ्यांचे काम आहे की, चर्चेला विषय आणुन सभागृहाला माहिती देणे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. विरोधी पक्ष नेते ह्यांनी जे काही आत्ता सभागृहामध्ये निवेदन केलेले आहे, त्या संदर्भामध्ये मला फक्त एक सांगावेसे वाटते की, परिवहन सेवेसाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग अद्यापपर्यंत शासनाने त्याला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे ह्या ठिकाणी भरतीचा प्रश्न निर्माण होत नाही. परिवहन सेवा आपण जी सुरु केलेली आहे ती ठेका पद्धतीने सुरु केलेली आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्याचप्रमाणे सन्मा. रोहिदास पाटील ह्यांनी जो काही प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भामध्ये आपण ठेकेदाराशी जो काही करारनामा केलेला आहे त्या करारनाम्यामध्ये आपण स्पष्ट असे ॲक्सीडेंटच्या बाबतीमध्ये तरतुद नमुद केलेली आहे आणि संपूर्ण जबाबदारी ही ठेकेदारांची आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी परिवहन समितीच्या संदर्भातले काही टप्प्यांमध्ये वाढ आणि काही टप्प्यांमध्ये कमी असा जो विषय आला त्यामध्ये विद्यार्थी वगैरे सर्वांनी आपआपल्या सुचना मांडल्या. त्याप्रमाणे सुचनांचा विचार व्हावा. यामध्ये नगरसेवक, पत्रकार ह्यांना काय सुविधा आहे का? ह्याचाही विचार व्हावा. त्याचप्रमाणे मॅडम, या ठिकाणी जी परिवहन सेवा आहे ती परिवहन सेवा पुर्णपणे एका स्वरुपाने या मिरा भाईंदर शहरामध्ये चालत आहे. मग त्या गाड्यासुद्धा ठेक्याने आहेत, ड्रायव्हर ठेक्याने आहेत, जो स्टाफ कार्यरत आहे तोही ठेक्याने आहे. परंतु, हे काम करत असतांना ह्याच्यावर जी देखभाल आहे ती प्रशासनाची आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे. आपण ही देखभाल करत असतांना परिवहन सेवा मिरा भाईंदर शहरामध्ये चालतांना अनेक वेळेला वादविवाद झालेले आहे. परिवहन सेवेमध्ये ड्रायव्हर लोकांना उत्तन, पाली

या ठिकाणी मारहाण झाली. मिरा रोड या ठिकाणी मारहाण झाली. त्यावेळेला प्रशासनाच्या वतीने काहीही करण्यांत आले नाही. ठेकेदारांनी त्यांच्या पद्धतीने प्रयत्न केले. त्या ड्रायव्हरांना काही सुविधा नाही किंवा हे जे कर्मचारी आहेत त्यांनादेखील सुविधा नाही की, जर उद्या गाड्या अडवल्या जातात. मागे तर एस्सेलवर्ल्डला गाडी जात होती. त्यावेळेला रिक्षावाल्यांनी गाड्या अडवल्या आणि कंन्डक्टरला आणि ड्रायव्हरच्या अंगावर मारहाणीला गेले. त्यावेळी देखील आपल्या प्रशासनाच्या वतीने कोणत्याही अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन तो विषय मिटविण्याचा प्रयत्न केला नाही. कारण तो दिवस सुट्टीचा होता. अधिकाऱ्यांना फोन केला तर ते सांगतात की, आज आमची सुट्टी आहे. तुमचे तुम्ही मिटवून घ्या. जर असा प्रकार होत असेल तर परिवहन सेवेवर देखभाल कोणाची आहे? प्रशासनाच्या वतीने परिवहन सेवेमधल्या ज्या त्रुट्या आहेत, छोट्या-मोठ्या ज्या त्रुट्या आहेत, जे रात्रीच्या वेळेत काही टप्प्यांमध्ये गाड्या चालू आहेत, जिथे प्रवासी भेटत नाही. त्या गाड्या थांबवल्या तर तेवढे किलोमीटर वाचून महापालिकेला जो काही तोटा होत आहे त्या तोट्यामध्ये कमी झोन आणि प्रॉफीटमध्ये भर पडेल या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नेहमी आपण या सभागृहामध्ये स्थानिकांना नोकर भरतीमध्ये सामावून घ्यावे असे सर्व सदस्यांचे म्हणणे आहे आणि आपण प्रशासनानेही त्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत. परंतु, ज्यावेळेला महानगरपालिकेची निवडणुक जाहिर झाली त्यावेळेलाच सर्व पक्षाने आपआपल्या परिने आश्वासने दिली की, आम्ही हे करु ते करु. त्यामध्ये परिवहन सेवा चालू करु असे सर्व पक्षांने संगितले होते. परंतु, तेव्हापासून ज्या ज्या पक्षांनी स्थानिकांना नोकऱ्या द्यायचा विषय केला तर प्रत्येक पदाधिकाऱ्याला माहिती आहे की, परिवहनमध्ये नोकरी द्यायची झाली तर कंन्डक्टरचा लायसन्स बॅच पाहिजे. ड्रायव्हर ठेवायचा असल तर त्याचा बॅच पाहिजे परंतु, कोणीही आपल्याकडे नोकरी मागणी करण्यासाठी जो कोण मुलगा येईल, त्याला कधीही असे मार्गदर्शन केले नाही की, तू कंन्डक्टरचा बॅच काढ किंवा ड्रायव्हरचा बॅच काढ. ज्यावेळेला परिवहन सेवा चालू व्हायची वेळ आली तेव्हा स्थानिक मुले कन्डक्टरचा बॅच नव्हता म्हणून त्यांना नोकरी मिळाली नाही. आत्ता दुसऱ्या टप्प्यामध्ये जे स्थानिक येतील व जे मिरा भाईंदरचे रहिवासी आहेत त्यांना दुसऱ्या टप्प्यामध्ये ठेकेदारामार्फत सामावून घेतले जात आहे. ही एक महत्त्वाची बाब आहे. परंतु, आपण प्रत्येक लोकप्रतिनिधी ज्यावेळेला प्रशासनावर आरोप करतो, त्यावेळेला आपणही विचार करायला पाहिजे की, आपल्याकडे आलेल्या सुशिक्षित बेरोजगार मुलाला आपण काय मार्गदर्शन करतो, आपणच त्याला बॅच काढण्यासाठी मार्गदर्शन करत नाही आणि आपणच म्हणतो की, त्यांना परिवहनमध्ये घेतले नाही. का तर त्याच्याकडे बॅच नाही? या गोष्टींवर विचर केला पाहिजे आणि प्रत्येक पदाधिकाऱ्याच्या आपआपल्या संस्था आहेत. त्यामध्ये आपण स्थानिकांना किती प्राधान्य दिले ह्याचा देखील प्रत्येकाने विचार करावा. स्थानिक हा या शहरामध्ये किंवा कोणत्याही शहरामध्ये पंधरा वर्षापासून रहिवासी असेल, ज्याच्याकडे त्या शहराचे नागरिकत्व असेल, एम्प्लॉयमेंट कार्ड असल, समाजकल्याण कार्ड असेल, आणि होणाऱ्या नोकरभरतीमध्ये एम्प्लॉयमेंट कार्ड, समाजकल्याण थ्रु अर्ज मागवून नोकर भरती करावी आणि त्यामध्ये स्थानिकांना जास्तीत जास्त प्राधान्य कसे देता येईल या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करावे हे मी या ठिकाणी सागु इच्छितो.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले ह्यांच्या म्हणण्याशी मी सहमत आहे. मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. पण स्थानिक आगरी, कोळी लोकांना त्यांनी मार्गदर्शन केलेले नाही. त्यांनी मार्गदर्शन केले आपल्या गावच्या लोकांना आणि स्थानिकांना परत पाठवले.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, आम्ही स्थानिक आगरी, कोळी लोकांना लायसन्स मिळण्याबाबत मार्गदर्शन केले आहे आणि स्थानिक आगरी, कोळी ह्यांना आम्ही लायसन्स मिळवून दिले आहे आणि त्यांना नोकऱ्या आम्ही दिलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाला सांगावे लागेल की, स्वातंत्र्य सैनिकांची मुले या महापालिकेत लागली होती. ती ह्यांच्या एकाच्या तक्रारीने बाहेर गेलेली आहेत. हे सभागृहाला माहिती असायला पाहिजे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, मी खुलासा करु इच्छितो की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी जो विषय मांडला.........

**जयंत पाटील :-**

आणि मला माहिती आहे, मी गंभीरपणे या विषयाबद्दल सभागृहामध्ये बोलतो की, कॉन्ट्रॅक्टरचा रेट ठरवला गेला. एका कॉन्ट्रॅक्टरने भरती करतांना किती पैसे घ्यायचे हा रेट तिथे ठरला गेला. त्याच्यामुळे इथला आगरी समाज, गरीब माणूस नोकरी करु शकला नाही. हा मी आरोप करतो. कोणीही माझा हा आरोप खोडून टाकावा.

**नयना म्हात्रे :-**

कारण त्याच्याकडे द्यायला डोनेशन नाही.

**जयंत पाटील :-**

एवढे पैसे कोण देऊ शकणार? वीस हजार, चाळीस हजार, पन्नास हजार रुपये कंन्डक्टरसाठी कोण देणार? हा मी सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक असूनसुद्धा मी बोलतो. कारण हे घडले आहे हे चुकीचे आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, अशी जर भरती त्या ठिकाणी झाली असेल तर जो वाहक म्हणून असेल त्याला त्या ठिकाणी कामावर ठेवण्यांत येणार नाही. ज्या जागेवर असेल त्या..........

**जयंत पाटील :-**

भ्रष्टाचार कधीही समोर होत नाही.

**मोहन पाटील :-**

पुर्णपणे पारदर्शकरता पाहिजे.

**जयंत पाटील :-**

भ्रष्टाचार सांगून होत नाही, समोर होत नाही.

**रतन पाटील :-**

जे पैसे घेऊन येतील त्यांना ठेवायचे नाही.

**रोहिदास पाटील :-**

कंन्डक्टर बॅच असलेली राई, मोर्व्याची मुले होती. त्यांना घेतले नाही. कंन्डक्टरसाठी आलेले अर्ज काढा. मोर्व्यांची मुले आहेत, राईची मुले आहेत. पैसे दिले नाही म्हणून त्यांना घेतले नाही.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले ह्यांनी जो मघाशी प्रश्न उपस्थित केला की, गोराई व एस्सेलवर्ल्ड येथे रिक्षावाल्यांनी आपल्या एस.टी. ड्रायव्हरला मारले, मारहाण केली. त्या कारणाने आत्ता मी आयुक्त साहेबांना विचारतो की, मी आपली जेव्हा भेट घेतली होती तेव्हा मला वाटते आपण एस.टी.च्या बाबतीमध्ये बॉम्बेमध्ये आणि ठाण्यामध्ये बस चालू करायची आहे. तर साहेब त्याचे मिटींगचे काय झाले ते आपण सभागृहाला सांगा की, ते आपल्याला परमिशन देणार आहेत की नाही?

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजुर. ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ७५ :-**

प्रवासी तिकीट दर तसेच प्रवाशांजवळील सामानाच्या आकाराबाबत परिवहन समिती ठराव क्र. ६४ दि. २९/११/२००५ च्या अनुषंगाने चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीने दि. २/८/२००५ प्रकरण क्र. २०, ठराव क्र. २१ अन्वये परिवहन उपक्रमाच्या बस सेवेसाठी भाडेसारणी निश्चित केली आहे. सदर भाडेसारणी मा. महासभा ठराव क्र. ३८ दि. २३/८/२००५ अन्वये भाडेसारणीस मान्यता दिलेली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, ठाणे यांनी त्या भाडेसारणीस मंजूरी दिलेली आहे.

सदर भाडेदराबाबत स्थानिक प्रवासी आणि निरनिराळे राजकिय पक्ष प्रतिनिधींनी वेळोवेळी प्रवासी भाड्याचे दर कमी करण्यासाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. MVA-०६/१३२८ प्र.क्र. ७५/परिवहन-२ दि. २०/१२/२००५ अन्वये सुधारीत अधिसुचनेत नमुद केल्याप्रमाणे किमान व कमाल दराच्या मर्यादेत खालीलप्रमाणे भाडेसारणी निश्चित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अंतर कि.मी. | साधी सेवा | | मर्यादित सेवा | | जलदसेवा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | |
| १ | ०-३ | ४ | २ | ४.५० | २ | ५ | ३ | |
| २ | ३.१-५ | ४.५० | २ | ५ | ३ | ६ | ३ | |
| ३ | ५.१-७ | ५ | ३ | ६ | ३ | ७ | ३ | |
| ४ | ७.१-९ | ६ | ३ | ७ | ४ | ९ | ४ | |
| ५ | ९.१-११ | ७ | ३ | ८ | ४ | १० | ५ | |
| ६ | ११.१-१३ | ८ | ४ | १० | ५ | १२ | ६ | |
| ७ | १३.१-१५ | ९ | ५ | १० | ५ | १३ | ६ | |
| ८ | १५.१-२० | ११ | ५ | १२ | ६ | १६ | ८ | |
| ९ | २०.१-२५ | १३ | ६ | १५ | ७ | १९ | ९ | |

| अ.क्र. | अंतर कि.मी. | साधी सेवा | | मर्यादित सेवा | | जलदसेवा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | |
| १० | २५.१-३० | १४ | ७ | १६ | ८ | २१ | १० | |
| ११ | ३०.१-३५ | १५ | ७ कमाल | १८ | ९ कमाल | २२ | ११ कमाल | |
| १२ | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रौढ भाड्यासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंश भागाकरीता २ रुपये जादा भाडे आकारण्यात येईल. | | | | | | | |

टप्पा वाहनात चढण्याचे ठिकाण किंवा टप्पा वाहनातून उतरण्याचे ठिकाण हे संबधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेले टप्पा ठिकाण नसेल त्याबाबतीत भाडे आकारण्याच्या प्रयोजनासाठी, प्रवास केलेले अंतर अशा मान्यता दिलेल्या लगतपुर्वीच्या टप्पा ठिकाणापासून किंवा यथास्थिती अशा मान्यता दिलेल्या लगतनंतरच्या टप्पा ठिकाणापासून परिगणित करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाकडून आकारण्यात येणारा पोषण अधिभार रु. २/- किंमतीच्या तिकिटापर्यंत १० पैसे व रु. २/- पेक्षा अधिक किंमतीच्या तिकिटावर १५ पैसे यात समाविष्ट आहे.

मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. २१ दि. २/८/२००५ व मा. महासभा ठराव क्र. ३८ दि. २३/८/२००५ अन्वये देण्यात आलेल्या सवलतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही.

### ❖ पास योजना

शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडून तसेच नियमीतपणे नोकरीवर जाणाऱ्या प्रवाश्याकडून मासिक पास, द्वैमासिक पास, त्रैमासिक पास, योजना सुरु करणेबाबतची मागणी होत आहे.

यास्तव परिवहन सेवेने विद्यार्थ्यांच्या व प्रवाश्यांच्या सोयीसाठी मासिक पासाकरीता २६ दिवसाचे दुहेरी प्रवास भाडे आकारुन ३० दिवस प्रवास व द्वैमासिक पासाकरीता ५२ दिवसांचे भाडे आकारुन ६० दिवसाचा प्रवास व त्रैमासिक पासाकरीता ७८ दिवसाचे भाडे आकारुन ९० दिवस प्रवासासाठी अशाप्रकारे सवलत पास योजना सुरु करण्यात येईल. त्याकरीता प्रवाश्यांना आगाऊ रक्कम भरुन पासेस देण्यात येतील.

### ❖ सामान (लगेज)

अ) हातात धरण्यासारख्या (४० x २५ x १५ से. मी. पर्यंतच्या आकाराच्या) सामानाखेरीज अन्य आकाराचे अथवा प्रकारचे सामान की, ज्यामुळे इतर प्रवाशांना अडचण, उपद्रव किंवा गैरसोय होण्याची शक्यता आहे, अशा प्रकारचे सामान उपक्रमाच्या कोणत्याही वाहनामध्ये कोणाही व्यक्तीने आणू नये.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणाही व्यक्तीने, वाहकांने विनंती केल्यास वाहन सोडले पाहिजे आणि कोणत्याही व्यक्तीने अशा प्रकारची विनंती तात्काळ मान्य न केल्यास, त्यास वाहक अथवा चालकाकडून बसगाडी भाडे बळजबरीने वसूल करण्यात येईल आणि त्या व्यक्तीवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

ब) प्रवाशांना स्वतःच्या जबाबदारीवर पुढील आकारमानाचे केवळ व्यक्तिगत सामन बसगाडीत जागा उपलब्ध असेल तरच योग्य ते भाडे देऊन वाहून नेता येईल.

कमाल आकार :- ६० x ५७ x ३७ से. मी.

सामानावर आकारण्यात येणारे भाडे (लगेज) तद्नुरुप प्रौढ भाड्याशी तुल्य (सममूल्य) असेल, मात्र किमान भाडे रु. ४/- व कमाल भाडे साधी सेवा रु. ५/-, मर्यादित सेवा रु. ७/-, जलद सेवा रु. ९/- याप्रमाणे असेल.

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, धर्मदाय संस्था, फिल्म शुटींग व सहलीकरीता प्रासंगिक करार या करीता पूर्ण दिवसासाठी किंवा अर्ध्यादिवसासाठी तसेच किलोमीटर बेसिसवर बसची मागणी होत आहे. याकरीता उपलब्ध असलेल्या अतिरिक्त बस वापरुन खालिलप्रमाणे भाडे आकारण्यात येईल.

❖ **सर्वसाधारण आरक्षण कि.मी. प्रमाणे**

| | |
|---|---|
| १) प्रासंगिक करार | प्रति कि. मी. रु ३०/- किंवा किमान रु.६०००/-प्रति दिन |
| २) शैक्षणिक व धर्मदाय संस्था | प्रति कि. मी. रु २८/- किंवा किमान रु.५०००/-प्रति दिन |
| ३) फिल्म शुटींगकरीता | प्रति तास रु ४०००/- |
| ४) सरसकट दराने आरक्षण (रिझर्व्हेशन ऑन फ्लॅट बेसिस) | पूर्ण दिवस रु ८०००/- किंवा अर्धा दिवस ४५००/- |

**टिप :-**

१) पुर्ण दिवस म्हणजे रात्री ००.०० वाजता सुरु होतो आणि २४.०० वाजता संपतो. (२४ तास) अर्धा दिवस म्हणजे १२ तास, सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही गर्दीच्या वेळेस गाडी बुक केल्यास पूर्ण दिवसाचे भाडे आकारण्यात येईल. जर गाड्या १२ तासापेक्षा जास्त म्हणजे २४ तासापर्यंत आरक्षित केल्यास पूर्ण दिवसाचे भाडे द्यावे लागेल.

२) सदरची सेवा ही महानगरपालिका क्षेत्र आणि महानगरपालिका क्षेत्राबाहेरील २० कि.मी. किंवा बसमार्ग जिथपर्यंत चालतो त्यामधील कमीत कमी अंतरापर्यंत सेवा उपलब्ध राहील.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समिती सभा दि. ०४/०१/२००६ रोजीच्या ठराव क्र. ४ अनुसार मा. महासभेस शिफारस केलेल्या भाडे आकारणी (सारणी), सुधारीत टप्पा, पास योजना, सुधारीत सामान (लगेज) दर, प्रासंगिक कराराचे दर इ. बाबत सविस्तर चर्चा करुन सदरचे प्रकरण शासनाकडील प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कोकण विभाग यांच्या मान्यतेसाठी पाठविणे कामी आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(लंच टाईम दुपारी ०२.४५ वा.)

(प्र सचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

हा दौरा कुठे, काय, कशाबद्दल ह्याची माहिती मिळावी.

**प्र. सचिव :-**

आय. एच. एस. इंडिया या संस्थेने चायना, थायलंड, आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन दौरा केलेला आहे आणि त्यांनी ११ मार्च ते १९ मार्च या कालावधीत दौरा आयोजीत केलेला आहे. प्रत्येक माणसी त्यांनी खर्च त्यांच्या हिशोबाप्रमाणे साडे तीन लाख रुपये प्रति माणसी, वास्तव्य, विमान प्रवास, एअरपोर्ट हॉटेल, प्रवास प्रशिक्षण खर्च इत्यादी होणार आहे असे त्यांनी कळविले आहे. पदाधीकारी आणि अधिकारी ह्यांच्याकरिता आहे.

**केशव घरत :-**

सचिव साहेब, सदर विषयाचा आमच्याकडे गोषवारा नाही.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, आपण सदरची पुर्ण माहिती द्या. दौरा कशासाठी आहे, काय आहे ह्याची पुर्ण माहिती देण्यात यावी.

**केशव घरत :-**

सचिव साहेब, प्रकरण क्र. ७६ चा गोषवारा नाही.

**प्र. सचिव :-**

ह्या विषयाचा गोषवारा आलेलाच नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मागच्या वेळेला असे परदेश दौऱ्याचे आयोजन केले होते. परंतु पूर परिस्थिती आली, जेव्हा ऑस्ट्रेलियाचा दौरा आयोजित केला होता त्यावेळी पुर परिस्थितीमुळे आपल्याला हा दौरा रद्द करावा लागला आणि बहूतेक महानगरपालिकेचे महापौर त्या दौऱ्याला गेले नाही आणि आजच्या तारखेला ज्यापद्धतीने अद्यावत यंत्रणा ज्या सुरू आहेत आणि हे जग २१ व्या शतकाकडे जात आहे त्याचा आपल्याला अनुभव यायला पाहिजे. सर्व प्रदेशामध्ये देशांतर्गत ज्या काही घडामोडी सुरू आहेत त्याच्यामुळे आपल्या कामामध्ये पारदर्शकता आणि कामाची पद्धत, कामामध्ये सुसुत्रता

आली पाहीजे. याकरिता असे दौरे जे आयोजित करतात त्या दौऱ्यामध्ये शहराचा महापौर या नात्याने त्यांनी जाणे क्रमप्राप्त आहे. परंतु, मला या ठिकाणी एकच सांगायचे आहे की, आजचा जो दौरा आपण आयोजित केला आहे या दौऱ्यामध्ये मा. महापौर व मा. उपमहापौर आणि आपले इतर जे पदाधिकारी आहेत. जवळ जवळ पाच सभापती आहेत. चार नवनिर्वाचित सभापती आहेत, दोन स्थायी समिती आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आहेत त्याच्यानंतर चार प्रभाग अध्यक्ष आहेत असे करत असताना हा एवढा खर्च आपल्याला परवडणारा नाही, झेपणारा नाही. जर पदाधिकाऱ्यांनी ह्याबाबतीमध्ये जर जाण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याचा खर्च केल्यास आपल्याला सोयीचे होईल आणि ज्या नगरसेवकांना जायची इच्छा असेल ते आपल्या खर्चाने जाऊ शकतात. मागच्या वेळेला ऑस्ट्रेलिया दौरा सुरू असताना त्यावेळी आम्ही मंत्रालयामध्ये परवानगी मागितली विकास योजनेकडे त्यावेळी नगरसेवकांची परवानगी त्यांनी नाकारलेली आहे. नगरसेवकांना परवानगी मिळत नाही. जर पदाधिकाऱ्यांची इच्छा असेल मा. महापौर व मा. उपमहापौर साहेब सोडुन त्यांनी त्यांच्या स्वखर्चाने त्यांनी त्या दौऱ्यामध्ये सहभाग घ्यावा अशी मी सुचना करत आहे. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, बीच मे दो महिने से ऐसा चल रहा है की, महापालिकाका शिक्षण दौरा गोवा या दिल्ली यहा होने वाला है और दो महिने हमलोगो को जहाँ बाहर जाने का है वहाँ हमलोग गए नही। अभी होगा, पंधरा दिन के बाद होगा, उसके पंधरा दिन के बाद होगा। हमको कही जाने को मिला नही। तो जो नगरसेवको के लिये जो प्रशिक्षण का दौरा होनेवाला है वह कॅन्सल कौन करता है? वह किसका अधिकार है। मा. महापौर को दौरे के लिये बाहर जाने के लिए हमारा विरोध नही है। आप जा सकते है लेकिन नगरसेवक क्यो नही जा सकते है। कोई भी दौरा हो वह कॅन्सल क्यो होता है?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या सचिवांना पत्र येतात की, नगरसेवक, नगरसेविकांना प्रशिक्षणाला पाठवा. त्यावेळेला हा विषय कशाला दाबला जातो?

**धनराज अग्रवाल :-**

नगरसेवको को प्रशिक्षण की जरूरत नही है क्या?

**नयना म्हात्रे :-**

आमचे अधिकार तुम्ही कशाला डावलता आणि आता तुंमचा विषय सभागृहामध्ये आला मग आमचा विषय आपण सभागृहामध्ये का आणत नाही? मा. महापौर मॅडम त्या दौऱ्यामध्ये विरोधी पक्षनेत्याचे ही नाव घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या नयना म्हात्रे आपण दिल्लीचा प्रोग्राम घेतला होता त्यामुळे दुसरे इतर जवळ जे प्रोग्राम आले होते ते आपण घेतले नाही. दिल्लीच्या प्रोग्रामची प्रोसीजर सध्या चालू आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, जवळ जवळ महिन्यापासून मी ऐकते की, दिल्लीला जायचे आहे, दिल्लीला जायचे आहे आणि मा. महापौर मॅडम मी याबाबत सचिवांना कितीवेळा विचारले आहे ते विचारा, की दिल्लीला कधी जायचे आहे?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, त्याच्यापूर्वी गोव्याचा प्रोग्राम आला होता.

**मोहन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या याबाबतीमध्ये तीव्र भावना आहेत की, प्रशिक्षण दौऱ्याचे जे आयोजन करायचे आहे ते आयोजन करून घ्या आणि मला वाटते मागच्या आठवड्यामध्ये सचिव आणि मा. महापौर मॅडम हे एकत्र बसून दिल्लीचा दौरा ॲरेंज करत आहोत. त्याची तारीख ठरवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण जे प्रशिक्षण दौऱ्यासाठी बाहेर जाणार आहात त्याच्यात विरोधी पक्षनेते आणि प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांना ही घेउन जा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ७६ आय. एच. एस. इंडिया ह्यांनी आयोजित केलेल्या परदेश दौऱ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत सभागृहामध्ये सन्मा. सदस्यांनी आपआपल्या सुचना, आपआपली मते प्रदर्शित केली आहेत. प्रकरण क्र. ७६ साठी ठराव आय. एच. एस. इंडिया ह्यांनी आयोजित केलेला परदेश दौऱ्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने विद्यमान महापौर सौ. निर्मला सावळे व विद्यमान उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती ह्यांच्या परदेश दौऱ्याचा खर्च महापालिकेच्यावतीने करण्यात येईल आणि इतर जर कोणी इच्छूक असतील. विरोधी पक्षनेते, स्थायी समिती सभापती किंवा इतर सन्मा. सभापती तर त्यांनी त्यांच्या स्वतःच्या स्वखर्चाने सदर परदेश दौऱ्याकरिता जाण्यासाठी आजची ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस साहेब आपण जी सुचना केली त्याच्यामध्ये उपमहापौर ही ह्या दौऱ्याला जातील अशी सुचना केली. परंतु, मी स्वखर्चाने असो किंवा महापालिकेच्या खर्चाने असो तरी दौऱ्याकरिता मी इच्छुक नाही. त्याच्यामुळे माझे नाव वगळूनच ठराव घ्या.

**मोहन पाटील :-**

तसा ठराव आपण करू शकतो आणि तसा ठराव केलेला आहे. बाकी जायचे की, नाही ते आपल्या मनावर आहे आणि अधिकारी म्हणून प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्त ह्यांनी त्या दौऱ्यामध्ये जावे व त्यांचा हा खर्च महापालिकेने करावा.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानूमते मंजुर.

**प्रकरण क्र. ७६ :-**

IHS इंडीया यांनी आयोजित केलेल्या परदेश दौऱ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८१ :-**

IHS India (Institute of Housing and Urban Development Studies of India) यांचेकडील दि. ४ जानेवारी २००६ च्या पत्रान्वये दि. ११ मार्च २००६ ते दि. १९ मार्च २००६ या कालावधीमध्ये चीन व थायलंड या देशामध्ये Economic Liberalisation and Poverty Alleviation या विषयावर अभ्यास दौरा आयोजित केलेबाबत कळविले असून या अभ्यास दौऱ्याकरिता महानगरपालिकेतर्फे (१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे (सौ. निर्मला विष्णु कांबळे), मा. महापौर, (२) श्री. चंद्रकांत सिताराम वैती, मा. उपमहापौर व (३) श्री. सुदामराव गायकवाड, मा. आयुक्त यांना या अभ्यास दौऱ्यावर जाण्याकरिता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच या व्यतिरिक्त जे नगरसेवक स्वखर्चाने वरील अभ्यास दौऱ्यासाठी जाण्यास इच्छुक आहेत त्यांनादेखील ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र सचिवांनी प्रकरण क्र. ७७ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७७ चा सभागृहासमोर ठराव मांडला)

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, आपले कर्मचारी कल्याण डोंबिवली व अंधेरी येथे प्रशिक्षणासाठी जातात. जर आपण मिरा भाईंदरमध्ये हे प्रशिक्षण वर्ग चालू केले तर आपल्या कर्मचाऱ्यांना अडचण येणार नाही.

**मा. आयुक्त :-**

कल्याण डोंबिवली आणि अंधेरी येथे त्यांचे कार्यालय आहे व अंधेरी येथे हेड ऑफीस आहे आणि कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी ठाणे जिल्ह्यामध्ये स्वतंत्र असे प्रत्येक ठिकाणी केंद्र आयोजित केले आहे तिथे कर्मचाऱ्यांना पाठवायचे आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानूमते मंजुर.

**प्रकरण क्र. ७७ :-**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, बेळगाव यांचेकडील ''डिप्लोमा इन लोकल गव्हर्नमेंट फायनाशियल मॅनेजमेंट'' (DLGFM) हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ लागू करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८२ :-**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई / बेळगांव यांचेमार्फत DLGFM (डिप्लोमा इन लोकल गव्हर्नमेंट फायनाशियल मॅनेजमेंट) हा बहिःशाल पदविका अभ्यासक्रम नव्याने सुरु केला आहे. सदर अभ्यासक्रम हा महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाचे दृष्टीने उपयुक्त आहे. जसे नविन द्वीनोंद, लेखा पद्धती, लेखा संहिता तयार करणे, ताळेबंद वगैरे योग्य कार्यालयीन प्रक्रिये बाबत संपूर्ण ज्ञान या अभ्यासक्रमाद्वारे कर्मचाऱ्यांना अवगत होणार असून त्याच दृष्टीने सदर अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. औयासक्रम बहिःशाल पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयाचा असल्याने सदर औयासक्रमास प्रवेश घेणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यामुळे दैनंदिन कामात व्यत्यय / अडथळा येणार नाही. तसेच अधिकारी

यांना सदर पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा उपयोग महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाजात होणार असून महानगरपालिका कामात पारदर्शकता येवून कामात गती प्राप्त होऊ शकते.

तरी DLGFM या पदविका अभ्यासक्रमास महानगरपालिका अधिकारी यांनी यशस्वीरित्या पूर्ण केल्यास शासन निर्णय क्र. जी.ई.एन./१००३/८८९/प्र.क्र.९८/२००३/नवि-१४, दि. ०३/११/२००३ अंतर्गत तरतुदीनुसार त्यांना एक वेतनवाढ देण्याबाबतचा विचार महानगरपालिका स्वतंत्रपणे करु शकते असे नमुद करुन त्याप्रमाणे मा. उपसंचालक (प्रशिक्षण) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदर पदविका परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अधिकारी यांना एक वेतनवाढ देण्याबाबत निर्णय घेण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील अकरा महानगरपालिकांनी सदर पदविका अभ्यासक्रम यशस्वी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी DLGFM पदविका अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करतील त्यांना एक अतिरीक्त वेतनवाढ पुढील नियमीत वार्षिक वेतनवाढीवर परिणाम न होता, अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यापासून देण्यास मंजूरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र सचिवांनी प्रकरण क्र. ७८ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७८ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**एस. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, पान क्र. ४ मध्ये बदल करायचा आहे. ७८ ऐवजी १५०, ८५ ऐवजी २००, २०५ ऐवजी ५०० आणि २२५ ऐवजी १००० अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानूमते मंजुर.

**प्रकरण क्र. ७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिका सदस्य व पदाधिकारी ह्यांना द्यावयाचे मानधन फी व अन्य भत्ते नियम २००६ बाबत.

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा अधिनियम क्र. ५९) अन्वये कलम १९अ व ४५४ अन्वये महापलिका सदस्य व पदाधिकाऱ्यांना द्यावयाचे मानधन, फी व भत्ते या संबंधी केलेले नियम मा. महासभेस मान्यतेसाठी सादर केले आहेत.

अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उक्त नियमांना पूर्व प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. या नियमांना आक्षेप घेण्यासाठी तसेच सुचना करण्यासाठी सर्व संबंधितांना एक महिन्याची मुदत दिली जाईल. सर्व आक्षेप व सुचनांवर मा. महासभा पुन्हा एकवार विचार करुन नियमांना अंतिम स्वरुप देऊ शकेल. मा. महासभेने यानंतर अंतिम केलेल्या नियमांना राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यामुळे मा. महासभेच्या ठरावासह नियम राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले जातील.

तरी प्रस्तुत प्रारुप नियमांचा तयार केलेला मसुदा ही मा. महासभा मान्य करीत असुन त्यावी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७९ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महापालिकेमध्ये जाहीरात नाम्यामध्ये दाखवाना सुरू करण्याचे जे काम सुरू आहे आणि त्याच्यासाठी सर्वतोप्रयत्न सुरु आहे. मा. नामदार पालकमंत्री साहेबसुद्धा जातीने याविषयी सभा बोलवून मा.

महापौर, मा. उपमहापौर व इतर सदस्यांना एकत्र करुन दोन ते चार वेळा सभा घेतलेल्या आहेत. जागा हस्तांतरणाचा प्रश्न आणि संबंधित खाते पी.डब्ल्यू.डी. आणि आरोग्य खाते ह्यांच्याशी संपर्क साधून लवकरच हा प्रस्ताव मंजुर होऊन आपल्या ठिकाणी हॉस्पीटलचे काम लवकर सुरू होणार आहे. परंतू त्याच्या अगोदर शहराला सेवा देणे अत्यावश्यक बाब आहे. त्याकरिता आपण आरोग्य केंद्र सेवा सुरू केली आणि त्यामार्फत आपण चांगल्या पद्धतीने सेवा या शहराला देत आहोत. त्या ठिकाणी असलेले डॉक्टर्स आणि परिचारीका हे चांगले काम करत आहेत आणि ते काम सुरू असताना त्यांना मुदतवाढ देणे हे क्रमप्राप्त आहे. परंतू, यावेळी मुदतवाढ आणि पुढील विषय वेतनवाढीचा आणलेला आहे. तर त्याबाबत आपण कृपया अहवाल या सभागृहामध्ये सादर केलेला नाही. परंतु, या कामामध्ये कोणताही व्यत्यय येउ नये या दृष्टीकोनातुन ही मुदतवाढ देणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. कारण ते जी सेवा देत आहेत, ती चांगली सेवा आहे. क्रमप्राप्त आहे म्हणून हा जो विषय आहे मुदतवाढीचा तर मुदतवाढ ही देण्यात यावी असा ठराव सभागृहनेते मांडतीलच आणि पुढे हा जो विषय आलेला आहे वेतनवाढीचा त्याच्यावर जर प्रशासनाने अहवाल दिला तर तो विषय पुढच्या वेळेस घेउन तो विषय मंजुर करु शकतो.

**रिटा शहा :-**

कारण आता आमचा अधिकारी आहे तर आम्हाला नगरसेवकांच्या मानधनाबाबत बोलायला लागेल ना. भिवंडी महानगरपालिकेत पाच हजार रुपये केले आहे तर मा. महापौर मॅडम आपण लक्ष द्या आणि नगरसेवकांचे मानधन पाच हजार रुपये करा.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलू इच्छिते की......

**मोहन पाटील :-**

आपल्याला हे मंजुर करावे लागेल.

**प्र. सचिव :-**

जे मानधन आहे ते शासनाच्या मंजुरीसाठी पाठवून तेथून मंजुर होउन आल्यानंतर आपल्याला घ्यावे लागेल.

**रिटा शहा :-**

शासनाची मंजुरी नसेल तर भिवंडी महानगरपालिका ही शासनाच्या विरुद्ध चालते का?

**मोहन पाटील :-**

मॅडम बजेटची टक्केवारीपण बघायला लागते.

**रिटा शहा :-**

बजेट बघावे लागते हे मान्य आहे पण आपण नगरसेवकांबद्दलही काहीतरी विचार करा ना. आपण दोन वर्ष स्थायी समितीचे सभापती राहिलात आम्ही सर्व बजेट तुम्हाला दिले होते.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या आदेशाने बोलू इच्छिते की, महानगरपालिकेचे सदस्य असण्यास प्रत्येक महापालिका सदस्याला तो ज्या दिनांकापासून महापालिका सदस्य म्हणून कार्यरत होईल त्या दिनांकापासून म्हणजे आपण सन २००२ ला सदस्य झालो तेव्हापासून हा ठराव मंजुर आहे का? गोषवाऱ्यामध्ये लिहिले आहे, म्हणून मी विचारत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आमचे भाजपवाले हुशार आहेत. ते मागची पण थकबाकी घ्यायला तयार आहे. मागची थकबाकी द्या.

**मोहन पाटील :-**

प्रवास भत्ता आहे तो देखिल त्याच्यात ॲड करुन घ्या. मानधन पाच हजार रुपये आणि प्रवास भत्ता शंभर रुपये.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायूक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपले जे प्रचलित दर कर्यान्वीत आहे ते आपण घेतलेले होते. यामध्ये आपल्या ज्या सुचना आल्या होत्या की, बाहेरगावी जर आपली ट्रेनिंग असेल किंवा काय कार्यक्रम असेल तर त्याचा जो डी.ए. होता तो आम्ही ८५ च्या ऐवजी २००, २०५ च्या ऐवजी ५०० आणि २३५ च्या ऐवजी १००० रु. केलेला आहे आणि आपला जो महापालिका सदस्य म्हणून जो भत्ता आहे तो सध्या ४००० रु. प्रचलित आहे. त्या ठिकाणी आपण ५००० रु. सुचवले आहे.

**रक्षा शहा :-**

म्हणजे महापलिका सदस्य झाल्यापासुन आहे का?

**कैलासबेन जानी :-**

तसे मेन्शन केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागची थकबाकी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायूक्त (मुख्यालय) साो.) :-**

महापालिका सदस्यांनाच हा लागू आहे. चार ऐवजी पाच हजार रुपये अशी दुरुस्ती केलेली आहे.

**रक्षा शहा :-**

म्हणजे ते सन २००२ पासुन मान्य आहे असे आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, मानधनाचा जो विषय निघाला म्हणूनच मी बोलते की, तुम्ही आम्हाला दर सभेला जे जेवण देता ते देऊ नका. त्याच्यापेक्षा आम्हाला पैसे द्या. कारण बरेचसे घरी जेवायला जातात. ते जेवण अजिबात चांगले लागत नाही. त्याच्यापेक्षा आम्हाला पैसे द्या आम्ही हॉटेलमध्ये जेवू नाही तर घरी जेवण करू.

**लिला पाटील :-**

याच्याशी मी सहमत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्यांनी जी सूचना मांडली त्याच्यावर गांर्भीयाने विचार करा. कारण जेवायला बरेचसे सदस्य घरी जातात.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवकांना टेलिफोन देणार होते त्याचे काय झाले?

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला अजुन माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. सन २००२ पासून लागू आहे की, आता?

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवकाच्या मानधनाचे काय?

**रक्षा शहा :-**

चार हजार रुपये मानधन सन २००२ पासून आम्हाला लागु आहे का?

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, भता कधीपासून देणार याचा खुलासा करा ना.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, जसे परिवहन समितीच्या सदस्यांना आपण सभा भत्ता देत आहोत तसे प्रभाग समितीच्या सदस्यांना आपण भत्ता देणार आहात का? प्रभाग समिती सभा भत्ता.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण माझ्या प्रश्नाचे अजुन उत्तर दिलेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या नयना म्हात्रे ह्यांनी जो प्रश्न उपस्थित केला की, प्रश्न चहा नास्ता आणि जेवण ह्याचे ह्यांच्यापुढे जी रक्कम असेल ती रक्कम दिली जाईल. चहा मिळेल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, फोनचे काय झाले?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चहा नास्ता असावा. चहा आणि नास्त्यासाठी घरी कोण जाणार ?

**मोहन पाटील :-**

जेवणाचा खर्च द्यावा पण जो अल्पोपहार आहे तो पहिजे. चहा नास्ता पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, चहा नास्ता असु दे. परंतु, आम्हाला जेवण नको.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, आपल्या जेवणाची वेळ नक्की करा. एक वाजता किंवा दोन वाजता अशी वेळ नक्की करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण आम्हाला जो बारा वाजता नाश्ता देता तो नाश्ता बारा वाजता द्या आणि दोन अडीचला जेवण देता ते जेवण आम्हाला नको. मा. महापौर मॅडम, मला टेलिफोनच्या बिलाचे अजुन उत्तर आले नाही.

**रक्षा शहा :-**

आपण हे नियममध्ये लिहिलेले आहे ना. तर त्याचा खूलासा करा. ह्या नियमामध्ये उल्लेख केलेला आहे की, महापालिका सदस्य झाल्यापासुन......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या, सन २००३ पासून चार हजार रुपये नगरसेवकांना मानधन लागू केलेले आहे. तसेच, आता ठरावात नमुद केल्यानुसार सुचना, उपसुचना सुधारित करून मानधनामध्ये पाच हजार रुपये आणि आता चार हजार रुपये आहे आणि एक हजार रुपये वाढवून पाच हजार रूपये असा मानधन दिला जाईल.

**रक्षा शहा :-**

पहिले तीन हजार रूपये होते तर त्याचे चार हजार रुपये देणार आहात का?

**मा. महापौर :-**

आता सद्याचा नविन विषय सर्व सुचना, उपसुचनांसह ठराव मंजुर. सचिवजी पुढील विषयाला सुरवात करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, टेलिफोनच्या बिलाचे काय केले? मॅडम, आज आम्ही नगरसेवक होउन आज आम्हाला चौथे वर्ष चालू झाले आहे. तर तीन हजाराच्या ऐवजी चार हजार रुपये मानधन झाले आणि चारच्या ऐवजी नगरसेवक पाच हजाराची मागणी करत आहेत. परंतू, नगरपरिषद असल्यापासुन जो कर्मचारी वर्ग काम करत आहे त्यांना तोच पगार दिला जात आहे. आज आपली महानगरपालिका झाली आहे तर त्या कर्मचाऱ्यांचाही विचार करण्यात यावा.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सूचना आहे की, आपण जो सतरा हजार रूपये वाहन भत्ता देता तर आज डिजेलचे, पेट्रोलचे भाव भरपूर वाढलेले आहे. तर आपण वाहन भत्ता वीस हजार रुपये करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्यांचा जेवढ्या सुचना आहेत तेवढ्या सर्व सुचना आपण घ्या आणि जेवढी वाढ देता येईल तेवढी वाढ द्या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७९ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या ठरावामध्ये प्रभाग क्र. ४ मध्ये उपकेंद्र एक आहे की दोन आहे ह्याचा उल्लेख केलेला नाही ते आज आपण सकाळपासुन चालवतोय, अर्धा दिवस ही चालते ह्याचा उल्लेख ह्याच्यामध्ये नाही. तसेच, या प्रकरणाची जी संपुर्ण फाईल आहे त्याला आपण नस्ती बोलतो जे आपले डी.एम.सी. किंवा सामान्य प्रशासन आहे ह्यांच्याकडे ही फाईल आजही उपलब्ध नाही. आणखीन सी.एफ.सी.ची फाईलसुद्धा नाही. आपल्या येथे जे पगार काढण्याचे कार्यालय आहे त्या तिथे फाईलच नाही या फाईलवर निर्णय घेण्याचा ज्यांचा अधिकार आहे त्याच्याबद्दल मी पत्रव्यवहार केलेला आहे. पण एकाचेही उत्तर आलेले नाही. त्या फाईल कन्सल्टींग ऑफीसरकडे का नाहीत? कारण मला पत्र देउन एक महिना झालेला आहे. सदर फाईल प्रॉपर अधिकाऱ्याकडे नसल्यामुळे त्यांना कुठलाही निर्णय घेणे, पगार कुठला काय? ह्याच्यामध्ये घोळ असा आहे की, डॉक्टर साहेब असताना त्यांनी कुठल्या माणसाला, कुठल्या अधिकाऱ्याला, कुठल्या कर्मचाऱ्याला किती पगार दिला त्याची सेवा कधी खंडीत होते, त्याला ब्रेक कधी द्यायचा आहे. हे त्यांनी कधीही आस्थापनेला कळवलेले नाही. परिणामी ब्रेक द्यायच्या वेळेला जर एक दिवस ओव्हर होत आहे तर त्याला आपण परमनंन्ट करून घ्यावे लागणार आहे. ह्या सगळ्याचा विचार करा. जाणूनबूजून ती फाईल दाबून ठेवली गेली आहे. ही गंभीर बाब आहे. पत्र देउन सुद्धा त्याच्यावर कुठलीही कार्यवाही नाही. याबाबत मला खुलासा आणि रुलिंग पाहिजे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यामध्ये फिरता दवाखाना एक काशीगाव असा लिहिला आहे. चेने-वर्सावे, घोडबंदर बंद केले का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

चालू आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम की परवानगीसे बोलना चाहती हु, आरोग्य केंद्र का जो मुद्दा उठाया है, मैने काफी बार बोला था की, हमारे केबिन क्रॉस रोड पे एक आरोग्य केंद्र की सक्त जरूरत है। मैने पत्रव्यवहार भी किया है लेकिन उसका जवाब भी नही मिला है की दवाखाना चालू करेंगे या नही करेंगे। डॉक्टर साहब थे तबतक उन्होने कहा था की, मॅडम प्रोसिजर चालू है और केंद्र जल्द से जल्द चालू होनेवाला है। उसके बारे मे इसमे कुछ भी इन्ट्री नही है की आप वॉर्ड क्र. २३ मे केबिन रोड पे दवाखाना चालू कर रहे हो या नही।

**मोहन पाटील :-**

प्रभाग क्र. २३ मध्ये दवाखाना सुरू करायचा आहे तो सूरू केला नाही पण त्याची प्रोसिजर पुर्तता पुर्ण झालेली आहे. दवाखाना सुरू करायचा आहे. त्याच्या अगोदर मान्यता घेतलेली आहे.

**सुधा गोयंका :-**

दो साल से बोल रहे हो इसलिये पुछ रही हूँ की, इस साल दवाखाना चालु होगा के नही होगा कम से कम जवाब दिजिये की, दवाखाना कबतक चालू कर रहे हो।

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

आपल्याला नविन पाच आरोग्य केंद्र सुरू करायचे आहे.

**सुधा गोयंका :-**

त्याच्यामध्ये ह्याची नोंद आहे का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

एक आरोग्य केंद्र चालू केले आहे. बाकीचे चार आरोग्य केंद्र राहिले आहे.

**शुभांगी नाईक :-**

प्रभाग क्र. २५ मध्ये ही आरोग्य केंद्र चालू करायचे आहे, त्याचाही उल्लेख केलेला आहे ते बघा. मागच्या सभेलाही झाले होते प्रभाग क्र. २५ मध्ये आरोग्य केंद्र चालू करायचे पण त्याचा या ठिकाणी उल्लेख झालेला नाही.

**मा. आयुक्त :-**

ठरावामध्ये जे असेल त्याप्रमाणे होईल.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े. ) :-**

आपल्याला जसजशी जागा उपलब्ध होणार आहे त्याप्रमाणे आपण आरोग्य केंद्र चालू करणार आहोत. सध्या आपल्याला जे नविन पाच आरोग्य केंद्र चालू करायचे आहे त्यापैकी एक आरोग्य केंद्र चालु केलेले आहे आणि बाकीचे उर्वरित चार आरोग्य केंद्र आपल्याला चालू करायचे आहे.

**सुधा गोयंका :-**

कधीपर्यंत चालू करणार?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े. ) :-**

आपल्यला जसजशा फॅसिलीटी उपलब्ध होतील तसतसे करण्यात येईल.

**सुधा गोयंका :-**

त्याच्यामध्ये वॉर्ड क्र. २३ ची नोंद घ्या की, तिथे एक आरोग्य केंद्र चालू करण्याची गरज आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर आपण सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या प्रश्नाला उत्तर देणार आहात की मी बोलू. मा. महापौर मॅडम, मी दोन वेळा खाली बसले आहे. आपण त्यांच्या प्रश्नाला उत्तर देता की मी बोलू.

**मा. महापौर :-**

उत्तर देत आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, घोडबंदर येथे कायम स्वरुपी दवाखाना सुरू करण्यात यावा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी त्यांच्या फाईलबाबत जो मुद्दा उपस्थित केला की, आपण त्या डॉक्टरांना मुदतवाढ देतो. आपली कामे सुरू झाली पाहिजे व त्यांची जी फाईल आहे ती आस्थापनामध्ये आपण वर्ग करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सुरूवातीपासुन हा विषय आरोग्य विभागामार्फतच प्रस्तावित केलेला होता आणि तिच प्रथा आपण अजुन चालू ठेवली आहे आणि आता उपायूक्तांकडे आरोग्य विभागाचा जो कार्यभार दिलेला आहे ते त्यांच्यामार्फत आपल्याकडे फाईली येतात. इन्टीमेशन सामान्य प्रशासनाला द्यायचे असेल तर आपण देउ शकतो.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, घोडबंदर येथे कायम स्वरुपी दवाखान्याची अत्यंत गरज आहे. कारण चेणे - वर्साावे आणि काजुपाडा या भागात आदिवासी वस्ती आणि घोडबंदर गावात स्थानिक झोपडपट्टी एरिया असल्यामुळे तिथे कायम स्वरुपी दवाखाना असणे फार गरजेचे आहे. हा फिरता दवाखाना आठवड्यातून फक्त तीन दिवस असतो. तरी माझी अशी विनंती आहे की, घोडबंदर येथे एक कायमस्वरुपी दवाखाना सुरू करण्यात यावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ७९ आणि ८० मध्ये दोन ठिकाणामधल्या एका ठिकाणी आरोग्य कर्मचाऱ्यांना मूदतवाढ आणि एका ठिकाणी वेतनवाढ असा विषय आणलेला आहे. तर वेतनवाढीचा विषय

आपण पुढे ढकलतोय पण तत्पुर्वी मला तुम्हाला आठवण करून द्यावीशी वाटते की, दि. १७/०८/२००५ ला आपण असाच एक ठराव कर्मचाऱ्यांसाठी पारित केला होता की, ठराव क्र. ३३ ज्याच्यामध्ये कर्मचाऱ्यांना काही वेतनवाढ आणि त्यांची थकबाकी मिळणार होती व ती मिळालीही असेल. त्यावेळेला मी आपल्याला म्हटले होते की, २६ जुलै रोजी जो पाऊस झाला त्या २६ जुलैच्या पावसानंतर आपली मा. महासभा फार गाजली आणि मला असे वाटते की सर्व पक्षाच्या लोकांनी त्याच्यामध्ये आपल्या फायर फायटर लोकांची फायरब्रिगेड मधल्या लोकांची फार स्तुती केली होती की, त्यांनी अगदी कुजलेली, सडलेली, नासलेली प्रेत बाहेर काढली. खुप चांगले काम केले होते. त्यावेळेला मी म्हटले होते की, नुसती स्तुती नाही तर पाठीवर थाप ही लागते. म्हणजे माणसाला पुढच्या वेळेला काम करायला प्रोत्साहन मिळते. तेव्हा मी म्हटले होते की, ह्या कर्मचाऱ्यांचा आपण २६ जानेवारीला एक सन्मान चिन्ह किंवा सन्मानपत्र देउन त्यांचा आपण यथोचित गौरव करावा की, त्यांना भविष्यामध्ये अशी काही कामे, अडचणी आल्यास त्यांना त्यांच्यापासुन स्फूर्ती घेता येईल. २६ जानेवारी तोंडावर आहे आणि ते आपलेच कर्मचारी आहे. आपण एकीकडे त्यांना मुदतवाढ देतो. तर एक साधे प्रशस्तीपत्रक आणि फूल द्यायला सभागृहाची हरकत नसावी आणि त्यावेळेला मी तसा ठराव मांडला होता. कृपया २६ जानेवारी तोंडावर आहे. आपण याबाबतीत योग्यवेळी योग्य निर्णय घ्यावा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम ह्यांनी ह्या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे. त्या प्रस्तावाशी आपण संपुर्ण सभागृह सहमत आहे म्हणून ह्या येत्या २६ जानेवारीला सत्कार करावा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, यह जो प्रस्ताव आया है, अपने आठ या नउ जो आरोग्य केंद्र चल रहे है। वह अभी वैद्यकीय अधिकारी बावस्कर साहब जाने के बाद अभी यहापर कौन है। किसके हाथ मे दवाखाना दिया हुआ है?

**मा. आयुक्त :-**

सध्या आपल्याकडे कार्यरत जे काही वैद्यकीय अधिकारी आहेत त्याच्यापैकी डॉक्टर पोसा म्हणून ह्यांच्याकडे आपण हा सगळा कार्यभार सोपवलेला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

डॉक्टर पोसा ह्यांच्याकडे कोणती डिग्री आहे. पी.एस.एम.ची डिग्री आहे का? प्रिव्हेन्टीव्ह स्पेशल मेडिसन ही डिग्री पाहिजे, महानगरपालिकेमध्ये काम करताना..........

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

आपण अतिशय तात्पुरत्या स्वरूपाची त्यांना जबाबदारी सोपवलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण त्या जागेवर दुसरा व्यक्ती मागितला आहे का? दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची त्या जागेवर मागणी केली आहे का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

होय त्यासाठी आपण त्या पदावर दुसरी व्यक्ती घेण्यासाठी प्रोसिजर चालू आहे. साधारणतः आठ-दहा दिवसामध्ये दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करता येईल.

**धनराज अग्रवाल :-**

आठ-दहा दिवसात नेमणूक करणार आहात का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

होय.

**धनराज अग्रवाल :-**

कारण काय आहे की, सात ते आठ लाख लोकांचे आरोग्य त्यांच्या हातात आहे. मेडीसन कुठली मागवायची किंवा कुठली मागवायची नाही, हे त्यांना माहितच नाही.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मुर्धा येथे आरोग्य केंद्र स्थापन करण्याविषयी प्रस्ताव होता तो पुर्ण झाला आहे का? मुर्धा येथे खाडीवर आरोग्य केंद्र बनवलेले आहे आणि त्याविषयी चर्चा ही झालेली आहे, ते आरोग्य केंद्र चालू कधी करणार? त्याचे उद्‌घाटन हे कधी करणार?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

त्या आरोग्य केंद्राची सर्व पुर्तता झाल्यानंतर इमिजिएटली चालू करण्यात येईल.

**अनंत पाटील :-**

पुर्तता म्हणजे काय?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

तिथे जो कर्मचारी वर्ग आवश्यक आहे. त्यांची नेमणूक करून आरोग्य केंद्र चालू करण्यात येईल.

**अनंत पाटील :-**

मूर्धा येथे आरोग्य केंद्र आहे का?

**अशोक पाटील :-**

आहे ना. उपायुक्त शेख साहेब त्याठिकाणी सर्व पुर्तता झालेली आहे. फक्त उद्‌घाटनाची प्रक्रिया बाकी आहे.

**अनंत पाटील :-**

मग ते आरोग्य केंद्राचे उद्‌घाटन करुन कधी चालू करणार?

**मा. महापौर :-**

सर्व सुचनांसह ठराव मंजुर. ठराव वाचून कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. ७९ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने नेमण्यांत आलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांना प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविण्या करीता दि. १९/४/२००३ रोजीच्या मा. महासभने ठराव क्र. ०५ अन्वये मनपाच्या खालील विभागात आरोग्य केंद्र सुरु करण्यास मान्यता दिली होती तसेच सदर केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, प्रसविका, फार्मासिस्ट तथा लिपिक यांची करारपध्दतीने नेमणुकीस मंजूरी दिली होती.

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ आरोग्य केंद्र (नवघर/ बंदरवाडी) |
| भाईदर पश्चिम | २ आरोग्य केंद्र (जुने मनपा कार्यालय व गणेश देवलनगर) |
| उत्तन | १ आरोग्य केंद्र |
| मिरारोड | १ आरोग्य केंद्र (नयानगर,) |
| काशी मिरा | १ आरोग्य केंद्र (पेणकरपाडा) |

एक फिरता दवाखाना (काशिगाव)

वरील आरोग्य केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी-८, परिचारीका (एन.एम.)-८, प्रसविका (ए.एन.एम.)-२१, फार्मासिस्ट कम लिपिक-८ या पदास करारपध्दतीने मंजूरी देण्यात आली होती. त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. स्थायी समितीने दि. २०/९/२००५ रोजी ठराव क्र. ४६ अन्वये पाच महिन्यासाठी नेमणुकीस मंजूरी घेण्यात आलेली होती. सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना मुदत वाढ देणे आवश्यक आहे.

तसेच महानगरपालिका क्षेत्रात नव्याने ५ आरोग्य उपकेंद्र सुरु करणे बाबत दि. ३०/७/२००५ रोजीच्या मा. स्थायी समितीने ठराव क्र. ८८ अन्वये आरोग्य केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी ५, परिचारीका ५, प्रसविका ५, फार्मासिस्ट तथा लिपिक ५ करारपध्दतीने नेमणुक करण्यास मान्यता दिली होती. त्यापैकी आरोग्य केंद्राकरीता वैद्यकीय अधिकारी १, परिचारीका ३, प्रसविका १, फार्मासिस्ट तथा लिपिक ३ करारपध्दतीने रुजू झाले आहेत. उर्वरीत कर्मचारी प्रतिक्षा यादीतून घ्यावी लागणार आहे. प्रतिक्षा यादीत उपलब्ध न झाल्यास नव्याने जाहिरात देउन मुलाखतीद्वारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची नेमणुक करावी लागणार आहे.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि. २०/९/२००५ रोजीच्या मा. महासभेच्या ठराव क्र. ४६ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन पुढील ५ महिन्याची मुदत वाढ देण्यात आली होती. प्रेत्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दर ५ महिन्यानंतर तांत्रिक खंड देउन एक वर्षाची मुदत वाढ देणेस हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र सचिवांनी प्रकरण क्र. ८० चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्या आस्थापनेच्या फाईलबाबत काय रूलिंगच झाले नाही. आस्थापनेकडे ज्या फाईल यायला पाहीजे त्या पडून आहेत त्याचे काय?

**मा. महापौर :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने नेमण्यात आलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा विषय पुढच्या सभेत घेण्यात येईल. ह्या विषयाला तात्पुरती स्थगीती देण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आरोग्याची फाईल आस्थापनाकडे नाही. सी.एफ.सी. ची फाईल आस्थापनाकडे नाही. पगार कोण काढते? त्यावेळेला डॉक्टरांनी त्याचे काही अहवाल सादर केलेले नाही, तुमच्याकडे रिपोर्टींग केलेले नाही. त्याच्याबद्दल काय?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

पुर्वीपासून आपल्याकडे जे कंत्राटपद्धतीने आरोग्य विभागाकडे जे कर्मचारी आहेत. मेडीकल ऑफीसर आणि इतर सर्व अधिकारी किंवा कर्मचारी त्यांचे पगार वगैरे आरोग्य विभागामार्फत प्रोसेस केले जातात आणि त्यांचे जे काही सेवाविषयक बाबी असतात त्या डिल केल्या जातात.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे आस्थापनाकडे हा विषय नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आस्थापना विभागाकडे हा विषय देण्यात आलेला नाही कंत्राटी पद्धतीने दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जी चुकीची पद्धत आपण पाडलेली आहे ती सुधरवा आणि त्या सर्व फाईल आस्थापना विभागाकडे आल्या पाहिजेत. जसे सगळे बाकीचे पगार निघतात तसेच झाले पाहिजे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

हे कंत्राटी पद्धतीचे कर्मचारी आहेत त्यामुळे आपण आस्थापनाकडे दिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला जो मनमानी कारभार झाला तो कारभार आता बदला तो विषय आस्थापनेकडेच आला पाहिजे. उद्या जर कोणी कर्मचाऱ्याने केस केली तर ते आस्थापनेवर येणार.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

ठिक आहे. आस्थापना विभागाकडे फाईल देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

जर उद्या कोणी एखादा लेबर कोर्टामध्ये मॅटर गेला की, ते आस्थापनाकडे येणार. त्याकरिता ह्या फाईल आस्थापनेकडेच पाहिजे. त्या फाईलचे काय झाले. पत्र देउन एक महिना झालेला आहे. त्याचे मला अजुन उत्तर आलेले नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आस्थापना विभागाकडे ह्या ज्या बाबी द्यायच्या आहेत त्या आपण लवकरच त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात येईल.

**प्रकरण क्र. ८० :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना ठोक वेतनात वाढ देणेबाबत.

**ठराव :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८१ चे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, सदर विषयावर मला सुचना मांडायची होती. केंद्र शासनाची जवाहरलाल नेहरू नॅशनल अरबन रिन्यूअल मिशन योजना आहे यात मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आपल्याला अंडरग्राउन्ड गटारे, मोठे मोठे नाले बांधण्यासाठी निधी प्राप्त करणे आहे. त्यासाठी आमचे आमदार श्री. मुजफ्फर हुसैन साहेब ह्यांनी माजी केंद्रीय मंत्री श्री. गुलामनबी आझाद अली मुख्य नगररचनाकार भारत ह्यांचेबरोबर चर्चा केली होती आणि पूर्ण माहिती देण्यात आली होती पण लिस्ट ऑफ आयडेन्टीफाय मध्ये ग्रेटर मुंबई महाराष्ट्रासाठी १६४.३४ कोटी रुपये निश्चित करण्यात आलेले आहे. पण त्यामध्ये ठाणे जिल्ह्यामधील मुख्य शहराच्या नावांचा समावेश करण्यात आलेला आहे. पण मिरा भाईंदर शहराचे नाव या यादीत समाविष्ट नाही. म्हणून त्या लिस्टमध्ये मिरा भाईंदर शहराचे नाव समाविष्ट करण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

सदर प्रकरणाच्या ज्या सुचना दिल्या, सन्मा. सदस्य एस.ए. खान साहेबांनी तर ती सुचना विचाराधीन घेतली पाहिजे आणि या शहरामध्ये ज्या प्रकल्पाकरिता आपल्याला राज्य शासनाची, केंद्र शासनाची जी आवश्यकता आपल्याला आहे. शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातुन हा कंन्सल्टंट नेमणे अति महत्वाचे आहे. हा विषय आपल्या शहराच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे आणि या विषयाने शहराचा

विकास साधु शकतो म्हणून आम्हाला या विषयावर प्रशासनाकडुन थोडीशी महिती मिळाली तर चांगले होईल. आयुक्त साहेब आपण जर माहीती दिली तर चांगले होईल म्हणजे याविषयावर आम्हाला बोलता येईल. कंन्सल्टेंट कोणत्या पद्धतीने नेमायचा?

**मा. आयुक्त :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू नॅशनल अरबन रिन्यूअल मिशन अशा प्रकारची एक नविन निधी या महापालिकांना दिलेली आहे. केंद्र शासनाकडुन जी यादी प्रसिद्ध झालेली आहे. त्या यादीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका असा शब्दप्रयोग केलेला आहे आणि त्याच्यामध्ये जी काही लोकसंख्या दाखवलेली आहे ती १ कोटी ८६ लाख रुपये दाखवलेली आहे. ह्याचा अर्थ असा आहे की, मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्या ही साधारण अंदाजे १ कोटी पर्यंत आहे आणि उर्वरीत ८६ लाख रिझ्यूअलमध्ये ज्या महापालिका येतात त्यांच्यासाठी असावी. परंतु, ते अजुन कन्फर्म झालेले नाही. सभागृहाला या निमित्ताने एक विनंती करण्यात येते की, अशा प्रकारे ही जी योजना आहे ती योजना आपल्या महापालिकेला लागू होणार आहे. त्या योजनेच्या संदर्भात आपल्याकडे आपल्या शहराचा अद्यावत असा एक सर्व्हे असणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या संबंध शहरामध्ये किंवा महापालिका हद्दीमध्ये एकूण किती इमारती आहेत, किती ओपन प्लॉट आहेत, किती रस्ते आहेत. त्याठिकाणी आपण महापालिकेत मार्फत शहराला किती रस्ते गटारांची सोय करून दिलेली आहे. अंडरग्राउण्ड गटारे असे असे स्कीम आहेत का? ह्याबाबतची संपुर्ण जी शहराच्या विकासाच्या संदर्भामध्ये जी जी माहिती आवश्यक आहे ती माहिती एकत्रित करून आपल्याला त्याचे एक रिप्रेझेनटेशन करावे लागणार आहे. आपल्याला जर केंद्र सरकारने या योजनेमध्ये आपल्याला स्वतंत्ररित्या समाविष्ट करून घेतले तर मा. महासभेला मी अशी विनंती करतो की, जरी आता सध्या केंद्र सरकारने मिरा भाईंदर महापालिकेचे नाव जरी समाविष्ट केलेले नसले तरी सुद्धा आपण या केंद्राला या ठरावाद्वारे विनंती करू या की, आमचाही सहभाग त्यात करून घ्यावा असे दोन प्रकारचे कंन्सल्ट या ठिकाणी आहे. एक जो सर्व्हे करायचा आहे तो आपण करायचा आहे. आपल्याला जे प्रेझेन्टेशन करायचे आहे त्याच्यासाठी आपल्याला सर्व्हे करणे आवश्यक आहे आणि तो सर्व्हे झाल्याशिवाय आपण प्रेझेन्टेशन करु शकत नाही आणि त्याच्यामध्ये पार्ट 'ब' असे म्हणता येईल की, ह्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अरबन रिन्यूअल मिशन या योजनेमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचा समावेश करावा.

**रिटा शहा :-**

या योजने अंतर्गत कोणकोणती कामे करायची आहेत?

**मा. आयूक्त :-**

ह्याच्यामध्ये केंद्रसरकारने जी धोरणे ठरवलेली आहेत त्या धोरणाप्रमाणे होईल. आपण त्याच्यात अजुन काय निश्चित केलेले नाही. आपल्याला आपल्या शहराची जी माहिती तयार करायची आहे ती माहिती तयार करण्याचे प्राथमिक स्वरूपाचे आपण काम करत आहोत.

**रिटा शहा :-**

म्हणजे ते धोरण अजुन आपल्याडे आलेले नाही.

**मोहन पाटील :-**

आपण जो गोषवारा दिला त्याच्यात ही कामे समाविष्ट होतील ना. या योजने अंतर्गत आपल्याला जी कामे करायची आहेत.

**मा. आयूक्त :-**

हा जो गोषवारा दिला आहे त्या गोषवाऱ्यामध्ये १ ते ७ कामे नमुद केलेली आहेत त्याच्या व्यतीरिक्त ही सगळी सबंध शहराची जी स्थिती आहे ती स्थिती आपल्याला रेकॉर्डला आणायची आहे आणि त्याचे प्रेझेन्टेशन करायचे आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला असा एक ठराव मांडायला पाहिजे का, या योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेला समाविष्ट करणेबाबतचा ठराव असला पाहिजे आणि दुसरा ठराव जी कामे करण्यासाठी आपल्याला जो कन्सल्टंट नेमायचा आहे तो कंन्सल्टंट नेमावा. पण त्या कंन्सल्टंटकरिता पगाराची अट काय असेल?

**मा. आयुक्त :-**

आपण जी माहिती मागवतोय हा सगळा कंन्सल्टंट आपल्याला आपल्या दृष्टीने नविन आहे. अजुनपर्यंत अशाप्रकारे आपण काही केलेले नाही शेवटी हायलेव्हलला म्हणजे एखादी वर्ल्ड बँक आहे त्याला सुटेबल ती माहिती देणे, आपले त्याच्यावर कसे इंम्प्लीमेंटेशन होईल ते पाहणे याकरिता आपल्याला त्याची माहिती द्यावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, प्रकल्प भुयारी गटार योजना त्यानंतर १०० एम.एल.डी पाण्याची योजना जी.आय.एस. सर्व्हे करणे म्हणजे काय? त्याचे तसे डिटेल दिलेले नाही. जी.आय.एस. सर्व्हे म्हणजे काय आणि हे जे प्रकरण आहे या प्रकरणामध्ये आपल्या ह्या अगोदरच्या ज्या काही स्कीम झालेल्या आहेत. म्हणजे अंतर्गत भूयारी गटार योजना हे गेल्या तीन वर्षापासुन आम्ही ऐकतोय आपल्याकडे त्याच्यावर एक कंपनी, एक

एजन्सी काम करते तिचे नेमके काय प्रोग्रेस आहे? कारण त्याला मंजुऱ्या मागितल्या होत्या त्या आम्ही दिलेल्या आहेत. स्थायी समितीला आम्ही होतो त्यावेळीसुद्धा विषय आला होता आणि ही जी अंतर्गत भुयारी गटार योजना त्याच्यामध्ये आपण कितपत प्रोग्रेस केले आहे त्याचा अहवाल आपल्याला या स्कीममध्ये द्यायला लागेल. नाहीतर एक एजन्सी नेमली आहे आणि परत आणखीन एक नेमाल. ती एजन्सी निराळे काम करेल. जो आपला पुर्वी पाईप लाईनचा सी.एस. कंपनीचा सर्व्हे झाला त्याच्यासारखेच होणार आहे. त्याकरिता सगळ्यात पहिले आपण कुठले काम दिले आहे. त्या कंपनीचा प्रोग्रेस काय, त्या एजन्सीचा प्रोग्रेस काय आहे? घनकचरा व्यवस्थापनाकरिता काम सुरु झाले नाही तरीसूद्धा ४० लाख पेड केले आहे. घनकचरा व्यवस्थापनापर्यंतची आपण काय काय प्रोग्रेस केलेला आहे. त्याचा आपल्याकडे काही अंदाज नाही आणि आपल्याकडे नाही की, शंभर टक्क्यापैकी साठ टक्के काम झाले, चाळीस टक्के काम झाले आहे. त्याच्या अगेन्स्टमध्ये आपण किती पेमेन्ट दिले आहे. ह्याचा गोषवारा कधीही आमच्यापर्यंत आलेला नाही आणि ही स्कीम, हा विषय आपण परत आणला त्या एजन्सी काम करतात किंवा करत नाही, अर्धवट आहे, सुरूवात केली आहे किंवा नाही. त्याचा गोषवारा नाही व ह्याच्यात कुठेही उल्लेख केलेले नाही. तो दिला पाहिजे आता घनकचरा व्यवस्थापन जर त्यांनी केले असेल तर द्या. आम्हाला सांगा, तीस टक्के काम झाले आहे. अंतर्गत भूयारी गटार योजना साहेब, तीन वर्षापासून हे चालू आहे आणि मा. महासभेमध्ये वर्षामधुन एकदा येते परत त्याला आम्ही मंजुरी देतो पण कुठे काही मार्कींग, डिमार्केशन, सर्व्हे, मॅप कधीही आमच्यापुढे आलेले नाही. त्यांनी सांगावे ना की, ह्याला एजन्सी नाही. मग माझ्याकडे कागदपत्र आहे ते मी सादर करतो. मी साडेचार वर्ष या सभागृहामध्ये आहे आणि बऱ्याच वेळा हा कार्यक्रम झालेला आहे आणि हा विषय आणलेला आहे. अंतर्गत भुयारी गटार योजना, एकदा तर त्याचा एरीया ही दिला. कुठल्या एरीयामध्ये पहिले काम केले जाईल. आपण त्या योजनांमध्ये कितपर्यंत आहोत, आहोत की नाही. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, उद्या हा प्रोजेक्ट घेताना तुम्ही ऑलरेडी ह्याच्यामध्ये आहात आणि हे वीस टक्के, तीस टक्के काम झाले आहे. म्हणजे असे नाही की, ही स्कीम आली आणि आम्ही आता स्टार्ट करत आहोत.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपली या विषयामध्ये गल्लत होत आहे की, आपला हा जो विषय आहे त्या विषयामध्ये लिस्ट ऑफ आयडेन्टीफाय सिटीझ असा जो रिपोर्ट आहे. त्या स्कीमचा या स्कीममध्ये जवाहरलाल नेहरू नॅशनल अरबन रिन्युअल मिशन तर ह्याच्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामधल्या मुबंई, नाशिक, पुणे, नागपूर आणि नांदेड या महापालिकेचा समावेश केलेला आहे. मुंबईमध्ये या आपल्या दिलेल्या सेटमध्ये ग्रेटर मुंबई महाराष्ट्राची लोकसंख्या लिहीलेली आहे त्या कोष्टकामध्ये पॉप्यूलेशन इन लॅक १६४.३४ लाख लिहीलेली आहे. ही लिहीताना मुंबईमध्ये, ग्रेटर मुंबईमध्ये, ठाणे जिल्ह्यातील शहरी भागातली लोकसंख्या त्यांनी जमेस पकडलेली आहे आणि ह्या योजनेतुन केंद्र शासनाकडून भुयारी गटार योजनेसाठी ते लोक पुर्ण आर्थिक सहकार्य करत असतात या विषयात या सभागृहातील माजी उपमहापौर आणि आता एम.एल.सी. मुझफ्फर हुसैन साहेब ह्यांनी गुलामनबी आझाद साहेबांकडे हे खाते असताना. चीफ सेक्रेटरी बरोबर त्यांनी या विषयाबाबत सभा घेतली होती आणि त्या सभेच्या अनुषंघाने ते पेपर आपल्याकडे आलेले आहे. ह्या शहरामध्ये अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टम जी आपल्याला विकसित करायची आहे. ही फक्त सध्या शहरामध्ये जेसल पार्क, शांतीनगर, सृष्टी या ठिकाणीच उपलब्ध आहे. बाकी ठिकाणी सेफ्टीक टॅंकमधून आपण सांडपाण्याची विल्हेवाट गटारामध्ये डायरेक्ट आउटलाईन देऊन केलेली असते. तर त्या ऐवजी अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टममधून या पाण्याचा विकास व्हावा आणि या शहरामध्ये अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टमच्या माध्यमातून जेवढे एस.टी.पी. विकसित होतील. त्या एस.टी.पी. पर्यंत पोहोचविण्याचे काम या पाईपच्या माध्यमातुन होणार आहे. आपण मागे हा सर्व्हे केला होता. परंतू, आज जेव्हा आपण आपल्या मा. महासभेमध्ये हा ठराव करून महाराष्ट्र शासनाला कळवू आणि महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे हा रिपोर्ट गेल्यानंतर त्या रिपोर्टमध्ये आपल्या शहराची २००१ सालची पाच लाख वीस हजार तीनशे एक या लोकसंख्येची त्याच्यामध्ये आपल्याला नोंद घ्यावी लागेल. कारण या शहरामध्ये एवढी लोकसंख्या आहे आणि जो सर्व्हे करायचा आहे. आपल्याला जो कंन्सल्टंट नेमायचा आहे तो कंन्सल्टंट या शहरामध्ये आपण मागचा केलेला कंट्रोल सर्व्हे, त्या सर्व्हेला अनुसरून तो त्याचे कामकाज करील किंवा पुन्हा सर्व्हे करणार आणि ह्या शहरामध्ये किती किलोमीटर अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टमची पाईप लाईन टाकली जाईल, किती ठिकाणी आपल्याला एस.टी.पी. करता येतील. एस.टी.पी. आपल्याला समुद्र किनाऱ्यानवळ करताना त्याला सी.आर.झेड. ने ते बाधीत होतील की नाही, या सगळ्या शक्यता, अशक्यता, गव्हर्रमेंटशी कनेक्टेड असलेले त्यांनीच सर्टीफाय केलेली माणसे ह्याचा सर्व्हे करतील आणि ह्याच्यासाठी आपल्याला केंद्र शासनाकडून १०० टक्के रक्कम मिळत असते आणि ते शहराच्या हिताची गोष्ट आहे. त्याच्यामुळे आपल्या सगळ्यांकडून ह्याबाबतीत ज्या सुचना असतील त्या द्याव्यात. कोणी या विषयी गल्लत करू नये. ह्याच्यामध्ये जी इतर कामे आहेत, महापालिकेने जी टीप्पणी दिलेली आहे. महापालिकेच्या टीप्पणीमध्ये ही जी कामे जे मोठे प्रोजेक्ट आहे. समजा त्या योजनेतुन आपल्याला पैसे मिळाले तर आपल्याकडे मोठे प्रोजेक्ट कुठले? तर त्या मोठ्या प्रोजेक्टची नावे आपण ह्याच्यामध्ये लिहलेली आहेत. त्याच्यामध्ये ते सात प्रकल्प आलेले आहे. त्याच्यामध्ये मुख्य भुयारी गटार योजना आणि संपुर्ण भारतभर ह्या योजनेच्या माध्यमातुन कामकाज चालू आहे आणि जेवढी नोंदणी घेतलेली आहे.

आयडेंटीफाय म्हणजे ज्यांच्या नोंदी त्यांच्याकडे आहे त्या ठिकाणचेच काम ते करत असतात. तर आपल्याकडे जेव्हा हे आल्यानंतर आपल्याकडून आयूक्त साहेबांची ही टिपणी ह्या सभेसमोर आणलेली आहे. त्याच्यामध्ये १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना म्हणजे त्यांनी असा निकष धरलेला आहे की, एवढे त्यांच्याकडे एक हजार कोटी रूपये आहेत. मग एक हजार कोटी रूपयातून आपल्याला कोणती कामे प्राधान्याने केंद्र शासनाच्या या योजनेमधून पुर्ण करता येतील म्हणून त्यांनी ते ठेवलेले आहे. परंतू, जिथपर्यंत माझी माहिती आहे तिथे केंद्र शासनाच्या या जवाहरलाल नेहरू नॅशनल अरबन रिन्यूअल मिशन ह्याच्यामध्ये प्रामुख्याने पाणी, गटार आणि घनकचरा व्यवस्थापन ह्याच्यावरतीच ते जास्तीत जास्त आपल्याला निधी देत असतात. परंतू आपण मात्र या मिशन मधुन फक्त भुयारी गटार योजनेसाठी आपल्याला कसा फंड मिळेल आणि या शहराला पुर्णतः आरोग्यदायी कसे बनवता येईल सशक्त कसे बनवता येईल त्याविषयी आपण बोलले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मी जे म्हटले ना, की ह्या आपल्या टिपणीमध्ये खाली कंन्सल्टंट हा विषय आहे आणि दुसरी गोष्ट हा जो अहवाल गाईडलाईन्स ह्या डिसेंबर २००५ मध्ये दिल्या गेलेल्या आहेत आणि त्याच्यामध्ये ह्या सर्व नगरपरिषदेचा, महानगरपालिकेचा उल्लेख आहे. म्हणजे आपल्याकडे आपण ज्या नोंदवतोय मघाशी आपण एम.एल.सी. मुझफ्फर हूसेन साहेबांची गोष्ट सांगितली की, दिल्लीला गेले मंजुरी मिळवली, ठिक आहे. त्याला काही ग्रँड मिळतील ह्यात काही वाद नाही. आमचा काही विरोध नाही. पण आपल्याकडे ह्या ज्या सर्व स्किम चालू आहेत ते आपण तिथपर्यंत पोहाचवले नाही. म्हणून आपले नाव ह्याच्यात आलेले नाही. माझे हे म्हणणे आहे की, आपल्या स्कीम सगळ्या तयार करून जर त्यांच्याकडे पोहचवल्या असत्या तर ह्या महानगरपालिकांबरोबर आपल्याही महानगरपालिकेचे नाव आले असते आणि ह्या प्रोजेक्ट मध्ये आपण ऑलरेडी समाविष्ट झालो असतो.

**मा. आयुक्तः-**

सन्मा. सदस्य आपण म्हणता ते तसे नाही. ही जी शहरे आहेत ती सिलेक्ट केलेली आहेत व ती केंद्र सरकारने सिलेक्ट केलेली आहेत आणि त्या महापालिकेचे प्रस्ताव त्यांच्याकडे गेले आणि आपला प्रस्ताव गेला नाही म्हणून आपले नाव आले नाही असे नाही.

**मा. उपमहापौर :-**

त्यावेळेच्या लोकसंख्येप्रमाणे झालेले आहे. आपल्याकडे जे कोष्टक दिलेले आहे त्या कोष्टकामध्ये संपुर्ण शहरामधल्या सर्व प्रमुख शहरांची त्या त्यावेळची लोकसंख्या लिहीलेली आहे आणि जेव्हा आपल्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेला त्यांनी ठाणे जिल्ह्यातील शहरांमध्ये कॅलक्युलेट केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शेवटची लोकसंख्या २८.५४ म्हणजे ठाण्याची आज तेवढी नाही. ठाणे जिल्हाची २८.५४ करोड नाही.

**मा. उपमहापौर :-**

मुंबई शहर धरून. मुंबई आणि ठाणेतील सर्व शहर असे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात आपणही आलो पाहिजेत.

**मोहन पाटील :-**

मुंबई महानगरपालिका, नवि मुंबई महानगरपालिका, ठाणे महापालिका आणि भिवंडी महापालिका असे मिळून आहे.

**मा. उपमहापौर :-**

ठाणे महानगरपालिका ही एस्टाब्लिश महानगरपालिका आहे. आपली त्यावेळी नगरपालिका होती. नांदेड महानगरपालिकेत ही सिस्टम आणल्यानंतर ज्यावेळेला वैरागडे साहेब ह्यांच्याशी एम.एल.सी. मुझफ्फर हुसैन साहेबांनी आणि आम्ही समोर चर्चा केली होती की, या योजनेच्या माध्यमातून आपल्याला या शहरामध्ये अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टम आणायची आहे. त्यावेळेला वैरागडे साहेबांनी पहिल्यांदा आम्हाला सांगितले की, शंकरराव चव्हाण यांच्या माध्यमातून नांदेडमध्ये ही योजना राबवली गेली होती आणि शंभर टक्के त्यांना ह्या योजनेतून अनुदान मिळाले होते आणि नांदेडला ही योजना राबवली मग आपले नाव ह्याच्यामध्ये कसे येईल हा प्रयत्न केल्यानंतर आपल्याला असे कळले की, हा स्थानिक स्वराज्य संस्थेने हा ठराव करावा आणि तो राज्य शासनाकडे पाठवावा आणि राज्य शासनाने संबंधित ठराव केंद्र शासनाकडे पाठवावा आणि मग ते नाव समाविष्ट होते आणि शंभर टक्के अनुदान आपल्याला ह्या योजनेतुन मिळणार आणि आपण आपल्या नजरेसमोर भुयारी गटार योजना हा प्रकल्प ठेवला तर अधिक क्षमतेने आपण त्याच्यमध्ये यशस्वी होवू.

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ८१ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ८१ :-**

केंद्र शासनाच्या Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस निधी प्राप्त करुन घेणे करिता प्रकल्प अहवाल तयार करणे कामी कंन्सल्टंट नेमणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ८५ :-**

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारत देशाची २७.८०% लोकसंख्या ही शहरी भागातील आहे. सदर शहरी भागातील लोकसंख्या सूमारे २८.५४ कोटी एवढा आहे. शहरी भागाची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत असल्याने सदर भागात विविध सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission अंतर्गत एकुण १००० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधी संपुर्ण भारतातील निवडक शहराकरीता असून महाराष्ट्रातील १) बृहन्मुंबई २) नाशिक महानगरपालिका ३) पुणे महानगरपालिका ४) नागपूर महानगरपालिका व ५) नांदेड महानगरपालिका सदर प्रकल्पात समावेश आहे. बृहन्मुंबई / एम.एम.आर.डी.ए.च्या भागात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश असल्याने सदर प्राप्त होणारा निधी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त करुन घेण्याकरिता या महानगरपालिकेचा प्रकल्प अहवाल शासनाकडे त्वरीत सादर करण्याबाबत मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुचना दिल्या आहेत. त्यानुसार ज्या कामी निधीची आवश्यकता आहे, त्याचा प्रकल्प अहवाल (Project Report) तयार करावा लागणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकस खालील प्रकल्पाकरीता निधीची आवश्यकता पडणार आहे.

१) भुयारी गटार योजना
२) १००.०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना (मोरबे धरण)
३) विकास आराखड्यातील आरक्षणे व डी.पी. रस्ते यांचा विकास करणे.
४) महानगरपालिकेत G.I.S. सर्व्हे करणे.
५) एकात्मिक नाला प्रकल्पातंर्गत नैसर्गिक नाल्याचे बांधकाम करणे.
६) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प
७) परीवहन व्यवस्था

वरील सर्व कामांचा प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. त्याकरीता सर्व संबंधित विभागातून शासकीय विभागातून माहिती घ्यावी लागणार आहे. सन २०२५ पर्यंत या शहरात होणारी एकुण लोकसंख्या ह्यांना करावी लागणारी पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था या बाबत माहिती गोळा करणे, महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकारी यांच्या वर २०२५ पर्यंत होणारा खर्च, तद्नंतर २०२५ पर्यंत किती व कोणते रस्ते, आरक्षणे विकसित करणे या सर्व कामांचा अभ्यास करुन माहिती घेऊन शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे. शासन स्तरावर विविध बैठका, सभांना सदर प्रकल्प अहवालानुसार माहिती (Presentation) सादर करावी लागते. ठाणे, नाशिक, पुणे व इतर महानगरपालिकांनी देखील अशा प्रकारे महानगरपालिकांचे प्रकल्प अहवाल तयार केलेले अहेत. सदर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी अनुभवी कंन्सल्टंटची नेमणूक केल्यास त्यांच्यामार्फत वरील नमूद सर्व कामे पाठपुरावा करुन त्वरीत करुन घेता येतात. प्रशासनाने दिलेला वरील प्रस्ताव पाहता, शासनाकडे वरील योजनेत मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश करण्याकरीता विनंती करण्यात यावी तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे करीता अनुभवी कंन्सल्टंट नेमण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८२ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ८२ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या प्रकरणामध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून या अगोदर आपण सॉफ्टवेअर खरेदी केलेले असे महापालिकेचे म्हणजे प्रशासनाचे म्हणणे आहे. आपण जे दीड-दोन वर्षापूर्वी त्या महापालिकेकडून सॉफ्टवेअर खरेदी केले व त्याचे जे अॅग्रीमेंट आपण आणले होते सभागृहापुढे, तर आपल्याकडे जे सी.एफ.सी. चालू आहे, त्यांच्या मेन्टेनन्सच्या पोटी आपण त्यांना साडे पंधरा लाख रुपये अदा केलेले आहेत आणि त्याच्या बदल्यात ते आपल्याला सर्व्हिस देणार आहेत असा उल्लेख त्या दस्तावेजामध्ये आहे. असे असताना आपले सॉफ्टवेअर जेव्हा बंद पडते, आता काल अर्ध्या दिवसानंतर पूर्णपणे सी.एफ.सी.

मध्ये टॅक्सेशनचे काम बंद होते कारण संगणक बंद होते. मी काही सदनिकांचे टॅक्सबद्दल विचारणा करायला गेलो आणि त्याची कच्ची बीले पाहिजे होती. तर मला नाही म्हणून सांगितले गेले. कारण संगणक चालत नव्हते. अर्धा दिवस आपले सॉफ्टवेअर बंद होते आणि ती कच्ची बिलं मिळाली नाही. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, शनिवार, रविवार जर त्यांच्याकडे भरुन येथून सर्विस मिळत नसेल, महानगरपालिका बंद असताना तर ते साडे पंधरा लाख आपण जे पहिले भरले आहे, त्याचे काय झाले? त्याचा हिशोब आपण त्या महापालिकेकडे कधी मागीतला का? कारण त्यावेळेला असेच ठराव आले. फार चांगले काय होणार आहे. लोकांना पटापट सगळं काही ते मिळणार. दोन मिनिटात सर्व दाखले मिळतील असे सांगितले गेले. पण आता वास्तव थोडे निराळे आहे. आपल्याला जन्माचा दाखला दोन तीन दिवसानंतर मिळतो. तसे बघायला गेले तर अर्ज केल्यानंतर लगेच पंधरा वीस मिनिटात किंवा फार तर संध्याकाळपर्यंत तो दाखला मिळायला पाहिजे पंधरा दिवसाचे टायमिंग आहे. आठवड्याचे टायमिंग आहे कधी कधी लोकांना सरळ महिनाभर यायला सांगत नाही. आपल्याकडे अजुन जन्माच्या नोंदी नाही. आजच आम्ही एक अर्ज केला आहे. हॉस्पीटलमध्ये नोंद आहे पण आपल्या येथे आपल्या संगणकावर त्याची नोंद नाही तर हा जो प्रकार आहे. हा पुर्वीसारखाच प्रकार चालू आहे आणि त्या महापालिकेने जे पंधरा लाख रुपये भरले आहे, सर्विसपोटी. मी सर्विस म्हणतो, देखरेख त्याबद्दल कोणी काही निर्णय घेईल का? त्या महापालिकेकडे तगादा लावेल का? की आपण पैसे घेउन आम्हाला सर्व्हिस देत नाही. त्याबद्दल जे कोणी उपायुक्त आहेत त्यांनी खुलासा करावा किंवा आपण त्यावर रुलिंग द्यावे. पंधरा लाख रूपये आपण त्यांच्यकडे भरलेले आहेत. द्यावे, पण अगोदरची सेवा त्यांची ही निकृष्ट दर्जाची आहे. ती सुधरवण्याचा प्रयत्नही ते लोक करत नाही. पैसे आपल्याकडून ऑलरेडी घेतलेले आहे. आपले पैसे त्यांच्याकडे जमा आहे. याबद्दल खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यात माझी अजून एक सूचना आहे. लोकांना आता बिल गेली आहेत आणि नोटीस बील लावण्यात यावे. आपली बिल पहील्यांदा यायला पाहिजे तर नोटीस पहिले आले. काही लोकांना आता करेक्शन करुन बिल दिलेले आहे. म्हणजे दरवेळेला चुका ह्या असतात. लोकांना चुकीचे बिल गेले आहे हे असे कसे? म्हणजे आपले संगणक काम करत नाही का ऑपरेटर काम करत नाही?

**मा. उपायुक्त :-**

मा. महापौर महोदया, आपण कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सॉफ्टवेअर खरेदी केलेले होते. त्याच्यामध्ये आपल्याला त्यानुसार बदल केले. त्यासाठी ऐंशी टक्के बिल बरोबर आहे आणि वीस टक्के बील हे चुकीचे निघाले. ते मॅन्युअली करेक्शन करुन आता सी.एफ.सी. मध्ये पाठवले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ते सांगतात की, आम्हाला नोटीस बिल कमी करता येणार नाही. तूम्ही करनिरिक्षकाकडे जा आणि कर निरिक्षक सांगतो की, आपण उपायुक्त साहेबांकडे जा आणि उपायुक्त साहेब सांगतात की हे नियमात बसत नाही. नियमात करायला लागेल. चुक तुमची आणि तुम्ही नोटीस फी कशी लावता आणि जर त्याने भरले आणि माझी थकबाकी पुढच्या वर्षात सात आठ रुपये नोटीस फी म्हणजे पैसे घेतले, तूमची नोटीस फी माफ केली. मला आश्वासन मिळाले, मी पैसे भरले आणि पुढच्या वर्षी परत नोटीस फी दाखवली जाते.

**मिलन म्हात्रे :-**

कॅश क्रेडीट हे दाखवलेच जात नाही. खाली भरपुर मारामाऱ्या होतात.

**मा. उपायुक्त :-**

हे के.डी.एम.सी. चे सॉफ्टवेअर होते. त्याच्यामध्ये आवश्यक ते बदल आपल्याला करायचे होते. त्याच्यामुळे काही बिल चुकून होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण साहेब तुम्ही निर्णय द्या ना की, नोटीस फी चुकीची लागलेली आहे.

**मा. उपायुक्त :-**

मॅन्यूअल चुका सुधारलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सी.एफ.सी. ला तीन करोड रुपये खर्च केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. साहेब, करत नाही. मी बोलतो ना सुधारणा करत नाही.

**मा. उपायुक्त :-**

शंभर टक्के.......

**मिलन म्हात्रे :-**

नागरीकांना जर त्याचा त्रास होत असेल तर त्याचा उपयोग काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण कर अधिकाऱ्यांना बोलवा जर त्यांनी नोटीस फी माफ केली असेल तर मी तुम्हाला उद्या उदाहरण आणून देतो. नोटीस फी कमी करता येत नाही. अरे तुम्ही पहिल्यांदा बिल पाठवले आहे तर नोटीस बिल कुठून येणार?

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग अधिकाऱ्यांची सही असल्याशिवाय काहीच होत नाही.

**मा. उपायुक्त :-**

जे काही चुका होत्या त्या मॅन्यूअल दुरूस्त केलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपल्याला प्रकरण आणून देउ का?

**मिलन म्हात्रे :-**

अजुन कॅश क्रेडीट येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता सुधारा, रिद्धी सिद्धी टॉवरचे वीस लोकांचे आहे. ते येउन गेले आम्हाला बील आलेले नाही आणि ही नोटीस कसली आहे?

**मा. उपायुक्त :-**

तसे परटीक्यूलर प्रकरण आपण मला दाखवा. मी बघतो.

**मिलन म्हात्रे :-**

संगणक बोलले की, गेल्यावर्षीची कॅश क्रेडीट माझ्याकडे आली पाहिजे लाईट बिलाची प्रत्येक महिन्याची येते. चार रूपयाची, पाच रूपयाची ही कॅश क्रेडीट येते, त्याला आपण संगणकाचे काम म्हणतो आमच्याकडे तर पूर्ण वर्षाचे येत नाही. डबल-डबल. आपले जे खातेदार आहेत त्यांच्या एका झोपडीला चार चार वेळा टॅक्स लागला आहे. चार वेळा आपण वसुली करतो. चार निरनिराळी नावे. तुमच्याकडे ते फिडींग नाही. एकच घर चार वेळा असेसमेंन्ट, चारवेळा निराळी माणसे बोला आता, काय बोलता ते. माझ्या वॉर्डमध्ये अशी शेकडो प्रकरणे आहेत. एक नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपला पुढील टॅक्सचा विषय आहे त्यावेळी चर्चा करण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या. मागे काय झाले ते बघायला पाहिजे. पंधरालाख रुपयाची वाट लागली आहे त्याचे काय ते बोला. इनस्टीट्यूट बंद असते. ज्यांच्याकडून आपण हे घेतले ते बंद असते त्याचे बोला?

**मोहन पाटील :-**

हा कोणता विषय चालू आहे?

**मिलन म्हात्रे :-**

आपले रेप्यूटेशन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपल्या भावना आमच्या लक्षात आल्या. तसेच आपल्या सूचना समजल्या. ह्याच्यापुढे कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही किंवा कुठली चुक होणार नाही. याबाबत संबंधित अधिकारी दक्षता घेतील. आपली सुचना समजलेली आहे. आपण बसुन घ्या. ठराव सर्वानूमते मंजुर. सचिवजी पुढील विषयाला सुरूवात करा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे पैसे भरले आहे त्या पैशाचे काय झाले? आपल्याला एवढी काय घाई झाली? आपण पेमेन्ट केले आहे आणि त्या महापालिकेचे सॉफ्टवेअर बरोबर नाही, त्याचे काय? ह्याच्याबद्दल आपण आपले रुलिंग द्या. सोडले म्हणून सांगा की त्यांना दान केले?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम.....

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम ह्यांनी आपल्या सुचना ऐकल्या व त्याच्यावर रूलिंग दिले आहे. आपके सब भावनाओका आदर करते हुए मा. आयुक्त साहब जो परटीक्यूलर खाते के चीफ है उन्होने भी आपके सुचनापर अंमल करनेकी बात की है। मा. महापौर महोदयाने उस विषय पर रूलिंग दी है।

**प्रकरण क्र. ८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिकेची GIS (Geographical Information System) प्रणाली विकसीत करणे कामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून मालमत्ता कर विभाग, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, पाणी पुरवठा विभाग, परवाना विभाग, लेखा विभाग, सी.एफ.सी. इत्यादी सॉफ्टवेअर खरेदी केलेली आहेत. तसेच सध्या महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे नेटवर्किंग (LAN) करणे, प्रभाग कार्यालये Redio Frequency (RF) द्वारे मुख्य कार्यालयाशी कनेक्ट (Connect) करणे, महानगरपालिकेचे स्वतंत्र संकेतस्थळ (Wensite) तयार करणे, आदी कामे प्रस्तावित असून त्याबाबत कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेची GIS (Geographical Information System) प्रणाली विकसीत करणे आवश्यक असून सदर प्रमाणीमध्ये प्रामुख्याने खालील महत्वाच्या बाबींचा समावेश आहे.

१) शहरातील मुलभूत सुविधा उदा. रस्ते, गटारे, इमारती, स्ट्रीट लाईट, पाईप लाईन आदींची भौगोलिक माहिती संगणकीय करणे.

२) विकास आराखड्याची व शहराच्या सद्यस्थितीचा तुलनात्मक आराखडा तयार करणे.

३) जमीन वापरातील बदलाची माहिती घेऊन आराखडा तयार करणे.

४) भविष्यातील विकास कामांचा आराखडा तयार करणे.

५) GIS आधारीत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली मार्गदर्शक पद्धती विकसीत करणे.

६) मालमत्ता कराची आकारणी न झालेल्या इमारतींचा शोध घेणे.

वरील बाबी असलेली GIS प्रणाली विकसीत केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. तसेच भविष्यात करावयाची विकास कामे नियोजीतपणे करण्यासही त्यांची मदत होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेची GIS प्रणाली विकसीत करणे तसेच महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली संकेत स्थळ (Website) तयार करणे, Networking (Lan, Wan) करणे, आवश्यक आर्डवेअर साहित्य, कंज्युमेबल साहित्य, कॉम्प्युटर स्टेशनरी, लायसन्स सॉफ्टवेअर खरेदी करणे, ऑपरेटर नेमणे व त्या अनुषंगिक कामे करणेस व येणाऱ्या खर्चास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच याकरीता आवश्यक असलेली तरतूद सुधारीत व सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात करण्यांत यावी

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८३ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

लेखी पत्र दिया उसका कुछ उत्तर नही मिलता है। बहूत लेखी पत्र दिया है।

**मिलन म्हात्रे :-**

महापौर कार्यालयात ही लेखी पत्र दिले तर त्याचे उत्तर मिळत नाही. दुसऱ्यांचे तर सोडून द्या.

**मा. महापौर :-**

पत्राचे उत्तर देत नाही तर लगेच त्याच्यावर कायर्वाही केली जाते.

**मिलन म्हात्रे :-**

तीन करोड फुकट गेले त्याचे काय ते बोला.

(सन्मा. सभागृहनेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ८३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा जो ठराव आलेला आहे त्यामध्ये आयुक्त साहेबांनी आपली भुमिका स्पष्ट केली नाही. आयुक्त साहेबांचे याबाबत काय म्हणणे आहे. तसेच, आपण ज्या राष्ट्रीयकृत बँकांना हे देणार आहोत त्या कोणत्या बँका आहेत? आपण त्या बँकेशी संपर्क साधला आहे का? त्याच्यापोटी काय खर्च येणार आहे. आज आपण प्रस्ताव मंजुर करून घेत आहोत की, आपण धोरणात्मक निर्णय घेत आहोत? नंतर त्याला किती खर्च येणार आहे? आपले जे कर्मचारी काम करतात त्यांना काम राहणार नाही आणि आपल्याला बँकेला त्यापोटी काय पैसे द्यायला लागणार आहे का? कारण बँक फुकट काम करणार नाही. यामध्ये आपल्याकडून सविस्तर माहिती मिळालेली नाही. तर ह्याबाबतची माहिती आयुक्त साहेबांनी पहिल्यांदा द्यावी.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो काही प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भामध्ये हा जो गोषवारा मी दिलेला आहे त्या गोषवाऱ्यामध्ये सविस्तर अशी माहिती दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, बँक कमिशन किती घेणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बँक कमिशन किती घेणार? कोणकोणत्या बँका आहेत? सर्व बँकेत काम होणार आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

बँक कमिशन घेतल्याशिवाय काम करत नाही. एकेक बिलावर बँक कमिशन घेते.

**मा. आयुक्त :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये जवळजवळ वीस बँका नॅशनलाईज आहेत. त्या वीस बँकांशी आपली ह्याबाबत चर्चा सुरू आहे आणि त्यांची मिटींगसुद्धा एक दोन दिवसापूर्वी बोलावलेली आहे आणि त्यांच्याशी चर्चा झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला त्याच्यातले काहीच महित नाही.

**मा. आयुक्त :-**

जे काही पैसे आपल्याला बँकेमार्फत घ्यायचे आहे असे धोरण आहे आणि ते धोरण ठरवण्यासाठी आपल्यासमोर विषय चर्चेसाठी ठेवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मान्य आहे, बँकेचे घेणे किती आहे? बॅकेचे डिमान्ड काय आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्याला बँकेकडून किती खर्च येणार? आपले कर्मचारी जे काम करतात ते फ्री होणार आहेत त्यांना आपण कुठे वापरणार आहोत?

**मा. आयुक्त :-**

आपले कर्मचारी वसुलीला जात नाही आपले कर्मचारी ह्याच ठिकाणी बसलेले असतात. ते नागरिक लाईन लावून असतात तर त्या नागरिकांच्या सोयीसाठी ज्या ज्या ठिकाणी आपले चार प्रभाग कार्यालय आहे त्या चार प्रभाग कार्यालयामध्ये आपण चार ठिकाणी काउन्टर ओपन करत आहोत. तर लोकांना त्याठिकाणी जाउन कमी वेळेमध्ये पैसे भरता येतील, अशाप्रकारच्या सोयी आपण नागरीकांना उपलब्ध करून देत आहोत ह्यामध्ये वाईट काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, वाईट नाही सगळे चांगले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही कुठे बोलतो की, वाईट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रस्ताव चांगला आहे. पण बँक कमिशन किमी घेणार? सविस्तर माहिती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कमिशन किती, बँकेचे नाव काय? ह्याची सविस्तर माहिती आली पाहिजे की नाही?

**मा. आयुक्त :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये ज्या नॅशनलाईज बँका आहेत त्या नॅशनलाईज बँका शहराचा आदर करून, महापालिकेचा आदर करुन त्यांनी आपल्याला आश्वासन दिलेले आहे की, आम्ही सर्व्हिस टॅक्स वगैरे लावणार नाही किंवा सर्व्हिस टॅक्स जर त्यांनी सांगितले तर आम्ही लावणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते जर आपण दिले असते तर हा वाद झाला नसता.

**शशिकांत भोईर :-**

आयुक्त साहेब, आपण ही माहिती द्यायला पाहिजे होती की, त्यांचे काहीही कमिशन नसेल.

**तुळशिदास म्हात्रे :-**

ही एक चांगली गोष्ट आहे. जेणेकरून लोकांचे पैसे वाचतील. लोकांचे रिक्षाचे भाडे वाचणार आहे. लोकांची चांगली सुविधा होईल.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेने जी बिल पाठवलेली आहे ती कर आकारणीची बिल आहेत व पाणीपट्टीची जी बिल आहेत ती बिल भरण्यासाठी मुख्य कायार्लयामध्ये जी रांग लागते व लोकांना उन्हामध्ये ताटकळत उभे राहावे लागते. त्याच्यासाठी आपण ही सोय त्यांच्यासाठी केलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. गेल्यावेळी ज्या माणसाने बिल भरले त्याची पोचपावती कशी मिळणार? बँक किती कमिशन घेणार आहे? कोणत्या कोणत्या बँका आहेत?

**मा. आयुक्त :-**

जे काही धोरण ठरवले जाते त्याची अंमलबजावणी करताना कुठच्याहीप्रकारे आर्थिक तोटा किंवा आर्थिक बाब ह्यांचे महापालिकेवर बर्डन पडणार नाही. आपण त्याची दक्षता घेणारच आहोत.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ८३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेला प्राप्त होणाऱ्या रक्कमा बँकेमार्फत स्विकारणे बाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचेक मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत्र जकात कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर कर हे आहेत. यामध्ये जकात कर वसुलीचे काम महानगरपालिका ठेका पद्धतीने करीत आहे. घरपट्टी, पाणीपट्टी कराची वसुली महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडून करीत आहे. घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी महानगरपालिकेने भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम), मिरारोड, मिरा, काशी, घोडबंदर, उत्तन या विभागामध्ये महानगरपालिकेची प्रभाग कार्यालये असून त्या विभागातील कर्मचारी घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीचे कामकाज पहात आहेत.

महानगरपालिकेने घरपट्टी, पाणीपट्टी कराच्या बिलांचे वाटप केल्यानंतर नागरिक सदर बिल आपल्या विभागातील प्रभाग कार्यालयांत जाऊन रोखीने व धनादेशाद्वारे कराचा भरणा करीत असतात. कराचा भरणा करणेकरिता प्रत्यक्ष नागरिकांना संबंधित कार्यालयामध्ये जावे लागत आहे. नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने व कर वसुली कामामध्ये विलंब टाळण्यासाठी व सुसत्रता येणेकरिता घरपट्टी, पाणीपट्टी कराचा व इतर कराचा भरणा राष्ट्रीयकृत बँकेमार्फत स्विकारणे योग्य राहील. यामुळे नागरिकांना प्रभाग कार्यालयांत येण्याची गरज भासणार नाही व नागरिकांचा वेळ वाचणार आहे, तरी प्रस्तावित केलेल्या कार्य प्रणालीस मान्यता देण्यात येत आहे. सदरची कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविणेसाठी संबंधित बँकांशी विचार विनिमय करुन करारनामा करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेस ही सभा मंजुरी देत आहे. यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८४ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यापासून महापौर हे पद आपल्या शहराला मिळाल्यानंतर त्या पदामार्फत, त्या महानगरपालिकेमार्फत आपतग्रस्तांना मदत करणे क्रमप्राप्त आहे. मधे जो पुर आला आणि त्याच्यामध्ये आपले काही नागरीक दगावले त्याकरिता लेप्टोस्पायरसीस, डेंग्युसारखे जे आजार होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

विषय काय दिलेला आहे ते तरी समजवणार आहात की नाही काय आहे, नाही.

**मोहन पाटील :-**

ह्या आजाराने ही लोक दगावल्यानंतर त्यांना महापौर निधीतून मदत करता आली पाहिजे. अशा पद्धतीची आपली भावना होती आणि या भावनेतून आज मा. महापौर मॅडम ह्यांनी आपल्याकडे विषय आणला आहे त्या विषयामध्ये आपण जो हेड बजेटमध्ये दिला आणि आपतग्रस्तांना ऐनवेळेला कधीही अशी मदत करणे त्याकरिता महापौरांच्या निधीतून पैसे देता आले पाहिजे. जेणेकरून असा फंड असायला पहिजे आणि किमान पन्नास लक्ष तरतुद करता आली पाहिजे अशी मी सुचना याठिकाणी करत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

विषय कुठला आहे?

**मिलन म्हात्रे :-**

सचिवजी सदर विषयाला गोषवारा व टिपणी ही नाही. विशेष सभा बोलावून नंतर विषय घ्या. विषयपत्रिकेवर विषय नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, सभागृह नेते जे वाचन करत आहे. ते ऐकून घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

महापौर सहाय्यता व आपतकालीन निधी उभा करणे या संदर्भामध्ये खालीलप्रकारे निधीचा वापर करावा अशा प्रकारचे पाच सहा मुद्दे मी मा. महापौरासमोर सभागृहापुढे मांडत आहे. (१) कोणतेही जातीय अथवा राजकीय स्वार्थासाठी संस्थेच्या निधीचा वापर केला जाउ नये. (२) मोठ्या प्रमाणावर सामुदायिक दंगली मानवी मर्यादेच्या बाहेर कोसळणाऱ्या आपत्ती, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, रोगाच्या साथी इत्यादिमुळे पीडीत झालेल्या ह्रदयरोग व इतर दुर्धर रोगांनी पीडीत झालेल्या रुग्णांना दवाखाना, औषधउपचारासाठी व खर्चासाठी आर्थिक मदत देता येईल व तो महाराष्ट्रात कोणत्याही भागात राहणारा असला तरी समिती निर्णय घेईल. त्याप्रमाणे त्यास आर्थिक मदत करता येईल. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय भावनात्मक एकात्मका व तत्सम कारणासाठी पदयात्रा, सायकल व इतर दुचाकी वाहनावरून प्रचार करणाऱ्या व्यक्तीस अथवा समुदायास सदर निधीतुन मदत करता येईल. आंतराष्ट्रीय व राज्यपातळीवरील स्पर्धामध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंना व तसेच, अपंग खेळाडूंना मदत करता येईल. भारतीय नागरीकत्व असलेले व आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या कुटूंबातील पाल्यास त्याने अपवादात्मक शैक्षणिक यश मिळविल्यास व अशा पाल्यास परदेशी शिक्षणासाठी जायचे असल्यास त्यांना मदत करता येईल. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रसंगी निधीचा वापर करता येईल. वरील कारणाखेरीज इतर कारणासाठी कोणत्याही व्यक्तीस, नागरिकास शक्यतो मदत करू नये.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मी सभागृह नेते ह्याच्या वक्तव्याला इंटरअप करते. ठराव मांडण्याच्या अगोदर माझी एक सुचना आहे की,

**हॅरल बोर्जीस :-**

त्याचप्रमाणे या सर्व गोष्टी पाहता महापौर सहाय्यतेची शहराला गरज दिसत आहे म्हणून आजची ही मा. महासभा.

**रिटा शहा :-**

ठराव मांडायच्या अगोदर मला बोलायचे आहे की, आपत्कालीन निधीची व्याख्या काय आहे?

**मा. महापौर :-**

ठरावामध्ये तेच सांगितले आहे.

**रिटा शहा :-**

नाही. ह्याच्यामध्ये आपत्कालिन म्हणजे जे नॅचरल कलॅमिटीज आणि अचानक ॲक्सीडेंट झाले त्याबद्दलची निधी आपण सांस्कृतीक कार्यक्रम करणाऱ्या लोकांना निधी देणार, कोण पायी जाते, कोण सायकलने जातो त्यांना देणार. मग जे खरोखर नॅचरल कलॅमिटीज असते की, जें आकस्मात कुठे अचानक आग लागली आणि घरचे घर जळाले अशा माणसांना आपण निधी देउ शकतो. कुदरतची आफत आली जसे मागच्यावेळी बाढ आली तशा माणसांना आपण मदत करू शकतो सायकलीवर कुठे संस्था चालली आहे आणि आपण त्यांना निधी देणार मग ही एक हास्यास्पद गोष्ट आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमजी इसमे स्पोर्ट को बढावा दिया है।

**रिटा शहा :-**

आपण स्पोर्टस्‌ला बढावा देतो. महानगरपालिकेकडे स्पोर्टस्‌चे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

उसके बाद मेडीकल के बारे मे प्राविधान दिया है।

**रिटा शहा :-**

क्रिडा आणि जे समिती आहे.....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्याला रिटा शहाजी, सभागृह नेते तेच मुद्दे वाचून दाखवत आहे की, आपतकालीन आणि सहाय्यता निधी ह्याच्यामध्ये कुठले कुठले पॉईंट नमुद केलेले आहे.

**रिटा शहा :-**

फक्त दोनच मुद्दे त्याच्यामध्ये समाविष्ट होत आहे. अचानक अकस्मात जी बाब घडते. जसे मागे एका घराला आग लागली होती आणि आपण त्यांना मदत केली व दुसरी बाब म्हणजे नॅचरल कॅलमिटीज म्हणजे कुदरती आफत. ह्या बाबीकरिताच आपण आपतकालिन निधी वापरू शकतो. समाजात सामाजिक संस्था, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पोर्टस्‌ ह्यांना निधी देण्याची काही गरज नाही कारण त्याच्याकरिता आपल्याकडे वेगळे बजेट आहे.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे, पण आपतकालिन निधीची जी व्याख्या आहे, जे सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी जो प्रश्न मांडला तो बरोबर आहे की, आपत्कालिन निधीमध्ये अचानक आग लागणे, अतिवृष्टी होणे, भुकंपासारखे प्रकार होणे जे काही नैसर्गीक आपत्ती येते त्याला आपत्कालिन निधी वापरायचा आणि सहाय्यता निधी आपण हा निधी वापरु शकतो आणि जो आपतकालिन निधी आहे जो पन्नास लक्ष ठेवला आहे तो, त्याच्यामध्ये सहाय्यता निधी जो आहे त्याचा हेड ह्याच्यामध्ये वेगळा ठेवू.

**रिटा शहा :-**

सहाय्यता निधीचा आपण गोषवाऱ्यामध्ये उल्लख केलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

मला विषयपत्रिका कळेल का? आपण जरा विषय वाचा मला असा प्रश्न पडला आहे की, कुठला विषय चालू आहे.

**मोहन पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण ह्या निधीला आपतकालिन निधी व सहाय्यता निधी.....

**प्रभात पाटील :-**

सचिवजी, कृपया आपण विषयपत्रिका पुन्हा वाचून दाखवा.

**मोहन पाटील :-**

आपतकालिन निधी व महापौर निधी असा हेड द्यावा.

**प्रभात पाटील :-**

मी माझ्याकडची विषयपत्रिका देणार नाही. मला तुमच्याकडची विषयपत्रिका वाचून दाखवा. कोणता विषय चालू आहे तेच मला कळत नाही. हा विषयच नाही.

**शुभांगी नाईक :-**

आमच्याकडे विषयपत्रिकेवर विषयच नाही.

**शशिकांत भोईर :-**

हा अचानक घेतलेला विषय आहे.

**प्रभात पाटील :-**

माझ्याकडे तो विषयच नाही. एकीकडे ८६ विषय आहे व एकीकडे ८४ विषय आहे. हा कायप्रकार आहे आणि माझ्याकडे विषय ही नाही.

**शशिकांत भोईर :-**

सदस्या हा विषय विषयपटलावरच नाही. हा विषय घेण चुकीचे आहे.

**प्र. सचिव :-**

विषय पटलावर विषय आहे.

**शशिकांत भोईर :-**

कुठे आहे? आपण अचानक काहीही करता, हा विषय नसताना विषय घेणे हे योग्य नाही. हे अधिनियमाला धरुन नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, आपण विषयच दिलेला नाही. कुठल्या विषयाची चर्चा चालू आहे. कारण विषय पटलावर विषयच नाही.

**शशिकांत भोईर :-**

विषय पटलावर विषय नसताना आपण प्रकरण क्र ८४ कसा घेता?

**डॉ. रमेश जैन :-**

यह विषय ही नही है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेबा, विषयपत्रिकेवर विषय नाही. आपण हा विषय पुढच्या सभेत घ्या.

**शुभांगी नाईक :-**

सदस्या विषय पुढच्यावेळी घेण्यात यावा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, विषयपटलावरचा हा विषय काही सदस्यांकडे आलेला आहे आणि काही सदस्यांकडे हा विषय आलेला नाही.

**शुभांगी नाईक :-**

काही सदस्यांकडे विषय आहे कारण त्यांना आता विषय दिलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला आता कागद वाटले, तुम्हाला आता विषयपत्रिका वाटली.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला आता विषयपत्रिका दिली आहे.

**जेम्स कोलासो :-**

आपण प्रत्येकांना अजेन्डा वेगवेगळा देता का?

**शशिकांत भोईर :-**

हा विषय विषयपटलावर नसल्याने सदरचा विषय पुढे ढकलण्यात यावा.

**डॉ. रमेश जैन :-**

इस विषय को आगे की मिटींग मे लिया जाए।

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ८४ व ८५ हा विषय पुढील सभेत घेण्यात येईल. तोपर्यंत सदरच्या विषयाला स्थगिती देण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८४ :-**

महापौर आपतकालीन निधी उभारणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८८ :-**

मा. महापौर सो‍ा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका जकात नियम २००६.

**ठराव क्र. ८९ :-**

मा. महापौर सो‍ा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८६ चे वाचन केले.)

**रिटा शहा :-**

साहेब, मच्छर म्हणजे नाना पाटेकर इनका जो डायलॉग था। वह डायलॉग तो मै नही बोलूंगी लेकिन मच्छर का इतना त्रास है। मुझे ऐसा लगता है की आरोग्य विभाग सोया है। कल मा. उपमहापौरजी एक कार्यक्रम मे गए थे और वहा जाने के बाद उधर की परिस्थिती देखी और एक घंटे मे मच्छर मेन्टली लोकांना इफेक्ट झाले आणि मच्छर मेले. पण मला असे वाटते डॉ. बावस्कर गेले तर मच्छर घेउन गेले नाही तर पैसे भरुन घेउन गेले.

**डॉ. रमेश जैन :-**

बावस्कर साहब मच्छर लेके नही गए।

**रिटा शहा :-**

साहेब, कांबळे साहेब वगैरे आपल्याकडे एवढे कर्मचारी वर्ग आस्थापना विभागावर आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो की, आपण जो गोषवारा दिलेला आहे एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी उपाययोजना करण्याबाबत, हाही विषय विषयपटलावर नाही. ८६ नंबरचा विषय चालू आहे आणि हा ८० नंबरचा आहे. आपण क्रमतरी बरोबर लावून द्या.

**प्र. सचिव :-**

क्रम लावताना चुक झाली आहे.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ८६ चा ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनूमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, औषधे जी आणायची आहेत ती बायर इंडियाचीच औषधे आणण्यांत यावीत आणि जी धुर फवारणी करायची असते ती पंधरा पंधरा दिवसांनी होत नाही व गटार देखील आठ-आठ दिवसांनी साफ करायला येतात. त्यामुळे डासांचा उपद्रव झाला आहे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, मिरा रोड बाबतचे बोलतो. मिरा रोडमध्ये डासांच्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे व आले कर्मचारी औषध फवारणी करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

दोन दोन वेळा बोलवावे लागते तरी एस.आय. येत नाही. जो अगोदरचा एस.आय. होता त्याचे काम चांगले होते. त्याची बदली करुन मिरा रोडला टाकले आहे. तो एस.आय. आमच्याकडे पाहिजे.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला जे मोठमोठे कॉम्प्लेक्स आहेत, त्यांच्यासमोर गटार व सांडपाणी असल्याने डासांचे प्रमाणे वाढले आहे. त्यामुळे आमच्या लोकांना त्रास होत आहे. आपण औषध फवारणी करावी. जेणेकरुन डासांचा उपद्रव कमी होईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या उपसुचना ठरावामध्ये सामावून घेतल्या जातील. ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ८६ :-**

एकात्मिक डास नियंत्रण करण्याकामी उपाययोजना करणे.

**ठराव क्र. ९० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे भौगोलिकदृष्ट्या मुंबई महानगरपालिकेच्या लगत आहे. अनेक एकात्मीक कारणांमुळे मिरा भाईंदर शहर झपाट्याने विकसीत होत असलेले शहर आहे. मनपा क्षेत्रामध्ये राहणा-या नागरीकांना मनपा मार्फत अनेक मुलभूत सेवा पुरविल्या जातात. त्यापैकी आरोग्य विभागामार्फत नागरीकांच्या आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण केले जाते. मनपा क्षेत्रातील आरोग्य विषयक समस्यांचा विचार करता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विषयक समस्यांपैकी प्रमुख समस्या म्हणजे मोठ्याप्रमाणावरील डासांची उत्पत्ती ही आहे. त्यास मुख्यत्वे खालीलप्रमाणे भौगोलिक परिस्थिती जबाबदार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार हा ७९ चौ.कि.मी. एवढा असून मनपा खाडीलगत असल्याने पाणथळ जागेमध्ये भराव टाकून मोठ मोठे गृह निर्माण, संकुले व नागरी वसाहती निर्माण करण्यात आल्या असून मनपा क्षेत्रामध्ये अंदाजे सुमारे ७ ते ७.३० लाख नागरीक राहत आहेत. सदर नागरी परिसराकरीता मोठ मोठे रस्ते व गटारे बांधले आहेत. मनपा क्षेत्रात अद्याप फार मोठे क्षेत्र विकसित होणे बाकी असल्याने ओपन प्लॉटच्या स्वरुपामध्ये मोकळे पडले आहे. सदर मोकळ्या प्लॉटची संख्या फार मोठी असून त्याचा विस्तार फार मोठा आहे. मनपा क्षेत्र हे खाडी लगत असल्याने सदर ओपन प्लॉट पाणथळ अवस्थेमध्ये आहे. मनपा क्षेत्रामध्ये बहुतांश परिसरात इमारतीचे सेफ्टी टँक पध्दतीचे शौचालय आहे. सदर शौचालयांच्या सुमारे ७०,००० सेफ्टी टॅक असून सदर सेफ्टी टॅकमधील सांडपाणी मनपाच्या उघड्या स्वरुपाच्या गटारात सोडले जाते. तसेच मनपा क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरु असून त्या कामी मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या उघड्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे डासाची उत्पत्ती होत.

सध्या मनपा क्षेत्रातील डास नियंत्रणकरीता आवश्यक किटक नाशके खरेदी करून मनपा कर्मचाऱ्यामार्फत संपूर्ण प्रभागामध्ये किटक नाशक व धुर नाशक फवारणी दैनंदिन कार्यक्रमानुसार करण्यता येते. मात्र डास नियंत्रण प्रभावीपणे व यशस्वीरित्या करणेकरीता पुढीलप्रमाणे मुख्यत्वे अडथळे येत आहेत.

१) मनपा क्षेत्रातील डासांचे वाढीचे क्षेत्र, गटाराची व नाल्याची पाणथळ जागेचे क्षेत्रफळ व संख्या तसेच सेफ्टी टॅक संख्या पाहता, सध्या असलेली ७० कर्मचारी, व धुर फवारणी २५ मशिन अपुऱ्या आहेत.

२) मनपाकडील किटक नाशक फवारणी कामी असलेले मजूर पुरेशे प्रशिक्षित नाहीत. त्यामुळे त्यांना किटक नाशक नियंत्रणा विषयी आवश्यक माहिती देणे शक्य होत नाही.

३) सदर किटक नाशक कामावर संपुर्ण देखरेख करणे करीता आवश्यक डास नियंत्रणाबाबत सखोल माहिती असलेले मुकादम उपलब्ध नाहीत.

४) मनपा क्षेत्रातील असलेला ओपन प्लॉटचा विस्तार फार मोठा असल्याने त्यामध्ये शेवटपर्यंत मनपा कर्मचारी पोहोचू शकत नाहीत. तेवढी तांत्रिक सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे संपुर्ण ओपन प्लॉटमध्ये किटक नाशक परिणामकारकरित्या फवारणी करणे शक्य होत नाही.

सध्या महानगरपालिकेकडे प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग तसेच पुरेशे साधनसामुग्री उपलब्ध नसल्याने महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून देण्यात आलेल्या डास नियंत्रण कामाच्या पध्दतीनुसार खालीलप्रमाणे एकात्मीक डास नियंत्रण करणे कामी उपाययोजना करीता शास्त्रौक्त पध्दतीने राबविणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरालिका क्षेत्रात जुंतूनाशके / धूरफवारणी कामी प्रशिक्षीत कामगार तसेच जंतुनाशक/किटनिाशके, डिझेल, पेट्रोल, साधन सामुग्री तसेच राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून देण्यात आलेल्या नागरी नियंत्रण कामाच्या पध्दतीनुसार आवश्यक कर्मचारी व साधन

सामुग्री व किटक नाशक/ अळी नाशक पुरविणे आदी संपूर्ण जबाबदारी ठेकापध्दतीने दिल्यास सदर यंत्रणावर खालीलप्रमाणे अंदाजे मासिक खर्च होणार आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फवारणी कर्मचारी | - | १२४ | | |
| पर्यवेक्षक | - | २१ | | |
| फवारणी निरिक्षक / कंन्सलटंटसह | - | १० | = | ६,२०,०००/- |
| किटक नाशके, अळी नाशके, डिझेल, पेट्रोल | | | | |
| व इ. उपकरण वरील खर्च | - | | = | १३,६५,०००/- |
| (मनपाचे स्प्रे पंप व फॉग मशिन कामासाठी उपलब्ध करावे लागेल) | | | | |
| एकुण (अंदाजीत मासिक खर्च) | - | | = | १९,८५,०००/- |

वरीलप्रमाणे सध्या महानगरपालिकेचा किटक नाशक, धुर फवारणी व कर्मचारी कामी होत असलेला खर्च व फवारणी साठी असलेले अपुरे कर्मचारी या सर्वबाबींची तुलना करता मनपा क्षेत्रातील राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार महापालिका क्षेत्रातील एकात्मीक डास नियंत्रण करणे कामाची संपुर्ण जवाबदारी शास्त्रौक्त पध्दतीने करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने गोषवाऱ्या मध्ये नमुद केल्याप्रमाणे डास नियंत्रण उपाययोजना करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८७ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

पुरक घोषणांचे सर्व विषय फेटाळण्यांत येत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण विषय फेटाळता पण पुरक घोषणांमध्ये कमर्चाऱ्यांचे विषय आहेत. त्यांच्या तक्रारी आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठराव दिल्यानंतर आपण ठराव का फेटाळता?

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. महापौर मॅडम, आपण माझे सगळे ठरव फेटाळता. आयुक्त साहेब, आपले कामगार ९५ वसयूप एक्स्ट्रा काम करत आहेत आणि त्यांना त्याचा पगार ही देण्यात आलेला नाही. स्थायी समितीमध्ये एक्स्ट्रा काम केलेल्या कामाचा पगार देण्यात यावा असा ठराव पास केला आहे. तरी त्यांना ९५ पासून पगार नाही. याबाबत कर्मचाऱ्यांना तक्रार आहे.

**मा. आयुक्त :-**

कुणाची तक्रार आहे?

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, सुट्टीच्या दिवशी येऊन काम केले जाते त्याचा अतिरिक्त पगार देण्यार का नाही?

**मा. आयुक्त :-**

ज च्या प्रस्तावात आपला प्रश्न आहे याबाबत मा. महापौर मॅडम निर्णय घेतील. मी कसे उत्तर देणार.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण विषय का फेटाळला त्याचे कारण सांगा.

**जोजफ घोन्सालविस :-**

जे सुट्टीच्या दिवशी येऊन काम करतात त्यांना अतिरिक्त पगार देणार का नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी जेव्हा ठराव केला त्यावेळी ह्या कर्मचाऱ्यांना वेतन सुट्टीच्या दिवशी कामावर आल्यावर त्या दिवसाचा पगार भरून मिळणार असे सर्व त्या ठरावामध्ये नमुद केले आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

तो ठराव अग्निशमन दलाकरिता आहे. पण ह्या विभागाला कुठे दिले आहे?

**मा. महापौर :-**

चौकशी करुन उत्तर देण्यात येईल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करु इच्छितो की, आपल्याला जी विषयपत्रिका दिलेली आहे त्यामध्ये जकातीचा नियमाचा विषय आहे तो अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्याबाबतीमध्ये सभागृहामध्ये आज निर्णय घेणे आवश्यक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रस्ताव का फेटाळावा त्याचे कारण सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

जकात नियमाचा विषय पुढच्या वेळी घ्या अन्यथा विशेष सभा लावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करतो, आज जर विषय झाला तर आम्हाला त्याच्यावर पुढे कार्यवाही करता येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्याकडे विषय नाही. आपण हा विषय पुढच्या वेळी घ्या.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगपालिका जकात नियम २००६ या विषयाकरिता विशेष सभा लावली जाईल.

**प्रकरण क्र. ८७ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १३/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगासाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि.क्रमांक-मि.भा.पा. २००४/१४४/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी / शर्ती च्या अधिन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन न करता देण्यात बूथ (जागा) आलेल्या संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करणे व भविष्यकाळात शासन नियमप्रमाणे कारवाई होणेबाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८८ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १३/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पश्चिम राव तलाव, मांडली तलाव व त्याच्या आजुबाजूच्या विहिरी पावसाळ्या अगोदर साफसफाई करुन घेणेबाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८९ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दिनांक १७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरामध्ये तलाठी सजा भाईंदर यांच्या हद्दीतील जुना सर्व्हे नं. ६९० व नवीन सर्व्हे नं. २८ क्षेत्र .८४ आर .९८ या लोकल बोर्ड दवाखाना (जिल्हा परिषद) व शव विच्छेदन गृह (पोस्टमार्टम रुम) व वातानुकुलीत शवागर बाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९० :-**

सन्मा. सदस्य श्री. केशव रामभाऊ घरत यांचे दिनांक १७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका क्षेत्रातील दस्ताऐवज होऊ न शकणाऱ्या मालमत्ता हस्तांतरणाबाबत.

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९१ :-**

सन्मा. सदस्य श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस यांचे दिनांक १७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ रोजीचा ठराव क्र. ९४)

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनंत पाटील :-**

मा. महापोर मॅडम, शोकप्रस्ताव आहे. राई गावातील रमाबाई अनंत म्हात्रे ह्यांचे दुःखद निधन झाले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

तसेच, सन्मा. सदस्या जेन्वी आल्मेडा ह्यांचे बंधु व शिक्षण अधिकारी ह्यांच्या मातोश्रीचे निधन झाले त्यांच्यात दुःखात ही सभा सहभागी आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ९२ :-**

राई गावातील रमाबाई अनंत म्हात्रे ह्यांचे दुःखद निधन झाले आहे. तसेच, सन्मा. सदस्या जेन्वी आल्मेडा ह्यांचे बंधु व शिक्षण अधिकारी ह्यांच्या मातोश्रीचे निधन झाले आहे. तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. अनंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून आपणा सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०५.५० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**